# संपादकीय

## इ. स. २००२ मधील ग्रंथव्यवहार
## खूप काही घडते आहे, तरीही...

नव्या सहस्रकात प्रवेश करताना दोन वर्षांपूर्वी सर्वच क्षेत्रात एक उत्साहाचे आणि अपेक्षांचे सोनेरी क्षितिज सर्वांच्या समोर झगमगत होते. या नव्या सहस्रकात प्रवेश करून दोन वर्षे आता पूर्ण होत आहेत. आणि हे नवे सहस्रक नवनवी आव्हाने घेऊन अस्तित्वाचे प्रश्न अधिक बिकट करीत आहे अशीच भावना वाढीला लागत आहे.

इ . स. २००२ मधील मराठी साहित्यक्षेत्र आणि एकूण ग्रंथव्यवहार यांच्यावर दृष्टिक्षेप टाकला तर काय दिसते? या वर्षभरात मराठी साहित्यक्षेत्रात काय काय घडले? नवे काय हाती लागले? असा प्रश्न मनात सहजपणे येतो.

वर्षभरात खूप काहीतरी घडते. आपले जीवन आता जास्तीत जास्त संस्थात्मक बनत आहे; त्या त्या संस्थांमार्फत काही ना काही होतच राहते. साहित्य महामंडळ म्हटले की साहित्य संमेलन भरवलेच पाहिजे. राज्य सरकारने ग्रंथपुरस्कारांसाठी प्रवेशिका मागवून पुरस्कार वितरणाचा सोपस्कार पार पाडलाच पाहिजे. युनिसेफने दिलेल्या अनुदानामुळे खडू फळा योजना, विज्ञान साहित्य योजना यासारख्या ग्रंथ खरेदीच्या योजना, मनात असो नसो,शासनाने राबवल्याच पाहिजेत. विविध संस्थांनी साहित्यकलाक्षेत्रासाठी वेगवेगळे पुरस्कार सुरू केले आहेत. दरवर्षी ते कोणाला तरी जाहीर केलेच पाहिजेत. दरवर्षी दिवाळी येते, मग दिवाळी अंक काढायलाच हवेत. प्रकाशनसंस्थांचा व्याप मोठा असतो. दहावीस कर्मचारी कामाला असतात. त्यांचा पगार द्यावा लागतो. तो देता यावा म्हणून नवीन पुस्तके काढावीच लागतात. नुसती पुस्तके काढून काही पगार म्हणून देता येत नाहीत. ती विकून पैसे गोळा करावे लागतात. त्यासाठी पुस्तकविक्रीचे प्रयत्न करणे क्रमप्राप्त ठरते. त्यासाठी ग्रंथप्रदर्शने हवीतच. प्रकाशन समारंभ हवेत, गावोगाव सभासंमेलने हवीत. साहित्य हे आता लोकाभिमुख होत आहे. वेगवेगळे समाजघटक लिहिते झाले आहेत. गुराखी, आदिवासी, वनवासी, दलित, मुस्लिम, ख्रिस्ती, जैन, व्यापारी, बँककर्मचारी, रोटरी सदस्य, शेतकरी, समरसतावादी, ... मोठ्या संमेलनात सर्वांची वर्णी कशी लागणार? मग आपली स्वतंत्र संमेलने हवीतच. साहित्य असो नसो, अध्यक्षपदे हवीतच. अध्यक्ष पदाचे इच्छुकही काही कमी नाहीत. मग अंकुरसारखी संस्था वर्षात तीन तीन संमेलने घ्यायलाही नाही म्हणत नाही. प्रायोजक भेटले की झाले!



या दृष्टीने पाहिले तर इ.स.२००२ हे वर्ष खूप गजबजलेले होते, असेच म्हणायला हवे. ७५वे म्हणजे अमृतमहोत्सवी मराठी साहित्य संमेलन पुण्यातच झाले. आता सवयीने ते थाटामाटात झाले असे शब्द एकदम वापरायला हवेत. पण हे संमेलन तसे नव्हते. चाळीस पंचेचाळीस लाख रुपये जमवूनही ते संमेलन मोठ्या काटकसरीने जिल्हा संमेलनाच्या रूपात घेतले गेले. आयोजक संस्थेने निधी संकलनाचा- फंड रेझिंगचा- एक उपक्रम म्हणून हे संमेलन पार पाडले. आणि आपले उद्दिष्ट यथासांग पार पाडले. कमीत कमी निमंत्रित, कमीत कमी वक्ते, कमीत कमी आमंत्रणे, कमीत कमी उपस्थिती यांचेही रेखीव आयोजन करावे लागते. ते आयोजकांनी नेटके केले. साहित्य संमेलन म्हणजे वाङ्मयीन सेवाकार्य वगैरे कल्पना आता बासनात गुंडाळून ठेवा. पैसे गोळा करण्याचा मार्ग म्हणून त्याकडे पाहा- असाच नवा पुणेरी वस्तुपाठ या संमेलनाने दिला.

परंतु हा पुणेरी धडा न गिरवणारेही अनेक लोक व संस्था आहेत; आणि त्यांनी वेगवेगळी संमेलने, पदरमोड करून किंवा स्थानिक पातळीवर जुळवाजुळव करून उत्साहाने पार पाडली. त्यातही वादविवाद झडलेच.

चोविसावे गोमंतक मराठी साहित्य संमेलन ह.मा.मराठे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष गोपाळराव मयेकर आणि नारायण आठवले यांच्यातील हमरीतुमरीने ते गाजले.

ख्रिस्ती साहित्य संमेलन अहमदनगरला झाले. त्यातही वाद झाले आणि आयोजकांपैकी एकाला राजीनामा देणे भाग पडले.

कंधारच्या बाविसाव्या मराठवाडा साहित्यसंमेलनात अध्यक्ष डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी मराठी मातृभाषेची महती गायिली. पण भाव खाऊन गेले, उद्घाटक शरद पवार. धनसंपत्तीऐवजी ज्ञान हेच खरे भांडवल आहे, ही संकल्पना रुजू लागली आहे, आणि गोरगरिबांनाही ज्ञानाचे महामार्ग खुले आहेत हे त्यांनी स्पष्ट केले. कुरुंदकर आणि डॉ. नांदापूरकर यांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

अ. भा. बालकुमार साहित्य संमेलनाच्या पंधराव्या अध्यक्षपदावरून रत्नाकर मतकरी यांनी आता मुलेच मुलांसाठी साहित्य लिहू लागतील अशी भावना प्रकट केली. दि. २१-२२ डिसेंबर २००२ रोजी सोळावे संमेलन सातारला झाले व पु. ग. वैद्य त्याचे अध्यक्ष होते. कुमारांसाठी विज्ञान कथा, व गणित काल्पनिका यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. मावळते अध्यक्ष रत्नाकर मतकरी आयोजकात राजकारणी व्यक्ती आहेत, म्हणून गैरहजर राहिले.

राष्ट्रीय बंधुता संमेलनाच्या अध्यक्षावरून डॉ. यू.म. पठाण यांनी आजचे सामाजिक व राष्ट्रीय प्रश्न हे मानवनिर्मित असून त्यामुळे, समाज दुभंगत आहे असा इशारा दिला. पाचव्या समरसता संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. प्रभा गणोरकर यांनी मराठीत स्त्रीवादी साहित्य आहेच कुठे असा प्रश्न विचारून स्त्रिया लिहितात ते पुरुषवाचकांसाठीच असा जोरदार हल्ला चढवला.

नोव्हेंबरमध्ये सांगलीत दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन झाले. प्राचार्य म. द. हातकणंगलेकर यांनी साहित्याच्या क्षेत्रात विविध प्रवाह येत असले तरी विकेंद्रीकरणामुळे

अनिष्ट व्यावहारिक वळणे वाढून, दिशाहीनतेचे वातावरण निर्माण होत आहे. या अनिष्ट विकेंद्रीकरणाला कुठेतरी आवर घालायला हवा असा त्यांचा सल्ला आहे.

अक्षरप्रतिष्ठानचे सहावे जिल्हा मराठी साहित्य संमेलन प्रा. भास्कर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली परभणीला झाले. डॉ. छाया महाजन यांनी संमेलनांच्या माध्यमातून साहित्याची चळवळ गतिमान हात असली तरी तिच्यात राजकारण शिरत आहे अशी तक्रार केली.

चिपळूणच्या कामगार साहित्य संमेलनाचे वर्णन राज्यमंत्री हेमंत देशमुख यांनी 'मराठी साहित्यात वाढू लागलेल्या हस्तीदंती गलबलाटामध्ये संपूर्ण वादातीत वादविरहित संमेलन' असे केले.

## संमेलनाचे अध्यक्षपद आणि वाद

साहित्य संमेलनाच्या यावेळच्या निवडणुकीतील उमेदवार मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांचे प्रचारदौऱ्यावर असताना गोमंतकात निधन झाले. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेविषयी पुन्हा एकदा संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. उमेदवाराला खूप हिंडावे लागते. दगदग होते. तेव्हा अशी दगदग टाळता येईल असा काही मार्ग नाही का? ... हा एक प्रश्न चर्चेत आला. डॉ. वाघमारे हे लातूरचे नगराध्यक्ष. त्यांच्या उमेदवारीमुळे राजकारणी लोकांनी या पदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरणे योग्य नाही अशी टीका दुसऱ्या एका उमेदवाराने केली. आधी नगराध्यक्षाचा राजीनामा द्या, मग निवडणूक लढवा असा सल्लाही देण्यात आला. पडेल उमेदवाराचे हे म्हणणे कोणीच मनावर घेतले नाही... पंचवीस लाखांचे अनुदान ही बाब अनेक छोट्या साहित्य संमेलन आयोजकांना खटकते आहे. डॉ. भारत पाटणकर प्रभृती विद्रोही मंडळींनी ते देऊ नये म्हणून सूर काढला आहे. डॉ. सुभाष भेंडे कऱ्हाडचे संमेलन उत्तम प्रकारे निभावून नेतील.

## तेंडुलकरी बाण्याचा आविष्कार

वर्ष सरता सरता विजय तेंडुलकरांना खडबडून जाग आली आणि 'चतुरंग'चा एक लाखाचा पुरस्कार श्री. पु.भागवत यांना माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते देण्यात येणार ही बातमी वाचून त्यांचे पित्त खवळले. तेंडुलकरांनी श्रीपुंनी हा पुरस्कार मनोहर जोशी यांच्यासारख्या 'भ्रष्ट' माणसाच्या हातून स्वीकारू नये असे पत्र लिहून ते श्रीपुंना न देता महाराष्ट्र टाइम्सला दिले. महाराष्ट्र टाइम्सने ते पहिल्या पानावर छापून तेंडुलकरांना हीरो बनवले. मनोहर जोशी यांच्या चारित्र्यावर टीका करणारे तेंडुलकरही काचेच्या घरात राहणारे असे सांगून 'मटा'च्याच अग्रलेख लेखकांनी त्यांना सबुरीचा सल्ला दिला. पुलंच्या महाराष्ट्रभूषणाच्या वेळचे आणि दादर संमेलनाच्या वेळचे हिंदुसम्राट सेनापतींचे उद्गार वादग्रस्त ठरले. आता विजय तेंडुलकर हे चारित्र्याचा पंचनामा करण्यासाठी पुढे आले आहेत. चतुरंगने आणि श्रीपुंनी तेंडुलकरांच्या सूचनेला केराची टोपली दाखवून त्यांचे आकांडतांडव निष्प्रभ ठरवले. उलट मनोहर जोशी या आपल्या एकेकाळच्या विद्यार्थ्यांच्या हातून हा पुरस्कार स्वीकारणे हा एक भाग्य योग असल्याचा आनंद व्यक्त केला.

माहिती तंत्रज्ञान याला मराठीचा पर्याय हा वाद आता जवळजवळ निकाली निघाला



आहे. तुकारामाचे वंशजच मराठीला मारायला निघाले आहेत, तेव्हा तिला वाचवायचे कशाला असा विचार बहुजन समाजाला मान्य होतो आहे, असे दिसते. पहिलीपासून इंग्रजी असल्याने एकूणच, मातृभाषेबद्दलचा आग्रह क्षीण होत आहे.

मराठी राज्यविकास संस्थेच्या अध्यक्षपदाची डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची कारकीर्द अल्पकालीन ठरली. मंत्र्यांसारखा दर्जा असणारे हे अध्यक्षपद आहे असे त्यांना वाटत होते, पण ते तसे नाही हे कळून आल्यावर त्यांचा उत्साह संपला. आता वसुंधरा पेंडसे-नाईक अध्यक्षा झाल्या आहेत. फावल्या वेळचा उद्योग म्हणून त्या या कामाकडे पाहणार नाहीत असे मानू या.

## काही विशेष वार्ता


कुसुमाग्रज प्रतिष्ठानला स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारने ५० लाखांची देणगी दिली.

केशवसुत स्मृती प्रकल्पातर्फे इ.स.२००५ पर्यंत अनेक उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

ग्रंथालय विकासासाठी व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली समितीने आपला अहवाल सादर केला आहे. नव्या ग्रंथपालासाठी ४ ते ६ हजार रुपयांच्या श्रेणी आहेत.

डॉ. ना. गो. नांदापूरकर यांची जन्मशताब्दी हैदराबादला साजरी झाली. स्मारकाला मदत देण्याचे आश्वासन शरद पवार यांनी दिले.

आपले साहित्य संमेलन कऱ्हाडला अभिनव पद्धतीने झाले. मुख्य प्रवाहाशी फटकून असणाऱ्या बहुतेकांनी हजेरी लावली. अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर यांनी आपल्या भाषणात आंबेडकरवादी, आदिवासी, जनवादी, भटकेविमुक्त, स्त्रीवादी, मुस्लीम इत्यादी सर्व घटकांनी एकत्र यावे, भारनिक आणि वैचारिक पातळीवर सर्वसंमत भूमिका ठरवावी, असे आवाहन केले. खरे तर हेच आवाहन व्यापक पातळीवरही व्हायला हवे. आज आपल्या अस्मितेच्या प्रकटीकरणासाठी छोटे छोटे गट आपली स्वतंत्र संमेलने भरवून आवाज उठवत आहेत. पण त्यांचा आवाज फार लोकांपर्यंत पोचतच नाही. त्या गटांचे साहित्यही थोडे आहे,आणि एकूण साहित्यव्यवहारात ते फारसे लक्षवेधक ठरू शकत नाही. ब्राह्मणी- अब्राह्मणी समीक्षाशास्त्र असा भेद करूनही, चांगले साहित्य हे विश्वसाहित्य आहे, ते मराठीच्या आणि भारतीय भाषांच्या सीमा पार करून जगभर जाऊ शकते, हे लक्षात ठेऊन केवळ चळवळीऐवजी उत्तम वाङ्मयीन निर्मितीवर भर दिला पाहिजे. यशवंत मनोहर यांनी सर्वसमावेशकतेचा धरलेला आग्रह हे एक शुभचिन्ह आहे. सवते सुभे खूप झाले, आता एकत्र येऊन आवाज उठवा हा या सरत्या वर्षाचा सांगावा आहे. चळवळीतून साहित्याकडे लक्ष जाते, पण चांगले साहित्य निर्माण होतेच असे नाहीच चळवळी ओसरतात. चांगले साहित्य टिकून राहते.



# नानी पालखीवाला : एक उत्तुंग, पारदर्शी व्यक्तीमत्व

**अनिल मेहता**



११ डिसेंबरला संध्याकाळी नानी पालखीवाला गेल्याची दुःखद बातमी समजली. त्यांच्या सहवासातले काही क्षण मनात जागे झाले.

नानी पालखीवाला यांचं नाव महान कायदेपंडित म्हणून ऐकलेले. घटना, प्राप्तीकर कायदा अशा सामान्य माणसाच्या दृष्टीने किचकट विषयांत नाना पालखीवाला यांचं नाव आदरानं घेतलं जातं. या विषयांवरच्या त्यांच्या लेखनापैकी 'वुई दी पीपलं' या इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचं मराठीत भाषांतर करायचं माझ्या मनात होतं. त्यासाठी या पुस्तकाचे हक्क मागण्यासाठी मी नाना पालखीवालांशी संपर्क साधायचा प्रयत्न करीत होतो.

'मूलभूत अधिकार हाच लोकशाहीचा मूलाधार आहे' हीच नानी पालखीवालांची जीवननिष्ठा होती. त्यांच्या गंभीर विषयांवरच्या गंभीर लेखनाला, सूक्ष्म विनोदी झालर आहे. अनेक विषयांचा मूलगामी परामर्श घेणारं 'वुई, दी पीपल' मराठीत आणावे अशी माझी फार इच्छा होती. या संदर्भात मी त्यांना मुंबईला फोन लावला. त्यांनी मला फोनवर सांगितलं, ''तीन सेकंदात बोल.'' त्यावर मी 'वुई दी पीपल' मराठीत भाषांतरित करून प्रकाशित करण्याची इच्छा प्रकट केली. त्यावर ते म्हणाले, ''तसं पत्र लिही.''

बस, एवढे तीनच शब्द......त्यांनी फोन बंद केला. त्यानंतर मी त्यांना तीन-चार पत्रं लिहिली, पण एकाही पत्राचं उत्तर आलं नाही. त्यामुळं या विषयात कशी प्रगती व्हायची ते मला कळेना. त्याच दरम्यान, नानी पालखीवालांशी संपर्क साधण्याचा एक मार्ग सापडला. माझे करसल्लागार बी. के. शहा यांचे मुंबईतले एक समव्यावसायिक मित्र नानी पालखीवालांचे संबंधित आहेत असं समजलं. नानी पालखीवालांची करविषयक कामं सांभाळणाऱ्या या महोदयांकडून मी नानींच्या घरचा फोन नंबर मिळवला. (हा फोन नंबर 'अनलिस्टेड' होता.)

मी त्यांना या नंबरवर फोन केला.

फोनवर त्यांनी विचारलं, ''तू उद्या येऊ शकशील?''

मी होकार दिला.

''ठीक आहे, येताना तुझ्या भाषांतरकाराला घेऊन ये,'' त्यांनी सांगितलं.

'वुई, दि पीपल' चं मराठी भाषांतर करण्याचं काम श्री. वि. स. वाळिंबे यांना द्यायचं होतं. नानींशी फोनवर झालेल्या संभाषणातून ते वेळेला किती महत्त्व देतात, ते माझ्या लक्षात आलं.

फोनवर त्यांनी मला विचारलं होतं की, ''तू मुंबईला कसा येणार आहेस? आणि



परत केव्हा आणि कसा जाणार आहेस?''

डेक्कन क्वीननं येऊन त्याच गाडीनं पुन्हा परतणार असल्याचं मी त्यांना सांगितलं. त्यानुसार त्यांनी मला दुपारी दीड ही भेटीची वेळ दिली. ठरलेल्या वेळी मी आणि श्री. वाळिंबे त्यांच्याकडं गेलो, पण त्यांची सेक्रेटरी आम्हाला आत सोडायला तयार होईना. तिच्याकडच्या भेटींच्या नोंदीत आमचं नाव नव्हतं. अखेर मोठ्या मिनतवारीनं ती माझं व्हिजिटिंग कार्ड आत घेऊन जायला तयार झाली.

कार्ड पाहिल्याबरोबर लगेच त्यांनी आम्हाला आत बोलावलं.

नानी पालखीवालांची आणि माझी ती पहिली भेट. त्या पहिल्या भेटीतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, साधी राहणी, निगर्वी स्वभाव या त्यांच्या वैशिष्ट्यांची माझ्यावर छाप पडली. माझं आडनाव मेहता, त्यामुळं मी गुजराथी असणार ही गोष्ट ओळखून ते माझ्याशी गुजराथी भाषेत बोलू लागले. मला तर गुजराथी भाषेचा गंधसुद्धा नाहीय. त्यांचं बोलणं संपताच, मी त्यांना इंग्रजीत बोलण्याची विनंती केली आणि मला गुजराथी येत नसल्याचं सांगितलं. श्री. वाळिंबे यांनी अनुवादित केलेली काही पुस्तके आम्ही सोबत नेली होती, ती त्यांना दाखवली. त्या पुस्तकांत अरुण शौरी यांच्या एका पुस्तकाचा मराठी अनुवादही होता. अरुण शौरी त्यांचे मित्र. त्यामुळं नानींनी भाषांतर करायला चटकन् परवानगी दिली. मराठी येत नसल्यामुळं त्यांनी या पुस्तकाचा अनुवाद एका संपादकाकडून तपासून घ्यायला सांगितलं. या संपादकाचा मला वाईट अनुभव आला होता त्यामुळं नानींच्या या सूचनेला स्पष्ट नकार देऊन मी म्हणालो, ''मी अनुवाद तुमच्याकडं पाठवतो. तुम्ही तो कुणाकडूनही तपासून घ्या.'' शेवटी मी त्यांना रॉयल्टीबद्दल विचारलं. त्यावर ते म्हणाले, ''मला रॉयल्टी नको, पण पुस्तकाचा अनुवाद आणि पुस्तकनिर्मिती अत्युत्तम दर्जाची हवी.'' या गोष्टीला मी अर्थातच होकार दिला.

या भेटीत मी त्यांच्याकडून आणखी एक गोष्ट कबूल करून घेतली, ती म्हणजे 'वुई, दि पीपल' च्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाला त्यांनी सपत्नीक यायचं. माझी ही विनंती त्यांनी मान्य केली. तिथून बाहेर पडल्यानंतर श्री. वाळिंबे मला म्हणाले, ''मलाही या पुस्तकाची रॉयल्टी नको.''

हे पुस्तक तयार झाल्यानंतर मी काही प्रती त्यांना दाखवायला नेल्या. त्यांना पुस्तक खूप आवडलं. मात्र, प्रकाशन समारंभाला येण्यासाठी त्यांना तीन-चार महिने तरी वेळ नव्हता. त्यामुळं ते म्हणाले,''तू प्रकाशनाआधीच बाजारात पुस्तकं विक्रीला उपलब्ध कर.''

या गोष्टीला मी कबूल झालो नाही. मी त्यांना सांगितलं की, ''तुम्हाला वेळ नसेल तर, तीन-चार महिने या पुस्तकाच्या प्रती गोडाऊनमध्ये पडून राहतील. पण मी प्रकाशनाआधी या पुस्तकाची विक्री करणार नाही.''

पुस्तकं गोडाऊनमध्ये! 'गोडाऊन' हा शब्द ऐकताच त्यांना राग आला. 'तुम्ही प्रकाशनसमारंभाला येण्याचं कबूल केलंय' या गोष्टीचं मी त्यांना स्मरण करून दिलं आणि त्यांना वेळ होईपर्यंत प्रकाशनासाठी बिनतक्रार थांबायला तयार असल्याचं सांगितलं. मग त्यांनी पंधरा दिवसांतली तारीख दिली आणि प्रकाशनसमारंभ ठरला... तोही त्यांच्या उपस्थितीत.

पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात ठरला. त्या दिवशी सकाळी नानी पालखीवाला सपत्निक पुण्याला आले. विमानतळावर त्यांना आणण्यासाठी

टेल्को कंपनीची मर्सिडिज गाडी आली होती. मी माझ्या पुण्यातल्या मित्राची - डॉ. अनिल गांधी यांची मर्सिडिज कार घेऊन त्यांना आणायला गेलो होतो. ''आज तुम्ही माझे पाहुणे आहात'' असं म्हणून मी त्यांना आमच्यासोबत येण्याची विनंती केली. आमच्या विनंतीला मान देऊन ते आमच्यासोबत आले. संध्याकाळी कार्यक्रमाला त्यांना आणण्यासाठी डॉ. अनिल गांधी आणि श्री. वाळिंबे त्यांच्या गेस्ट हाऊसवर गेले होते. डॉ. गांधी अत्यंत तणावग्रस्त मन:स्थितीत ड्रायव्हिंग करत होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी आल्यावर डॉ. गांधींना पाठीवर शाबासकी देत पालखीवाला मिस्किलपणे म्हणाले ''यू आर गुड शोफर'' त्या दिवशी दुपारी मी त्यांचा एक तास वेळ मागितला, तोही त्यांनी दिला. दुपारी दीड वाजता मी आणि श्री. वाळिंबे अनुवादित पुस्तकाच्या शंभर प्रती घेऊन त्यांच्याकडं गेलो. या प्रतींवर आधीच त्यांच्या सह्या घेतल्या. प्रकाशनसमारंभाच्या ठिकाणी ऐनवेळी खूप गर्दी होणार याची खात्रीच होती, त्यामुळे आम्ही दुपारीच सह्या घेऊन ठेवल्या. एका तासात त्यांनी शंभर सह्या केल्या. त्यांच्या पत्नी मिष्किलपणे हसत होत्या. नानींच्या सह्या करून झाल्यानंतर त्या माझी पाठ थोपटत म्हणाल्या, ''यांना सह्या करण्याचा फारच आळस आहे आणि तू तर त्यांच्याकडून तासाभरात चक्क शंभर सह्या करून घेतल्यास! म्हणून तुला ही शाबासकी!''

पुस्तक प्रकाशनसमारंभाचे अध्यक्ष शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू के. भोगीशयन होते. सभागृह तुडुंब भरलं होतं. प्रसिद्ध विचारवंत ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी यांच्यासह अनेक नामवंत विद्वान कार्यक्रमाला हजर होते. सभागृहात बसायला जागा नव्हती. बाहेर तीन-चारशे लोक उभे होते. त्यातली शे-दीडशे माणसं आत येण्याची परवानगी घेऊन आत आली आणि सभागृहात जागा मिळेल त्या ठिकाणी चक्क मांडी घालून खाली बसली. कार्यक्रमाचे अध्यक्ष के. भोगीशयन यांना नानी पालखीवालांच्या आधी बोलायला सांगितलं होतं. त्यांचं भाषण अतिशय सुंदर झालं. नानी मला म्हणाले,''इतक्या उत्तम भाषणानंतर मी काय बोलू? माझं भाषण आधी ठेवलं असतं, तर मी अधिक चांगलं बोललो असतो,'' असं ते म्हणाले तरी त्यांचंही भाषण अतिशय सुरेख झालं. त्यांच्या भाषणाचं पहिलं वाक्य होतं -''मी अनेक पुस्तकं लिहिली, पण कोणत्याही पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झालेला नाही. त्यामुळं माझ्या आयुष्यातला हा पहिलाच प्रकाशनसमारंभ आहे.''

पुढं, 'वुई, द नेशन' हे त्यांचं इंग्रजी पुस्तक प्रकाशित झालं. त्यानंतर त्यांनी मला आपणहून फोन करून सांगितलं की, ''हे पुस्तक तू मराठीत आणावंस, अशी माझी इच्छा आहे.'' मी अर्थातच होकार दिला. त्यांच्या याही पुस्तकाचा अनुवाद श्री. वि. स. वाळिंबे यांनीच केला. या दोन्ही पुस्तकांचं स्वागत अतिशय उत्तम झालं. आम्ही अनुवादित केलेल्या पुस्तकांच्या लेखकांपैकी किरण बेदी आणि अरुण शौरी या आपापल्या क्षेत्रातल्या मातब्बर मान्यवरांना कोल्हापूरला आमंत्रित करून त्यांच्या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचा प्रकाशन सोहळा साजरा होण्याचा योग आला, तसंच नानी पालखीवाला यांनाही कोल्हापूरला आमंत्रित करून 'वुई द नेशन' चा प्रकाशन समारंभ करायचं माझ्या मनात फार होतं, पण नानींना वेळ मिळत नव्हता. सांजसावल्याही घेरू लागल्या होत्या.

गेल्याच वर्षी 'पतेती'च्या दिवशी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फोन केला होता, त्यावेळी त्यांच्या सहकाऱ्यानं त्यांच्या प्रकृतीअस्वास्थाबद्दल सांगितलं. 'वुई, दि नेशन'च्या प्रकाशन समारंभाचा योग जुळून न आल्याचं दु:ख माझ्या मनात सदैव राहील.



## साहित्यवार्ता

### पुस्तकाचे निर्मितीमूल्य राखणे प्रकाशकांचे कर्तव्य : डॉ. भेंडे

''छपाई चांगली नसेल, तर चांगला मजकूरही फुकट जातो. त्यामुळे पुस्तकाचे निर्मितीमूल्य अतिशय चांगले राखणे हे प्रकाशकांचे आद्यकर्तव्य आहे'', असे प्रतिपादन ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.सुभाष भेंडे यांनी केले.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ आणि पुणे विद्यापीठ संज्ञापन व वृतपत्रविद्या विभाग यांच्यातर्फे व.न.गोगटे स्मृती ग्रंथ संपादन व प्रकाशक व्यवसाय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सहा दिवस चालेल्या या कार्यशाळेचा समारोप आणि प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम डॉ. भेंडे यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रकाशक संघाचे अध्यक्ष शरद गोगटे आणि वृतपत्रविद्या विभागाचे प्रमुख किरण ठाकूर या वेळी उपस्थित होते.

वाचन संस्कृती ढासळत चालली असल्याने प्रकाशन व्यवसाय धोक्यात येण्याची शक्यता आहे, अशी भीती सुरवातीला व्यक्त करून डॉ.भेंडे म्हणाले, ''माध्यमांची संख्या वाढत चालली आहे. अग्रक्रमही बदलत आहेत. त्यामध्ये पुस्तकखरेदीचा क्रम शेवटचा असतो; किंबहुना तो नसतोच. किमती वाढत असल्याने पुस्तकखरेदीचा क्रम शेवटचा असतो; किंबहुना तो नसतोच. किमती वाढत असल्याने पुस्तक खरेदी परवडत नाही, हा त्यासाठी करण्यात येत असलेला दावाही खोटा आहे.''

''प्रकाशक आणि लेखक यांचे संबंध मैत्रीचे व जिव्हाळ्याचे असले पाहिजेत. त्यांच्यात एकमेकांविषयी विश्वास असणे महत्त्वाचे आहे. पैशाचे व्यवहार चोख असतील, तर त्यांचे संबंध चांगले राहतात,'' असे त्यांनी नमूद केले. ''प्रकाशकाने आपली आवड लेखकावर लादता कामा नये; तसेच त्याने लेखकाला त्याच्या शैलीत बदल करायला लावणेही चुकीचे आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

आपल्याकडे जुन्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथांची जपणूक करण्याची व्यवस्था नाही, अशी खंत व्यक्त करून डॉ. भेंडे म्हणाले,''ग्रंथालयाला मिळणारी अनुदाने कमी असतात. शिवाय ती वेळेवरही मिळत नाही, त्याचाही परिणाम पुस्तकाच्या विक्रिवर होतो.''

श्री. ठाकूर यांनी स्वागत केले. शरद गोगटे यांनी कार्यशाळेचा थोडक्यात आढावा घेतला. राजीव बर्वे यांनी आभार मानले. या कार्यशाळेला दहा जिल्ह्यांतून ३७ प्रशिक्षणार्थी उपस्थित राहिले होते.

## ‘परभाषेतील साहित्याचे अनुवाद जाणीवपूर्वक व्हावेत’

“नवनिर्मितीपेक्षाही अनुवाद करणे ही अधिक परिश्रम करायला लावणारी गोष्ट असली, तरी मराठी साहित्य अधिक समृद्ध होण्यासाठी परभाषेतील साहित्याचे जाणीवपूर्वक अनुवाद होणे गरजेचे आहे,” असे मत ज्येष्ठ समीक्षक व साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले

प्रख्यात हिंदी लेखक गोविंद मिश्र यांच्या ‘पाँच आंगनो वाला घर’ या व्यास पुरस्कार विजेत्या कादंबरीचा प्रा. लीला बांदिवडेकर यांनी ‘पाच अंगणांचं घर’ या नावाने मराठीत अनुवाद केला आहे. पद्मगंधा प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री. मिश्र होते.

इतर भाषा शिकून, ती अवगत करून त्याच्या साह्याने अनुवाद करण्याचा प्रयत्न मराठीत फारसा होत नाही, अशी खंत डॉ. कोत्तापल्ले यांनी व्यक्त स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी वाङ्मयाची फार मोठी परंपरा होती; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मराठी भाषा तयार होण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. आता अनुवादकालाही प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागल्याने येथून पुढे तसे प्रयत्न होतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

‘पाच अंगणांचं घर’ या ग्रंथाविषयी बोलताना ते म्हणाले, “मराठी वळण दिवसेंदिवस बिघडत चालले असताना श्रीमती बांदिवडेकर यांनी मराठीच्या वळणाचा वाटावा असा अनुवाद केला आहे.” स्वातंत्र्योत्तर काळात झालेले सामाजिक व राजकीय बदल श्री. मिश्र यांनी नेमकेपणे हेरले आहेत.

प्रेमाने केलेला कोणताही अनुवाद हा निश्चितपणे चांगलाच होतो, असे मत मिश्र यांनी व्यक्त केले. मी साहित्याला काय दिले, यापेक्षा साहित्याने मला काय दिले, याचाच विचार मी नेहमी करीत असतो. त्यामुळे साहित्याने मला जे दिले त्यामुळे मी उपकृत झालो आहे आणि म्हणूनच समाधानीही आहे, असे त्यांनी सांगितले.

पद्मगंधा प्रकाशनाचे अरूण जाखडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

## देश एकसंध ठेवण्यासाठी गदिमांचे काव्य आजही उपयोगी

‘मी भारतीय आहे, जो जो स्वकीय तो तो भारतीय आहे,’ हा गदिमांनी काव्यातून दिलेला संदेश देश एकसंध ठेवण्यासाठी आजही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केले.

गदिमा प्रतिष्ठानतर्फे ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून पवार बोलत होते. कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतकार दत्ता डावजेकर यांना ‘गदिमा पुरस्कार’, प्रसिद्ध अभिनेत्री रेखा कामत यांना ‘गृहिणी सखी सचिव पुरस्कार आणि मृणाल देव कुलकर्णी हिला ‘चैत्रबन पुरस्कार’ पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष विसुभाऊ आरेकर, कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर, सुमित्र माडगूळकर या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमात मधुकर कुलकर्णी यांना ‘गदिमा स्नेहबंध पुरस्कार’ आणि गेल्या वर्षी शालान्त परीक्षेत राज्यात मराठी विषयात प्रथम आलेल्या महेश बाले याला ‘गदिमा पारितोषिक’ देण्यात आले.



गदिमांचे मातृभूमीवर प्रचंड प्रेम होते. त्यासाठी पडेल ती किंमत द्यायची त्यांची तयारी होती. भारतीयांच्या मनातील एकात्मतेची भावना त्यांनी अनेक गीतांतून व्यक्त केली आहे, असे शरद पवार म्हणाले, ‘मी भारतीय आहे, जो जो स्वकीय तो तो भारतीय आहे,’ ही अण्णांची संपूर्ण कविताही त्यांनी यावेळी भाषणाच्या ओघात वाचून दाखविली. देशासमोर आज अनेक प्रश्न उभे असताना देश एकसंध ठेवण्यासाठी हीच भारतीयत्वाची शिकवण उपयोगी पडणार आहे, असेही पवार म्हणाले.

माणदेशापासून सुरू झालेल्या आणि औंध संस्थान, कोल्हापूर, मुंबईमार्गे पुण्याच्या ‘पंचवटी’पर्यंत झालेल्या अण्णांच्या जीवन प्रवासाचे सविस्तर वर्णन करून पवार म्हणाले की, महाराष्ट्राची सांस्कृतिक उंची वाढविण्याचे काम आजवर अनेकांनी केले. अण्णा हेदेखील अस्सल माणदेशी शक्तिपीठ आहे. ‘मराठी रसिकतेला नवे भान देणारी गुणसंपन्न बहुरूपी’, अशा शब्दांत त्यांनी गदिमांचा गौरव केला. अण्णांच्या लिखाणात जेवढी ताकद होती तेवढीच ताकद वक्तृत्वातही होती. असा लेखक आणि वक्ता मी आजवर पाहिला नाही, असे दत्ता डावजेकर यांनी म्हटले. गदिमांच्या नावाने मिळालेल्या पुरस्काराचे महत्त्व वेगळे आहे. मिळालेले इतर अनेक पुरस्कार मोजण्याचे असतात. पण हा मिरविण्याचा पुरस्कार आहे, असे मृणाल देव-कुलकर्णी हिने सांगितले. रेखा कामत यांनी गदिमा कुटुंबातील अनेक आठवणींना या वेळी उजाळा दिला. प्रा. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमानंतर बार्स ॲण्ड टोन टेलिव्हिजन निर्मित गदिमांवरील अनुबोधपट दाखविण्यात आला.

## ‘निरीक्षणातून माझ्यातील दिग्दर्शक घडत गेला’

‘माझ्या कारकीर्दीची सुरुवात अभिनयाने झाली असली तरी निरीक्षणातून माझ्यातील दिग्दर्शक घडत गेला’ असे ‘लगान’फेम लोकप्रिय दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी सांगितले.

निमित्त होते ‘सिम्बॉयोसिस इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन’ तर्फे आयोजित ‘फेस्टोकॉम’ महोत्सवाचे. यावेळी मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले लघुचित्रपट दाखवण्यात आले.

गोवारीकर म्हणाले की, पुण्यामध्येच १९९० मध्ये चित्रपट रसग्रहणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यामुळे चित्रपटाच्या विविध अंगांची बारकाईने माहिती झाली. चित्रपटांची निर्मिती प्रक्रिया नेमकी कोणकोणत्या टप्प्यातून जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. त्याचा फायदा ‘लगान’चे दिग्दर्शन करताना झाला.

‘लगान’च्या निर्मितीविषयी गोवारीकर म्हणाले की, या चित्रपटाच्या संहितेवर बराच काळ खर्च केला. त्यात वारंवार अनेक बदल केले. साधारण अडीच वर्षांचा कालावधी या संहिता लेखनाच्या प्रक्रियेत गेला. आपल्याकडे संहिता लेखनापूर्वी त्यावर फारसा विचार केला जात नाही. वास्तविक उत्तम संहिता लेखनासाठी त्याची नितांत आवश्यकता असते. संहिता लेखनापूर्वीच्या प्रत्येक टप्प्यावर संहितेशी संबंधित विविध घटकांशी वारंवार चर्चा करणे आवश्यक असते. त्यामुळे बांधीव, ठाशीव संहिता लिहिणे शक्य होते.

चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या कलावंतांचा आग्रह जर संहितेशी विसंगत असेल तर दिग्दर्शकाला नाही म्हणता आले पाहिजे, असही गोवारीकर म्हणाले. पार्श्वसंगीताचेही स्थान चित्रपटाच्या कथानकामध्ये महत्त्वाचे ठरते, असे सांगून गोवारीकर यांनी ए.आर. रहमान हे एक उत्कृष्ट पार्श्वसंगीतकार असल्याचे सांगितले. पी.के.नायर, सतीशकुमार यांचीही यावेळी भाषणे झाली.

## दुर्गाबाई भागवतांवरील लघुपटासाठी आवाहन

पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर संशोधनपर लघुपट बनविणाऱ्या अंजली कीर्तने यांनी ज्येष्ठ लेखिका दिवंगत दुर्गाबाई भागवत यांच्यावरील लघुपटाचे काम हाती घेतले असून त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी साहित्य-संस्कृतीप्रेमींना आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे.

धर्म, मानववंशशास्त्र, लोकजीवन, तत्त्वज्ञान, साहित्य, काव्य येथपासून ते पाककला, भरतकाम, वीणकाम, आदी गोष्टींपर्यंत कोणताही विषय वर्ज्य न मानता त्यावर मनन, चिंतन आणि लेखन करणाऱ्या, तसेच आणीबाणीत अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या दुर्गाबाईंच्या योगदानाची नोंद लघुपटासारखी प्रभावी माध्यमातून घेतली जावी व त्यांच्या कर्तृत्वाचे जतन व्हावे, हा आपला हेतू असल्याचे कीर्तने यांनी म्हटले आहे. या लघुपटाची निर्मिती १६ एम.एम.वर करण्यात येणार आहे.

साहित्यादी कलांचे सरकारीकरण होऊ नये, कलावंतांनी स्वत:चे स्वातंत्र्य जपावे, सरकारचे मिंधे होऊ नये, आनुदाने स्वीकारू नयेत अशी दुर्गाबाईंची भूमिका होती. त्यामुळे सरकारी मदत न घेता तयार करण्यात येणाऱ्या या खर्चिक लघुपटासाठी साहित्यप्रेमी, सुसंस्कृत नागरिक आणि सांस्कृतिक भान असणाऱ्या संस्थांनी आर्थिक मदत करावी.

या लघुपटातील दुर्गाबाईंवर जी दृश्ये चित्रित व्हायची होती त्यांचे चित्रीकरण दुर्गाबाईंच्या निधनापूर्वी दीड-दोन महिने आधीच त्यांच्या निवासस्थानी झाले होते. या चित्रीकरणात दुर्गाबाईंसह कॉ. अहिल्या रांगणेकर, दुर्गाबाईंचे मानसपुत्र डॉ. विश्वास पाटील, पद्मजा फेणाणी, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी भाग घेतला होता. हा लघुपट डॉक्युड्रामा धर्तीचा असून त्याच विविध वयातील अभिनेत्री दुर्गाबाईंची व्यक्तिरेखा साकारणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अमेरिकेतील अधिवेशन

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे या वर्षी जुलै महिन्यात न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या मराठी भाषिकांच्या अधिवेशनाला लोकसभेचे अध्यक्ष मनोहर जोशी यांना उद्घाटक म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.

न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर येथे ४ ते ६ जुलै या दरम्यान हे अधिवेशन होणार असून त्याला सहा हजार मराठी भाषिक उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे.

उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा वंदना टिळक यांनी जोशी यांना या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून आमंत्रित करणारे पत्र पाठवले आहे.



**संतसाहित्य** शब्दकोश
चतुष्ट्याची सांगता

प्राचीन साहित्याच्या आकलनासाठी शब्दकोशाची नितान्त ‘‘गरज असते. एका ज्ञानेश्वरीच्या कोशाशिवाय संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम व समर्थ रामदास यांच्या साहित्याचे कोश उपलब्ध नाहीत. हे ध्यानी घेऊन डॉ. कानडे अणि रा. शं नगरकर यांनी या सर्व ग्रथांचे कोश सिद्ध केले. या चारही ग्रंथांची पृष्ठसंख्या १२३६ असून त्यांची शब्दसंख्या ४५ हजार आहे.

या कोशांमध्ये शब्दाचे मूळ रूप, त्याचे व्याकरण, अर्थ आणि एक वा दोन संदर्भ अशी पद्धती स्वीकारली आहे. शक्य तेथे वाक्प्रचारही दिलेले आहेत. प्रत्येक कोशाला शब्दसंग्रहाची वैशिष्ट्ये सांगणारी प्रस्तावना जोडली आहे आणि कोशाच्या अखेरीला कोशातील विशेषनामे, पशुपक्षी, वृक्ष-वनस्पती, नद्या डोंगर आणि फारसी-अरबी शब्दांची परिशिष्टे जोडून कोशाची उपयुक्तता वाढविण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे.

दासबोधावरील कोशाची रचना थोडीशी भिन्न आहे. इंग्रजीत ज्याला 'Index Verborum' म्हणतात, अशा प्रकारची ही रचना आहे. मूळ शब्द, त्याचे व्याकरण, शक्य तेथे व्युत्पत्ती अर्थ असा क्रम स्वीकारला आहे. दासबोधात शब्दाची जितकी रूपे आली व त्या शब्दांचे जितके संदर्भ आले, त्या प्रत्येक संदर्भाची नोंद या कोशात केली आहे. हा ग्रंथ म्हणजेच डॉ. कानडे यांच्या पीएच.डी. प्रबंधाची पूर्वतयारी होती. अशा प्रकारचा, मराठीतील हा पहिलाच कोश आहे.

दासबोधाशिवाय अन्य सर्व ग्रंथांना पुणे विद्यापीठ , ह.भ.प. किसनमहाराज साखरे, नामदेव समाजोन्नती परिषद, देहू संस्थान आणि काही धनिक व्यक्ती यांनी उदार मनाने आर्थिक साह्य केले आहे.

## वारकरी व रामदासी संप्रदायात कोणतेही मतभेद नाहीत: साखरे

वारकरी संप्रदाय व रामदासी संप्रदाय यांच्यात मतभेद असल्याचा गैरसमज महाराष्ट्रात आहे. दोन्ही संप्रदायात कोणतेही मतभेद नसून समर्थ रामदास स्वामींनीदेखील पंढरीची वारी केली होती, असे मत किसनमहाराज साखरे यांनी व्यक्त केले.

डॉ. मु. श्री.कानडे आणि रा. शं. नगरकर यांनी संपादित केलेल्या नामदेव गाथा व दासबोध यावरील शब्दकोशांचे प्रकाशन सकाळचे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. मा. बाचल, आदी या प्रसंगी उपस्थित होते.

ह.भ.प. साखरे म्हणाले, ‘मराठी भाषा उगम होतानाच तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊन आली आहे. वेदांचे प्रतिध्वनी संतसाहित्यात उमटले आहेत. समर्थ रामदास स्वामींचे साहित्य देखील त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. वारकरी व रामदासी संप्रदायांत त्यामुळे मतभेद नाहीत. पंढरीच्या वारीत समर्थांना विठ्ठलरूपात रामाचे दर्शन झाले होते. या दोन संप्रदायांत मतभेद असल्याचे अपसमज दूर व्हायला हवेत.’

श्री. दीक्षित म्हणाले, ‘संस्कृतीचा धांडोळा शब्दांच्या आधारे घेता येतो. त्या दृष्टीने

शब्दकोश महत्त्वाचे ठरतात. महाराष्ट्राला कोशवाङ्मयाची परंपरा आहे. ही परंपरा कानडे व नगरकर यांच्या कोशामुळे पुढे सुरू राहिली आहे. 'संत तुकारामाचा अभ्यास' या पुस्तकात नगरकर यांनी तुकारामांच्या जडणघडणीचा, अभ्यासाचा आढावा घेतला आहे. निर्मळ भावनेतून त्यांनी हे लिखाण केले आहे.' श्री. बाचल व कल्याण काळे यांनी ग्रंथांचा परिचय करून दिला. रमण चितळे यांनी सूत्रसंचालन केले.

**नवा शब्दकोश**
**ऑस्ट्रेलियातील इंग्रजी भाषेच्या गंमतीजमती**

ऑस्ट्रेलियात येण्यापूर्वी माझे बहुतेक सारे आयुष्य पुणेरी वातावरणात गेले. लिहिण्यावाचण्याइतपत इंग्रजी मला येत होते. पुणे विद्यापीठाच्या प्रगत संस्कृत अध्ययन केंद्रात मी ग्रंथपाल होतो. त्यावेळी अनेक अमराठी तज्ज्ञ तिथे असल्याने त्यांच्याशी व्यवहारापुरते इंग्रजी बोलण्याचा सरावही मला झाला होता. ऑस्ट्रेलियात आल्यावर माझ्या लक्षात आले, की काही काही इंग्रजी शब्दांचा उपयोग आपल्या इकडल्यापेक्षा निराळ्या अर्थानेही इकडे केला जातो. असे काही शब्द माझ्या चांगले लक्षात राहिले आहेत.

एकदा, इथल्या एका मराठी कुटुंबाला त्यांच्या ऑस्ट्रेलियन मित्राने शनिवारी 'टी' ला बोलावले. हे कुटुंब दुपारी चार-साडेचारला मित्राकडे हजर झाले. गप्पागोष्टी, चहापान वगैरे मध्ये तास-दीड तास मजेत गेला. नंतर मित्राची बायको उठून स्वयंपाकघरात गेली आणि बशा, काटे-चमचे, वगैरे टेबलावर मांडू लागली. तुमच्याकडे कुणीतरी जेवायला येणार आहे, असे दिसते, तेव्हा आता आम्ही निघतो,' असे आपल्या बाईंनी म्हटल्यावर ऑस्ट्रेलियन यजमानीणबाई म्हणाल्या, 'अहो, तुम्हालाच आम्ही टी ला बोलावले आहे, इतक्यात कुठे चाललात?' संध्याकाळच्या जेवणाला टी म्हणतात, हे माहीत नसल्याने हा गोंधळ!

या उलट झालेला प्रकारही सांगण्यासारखा आहे. टी म्हणजे चहा या विषयी नि:शंक असणाऱ्या भारतीय व्यक्तीने आपल्या ऑसी मित्राला 'टी'ला बोलावले. चहापान, हवामानाच्या आणि खेळाच्या गोष्टी झाल्यानंतर आता हा ऑस्ट्रेलियन दोस्त हलेल म्हणून यजमान वाट पहात बसले. शेवटी रात्रीच्या जेवणाची वेळ झाली तरी दोस्त आपला गप्पांत रंगलेलाच हे पाहून यजमान म्हणाले, 'आता जेवण करूनच जा.' अतिथीच्या चेहऱ्यावर थोडे आश्चर्य दिसले; पण तो जेवण करूनच परत गेला.

एका छोट्याशा समारंभाच्या निमंत्रणात, 'येताना प्लेट आणावी' अशी सूचना होती. प्लेट म्हणजे एखादा खाद्यपदार्थ हे लक्षात न आल्याने एक महिला मोठी बशी (अर्थातच रिकामी) घेऊन आल्याचे आम्ही पाहिले आहे. हॉटेल म्हणजे राहण्याची जागा, मटीरियल म्हणजे कापड, सर्जरी म्हणजे दवाखाना, जंपर म्हणजे डोक्यातून घालायचा स्वेटर असा नवा शब्दकोश आता माझ्याकडे तयार होऊ लागला आहे.

ह. बा. उमराणीकर (सकाळ)



**हॅरी पॉटरच्या 'शाळे'ची मोडतोड!**

जगभरच्या बच्चेकंपनीला वाचनाकडे आणि चित्रपटाकडे ओढणाऱ्या हॅरी पॉटरच्या 'शाळे'च्या खिडक्यांच्या काही तावदानांची मोडतोड झाली असून ही हानी ४३ हजार पौंडांच्या घरात आहे.

चित्रपटासाठी हॅरी पॉटरची शाळा म्हणून ग्लोसेस्टर कॅथेड्रल या ब्रिटनमधील अतिशय जुन्या चर्चचा परिसर वापरला गेला होता. धर्मप्रचारकांकडून प्रार्थनेसाठी वापरले जाणारे हे कॅथेड्रल ९०० वर्षे जुने आहे. ज्या खिडक्यांचा चित्रपटांत वापर केला गेला त्या १८६० सालातील आहेत.या कॅथेड्रलमध्ये चित्रीकरण होऊ नये, अशी मागणी काही धर्मवाद्यांनी केली होती. अर्थात या मागणीसाठीची निदर्शने शांतपणे होत असत आणि त्यामुळे ही तावदाने फोडण्यामागे समाजकंटकांचाच हात असावा असा संशय आहे.

**लेखकाने जोखीम घ्यायला हवी : राजन गवस**

''लिहिणे ही मिरवायची गोष्ट नसून सत्त्व पणाला लावून टिकवायची गोष्ट आहे. त्यासाठी लेखकाने जोखीम घ्यायची तयारी ठेवायला हवी,'' असे मत प्रख्यात कादंबरीकार राजन गवस यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेच्या सातव्या संमेलनाचे गवस यांच्या हस्ते कोल्हापूरला उद्घाटन झाले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते.

गवस म्हणाले, आपले वर्चस्व टिकविण्यासाठी सर्वांना चिरडून टाकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सत्ता यशस्वीपणे करीत आहे. सामान्य माणसाला हतबल ठेवण्यात राजकारणी धन्यता मानत आहेत. सर्व धर्मातील मूलतत्त्ववादी आपली शोषणयंत्रणा बळकट करण्यासाठी जाती-धर्मात तणाव निर्माण करण्याचे काम करत आहेत. शेतातील मातीपासून डोक्यातल्या मेंदूपर्यंत सर्व कसे नासवता येईल यासाठी स्पर्धा चालली आहे. यातूनच संवादाची शक्यता संपविणे, चिकित्सा नाकारणे या गोष्टींचा अतिरेक सुरू आहे. अशा गरगरून टाकणाऱ्या वास्तवात सामान्यांचा भाष्यकार असणारा लिहिणारा वर्ग आणि विचार मांडणारा विचारवंत वर्ग नेमके काय करतो आहे? लेखक आजच्या वर्तमानाला प्रतिक्रिया का देत नाही? लिहिणे ही जर जबाबदार कृती असेल, तर ही कृती जबाबदारीने करणे लेखक का टाळतो आहे? आज जोखीम पत्करणाऱ्या लेखकांची संख्या किती? त्यात आपण आहोत का? ती वाढविण्यासाठी काय बंदोबस्त करायला हवा, याचा विचार करायला हवा. लेखकाकडे सत्य मांडण्याएवढी निर्भयता हवी.''

**महाराष्ट्राच्या लावणी नृत्याची वाढती लोकप्रियता**

महाराष्ट्राची खासियत समजल्या जाणाऱ्या लावणीला पुन्हा एकदा बरे दिवस येण्याची चिन्हे दिसत असून घुंगरांचा नाद आणि ढोलकीचा कडकडाट यांना पुन्हा एकदा लोकप्रियता मिळू लागली आहे.

देशातील अन्य कलाकारांप्रमाणेच महाराष्ट्रातही लोकजीवनातील कलांवर धार्मिक,

आध्यत्मिक विचारांचा पगडा आढळून येतो. लावणीने मात्र हे आध्यात्मिक अवडंबर झुगारून देत, सर्वसामान्यांना प्रिय असलेला शृंगार आणि प्रणयाराधन हा साज आपलासा केला. आध्यात्मिक खुराकाला कंटाळलेल्या जनसमुदायाने ही लावणी लगेचच आपलीशी केली आणि लावणीची ही लोकप्रियता शतकानुशतके टिकून राहिली.

कोल्हाटी आणि डोंबारी समुदायाच्या लोकांनी ही कला आपलीशी केली आणि लावणी, गण, गवळण यांनी बनणाऱ्या तमाशात या समुदायांची मातब्बरी निर्माण झाली. कमनीय तरुणींचे चटकदार नृत्य, ढोलकी, तुणतुणं आणि घुंगरांचा वेडावणारा नाद असा फड गावोगावी रंगू लागला.

गेल्या काही वर्षांत मात्र नाटक, चित्रपट अशा माध्यमांच्या आक्रमणाने लावणी संकटात आली होती. तमाशाची थेटरे बंद पडू लागल्याने अनेक प्रसिद्ध बाऱ्या गुंडाळल्या गेल्या. आता पुन्हा एकदा लोकांची पावले तमाशाच्या फडाकडे वळत आहेत.

गीताचे सूचक शब्द, त्यांचा आशय अधिकच खुलविणारा पदन्यास आणि त्या वरताण असे चेहऱ्यावरील हावभाव यांतून लावणी खुलायची. लावणीची ही रंगत पुन्हा रंगणार असा आशावाद निर्माण होत असल्याचेही मत नाशिकच्या पुष्कराज थिएटर ग्रुपचे मालक सुनील ढगे यांनी व्यक्त केले.

सध्याच्या तरुणांना तालाचे वेड आहे. लावणीमध्येही ताल हाच महत्त्वाचा असल्याने लावणीला पुन्हा लोकप्रियता प्राप्त होणे शक्य आहे असे लावणीचे चाहते विनोद मेश्राम यांनी सांगितले. ढोलकी वादक राजेंद्र बाले यांनीही लावणीही पुन्हा बरे दिवस येण्याची आशा वाटत आहे. महाराष्ट्रात लावणी नृत्य करणारे ४००-५०० फड आहेत. यांत माया जाधव, सुरेखा पुणेकर, मधू कांबीकर अशा कलावंतांनी ग्रामीण बाज असलेली लावणी शहरी भागातही लोकप्रिय केली.

मराठी चित्रपट निर्माते आणि संगीतकार यांनी लावणीला चित्रपटात स्थान दिल्याने लावणीला प्रतिष्ठा प्राप्त झाली. या प्रतिष्ठेकडून आता पुन्हा एकदा लोकप्रियतेकडे लावणीची वाटचाल सुरू होणार आहे.

## नाशिकमध्ये फेब्रुवारीत मराठी गझल संमेलन

मुंबईच्या गजलसागर प्रतिष्ठानतर्फे एक व दोन फेब्रुवारीला दुसरे अखिल भारतीय मराठी गझल संमेलन नाशिक येथे होणार आहे. महापौर दशरथ पाटील स्वागताध्यक्ष असतील.

संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी डॉ. वसंतराव पवार, खजिनदापदी लोकेश शेवडे व निमंत्रक म्हणून प्रदीप निफाडकर यांची निवड करण्यात आली.

भीमराव पांचाळे म्हणाले, "२९ व ३० डिसेंबर २००१ ला मुंबईत पहिले अखिल भारतीय मराठी गझल संमेलन झाले. नाशिकच्या संमेलनासाठी केरळ, कर्नाटक, मध्य प्रदेशातून प्रतिनिधी, रसिक येणार आहेत. गुलजार, निदा फाजली आदी मान्यवरांना निमंत्रण देण्यात आले आहे.



## वारली चित्र संस्कृती प्रदर्शन

आदिवासींच्या पाड्याची हुबेहूब उभारलेली प्रतिकृती व विविध प्रकारच्या वस्तूंवर साकारलेले वारली चित्रकलेचे नमुने बालगंधर्व कलादालनात प्रदर्शित झाले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे उपसरव्यवस्थापक श्याम भुर्के व व्यंकटेश कामत यांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उदघाटन झाले.

माया डोंगरे व त्यांच्या २५ विद्यार्थिनींनी काढलेली चित्रे त्यात होती. वारली संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी जव्हारचे कलाकार लक्ष्मण मौळे यांनी वारली चित्रकलेची प्रात्यक्षिके सादर केली. दुधी भोपळा व बांबूपासून बनविलेले तारपा हे आदिवासी वाद्य वाजविण्याचे प्रात्यक्षिक कमा डंबाळी यांनी दाखवले.

## आयपीएस अधिकाऱ्याची वादग्रस्त कादंबरी.

पोलीस दलात मोठ्या उमेदीने येणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांची स्थिती अक्षरशः 'ना घर का, ना घाट का' अशी होते; परंतु सेवाशर्तीविषयक नियमांमुळे त्यांना त्या विरोधात काहीही बोलता येत नाही. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करता करता आंतरिक प्रेरणा मात्र त्यांना स्वस्थ बसू देत नाही आणि 'कारनेज बाय एन्जल्स' यासारखी पोलीस दलाच्या कारभारावर प्रकाशझोत टाकणारी कादंबरी आकार घेते.

'भारतीय पोलीस सेवे'तील वरिष्ठ अधिकारी योगेश प्रताप सिंग यांच्या लेखणीतून साकार झालेल्या या कादंबरीमुळे पोलीस दलात खळबळ माजण्याची शक्यता आहे. आतापर्यंतच्या १७ वर्षांच्या सेवेतून आलेल्या अनुभवांना काल्पनिक आधार देताना त्यांनी प्रस्थापित यंत्रणेतील त्रुटींकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. ही कादंबरी पोलीस दलात मोठ्या उमेदीने येणाऱ्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन ठरणार आहे, असा सिंग यांचा दावा आहे.

पोलीस सेवेत आल्यापासूनच १९८५ च्या तुकडीतील सिंग त्यांची निडर स्वभावपद्धत अनेक सनदी अधिकाऱ्यांना अडचणीची ठरली होती. अंधेरी पश्चिमेतील पाटलीपुत्र नगर येथील आयएएस अधिकाऱ्यांच्या सोसायटीचे प्रकरण असो वा बदलीला थेट सर्वोच्च न्यायालयात दिलेले आव्हान असो, येनकेन प्रकारे राजकारण्यांना गैरसोयीचे ठरलेले सिंग हे राज्य राखीव पोलीस दलाच्या गोरेगाव येथील आठव्या ग्रुपचे गेली पाच वर्षे कमांडंट आहेत. हाही एकप्रकारे विक्रमच आहे. कमी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या पदावर राहूनही मनात आणले तर प्रमुखाला चांगले काम करता येते, हे त्यांनी दाखवून दिले आहे. जवानांच्या मुलांसाठी अत्याधुनिक असा जलतरण तलाव आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर त्यांच्या चौकशीचे आदेश देण्यात आले. चौकशीत काही निष्पन्न झाले नाही; परंतु प्रस्थापित यंत्रणेशी त्यांचा संघर्ष सुरूच राहिला आहे. त्यातूनच आलेल्या अनुभवांवर ही कादंबरी आधारित आहे. त्यामुळे त्यातील घटना आणि नावे ही काल्पनिक असली तरी पोलीस दलात सध्या सुरू असलेल्या 'कारभारा'शी त्याचे साधर्म्य असल्यामुळेच खळबळ माजण्याची शक्यता आहे.

पोलीस दलात प्रशिक्षणासाठी आलेल्या रघुकुमार या आयपीएस अधिकाऱ्याला प्रशिक्षण

देणारा हेडकॉन्स्टेबल भूषण संख्ये यांच्याभोवती ही कादंबरी फिरत राहते. पोलीस आयुक्तपदी विराजमान होणारा वरिष्ठ आयपीएस अधिकारी माहासंचालकपदी बढती मिळालेली असतानाही केवळ आयुक्त बनण्यासाठी पदावनत होतो अशी घटनाही एका प्रकरणात मांडण्यात आली आहे. 'एन्जेल्स' म्हणजे देवदूत हे 'पोलीस' आणि त्यांच्याकडून झालेला 'नरसंहार' (कारनेज) असा शीर्षकातील आशयही खळबळ माजविण्याची शक्यता आहे.

प्रशिक्षण देणारा हेड कॉन्स्टेबल सर्व प्रकारचे बारकावे सांगतानाही 'काळ्या धंद्या'कडे मात्र दुर्लक्ष करायचे अणि त्यातून मिळणारा मलिदा उपभोगायचा, असा सल्ला देतो. हा सल्ला मानणारा सदर तरुण अधिकारी अल्पावधीत भरपूर माया कमावतो; परंतु आपण कमावलेली माया ही कुणाच्यातरी संहारातून येत असते, याची जाणीव झाल्यानंतर कमावलेली माया देणगीच्या रूपात परत देऊन केलेल्या पापाचे परिमार्जन म्हणून पगारातील एक तृतीयांश रक्कम धर्मादाय संस्थेला वाटून टाकतो. पूर्वीच्या ऐषारामाच्या आयुष्यापेक्षा आताचे आयुष्य आपल्या कुटुंबियांना अधिक सुखकर वाटत असल्याचे हा अधिकारी सांगतो. अशा पद्धतीने कादंबरीचा शेवट करून त्यातून संदेश देण्याचा सिंग यांचा प्रयत्न असला तरी यातील सर्व घटना पोलिसांच्या कारभाराचे यथार्थ दर्शन घडवीत असल्यामुळे ही कादंबरी वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.

## 'सांस्कृतिक विभाजनाची देशात सध्या परिस्थिती'

देशात सध्या सांस्कृतिक विभाजनाची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ हिंदी साहित्यिक, पत्रकार कमलेश्वर आठ डिसेंबर रोजी मराठवाडा दर्पण पत्रकार संघातर्फे आयोजित वार्तालाप कार्यक्रमात म्हणाले. ''पुरोहितवादी सांस्कृतिक आणीबाणी सर्वत्र सुरू आहे. पूर्वी उत्तरेत जातिधर्मांचे लोक एकमेकांना भेटले, की 'जय रामजी की' किंवा 'रामराम' म्हणत आत 'जय श्रीराम' म्हणावे, अशी सक्ती केली जात आहे. तेथे राजकीय, सामाजिक व धार्मिक पुरेहितवाद निर्माण झाला आहे. या देशात संस्कृतीला धर्माशी जोडले जात आहे. मात्र, प्रथम राष्ट्र व नंतर संस्कृती असा क्रम असतो,'' असे त्यांनी सांगितले.

कमलेश्वर म्हणाले, की आपल्या देशात दशानन रावण हे पौराणिक प्रतीक आहे. राजकीय क्षेत्रातही दशानन आहेत. सर्वजण आपापली मते मांडतात व सर्वजण मिळून एक होतात. लोकांचा सर्वच राजकीय पक्षांवरील विश्वास उडाला आहे. राजकारणातही पुरोहितवाद आहे. सर्व मतदारसंघात सर्व राजकीय पक्षांची निवडणूक जिंकण्याची नीती वेगळी आहे. वृत्तपत्र क्षेत्रात परदेशी गुंतवणूक होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करून त्यांचा इंग्रजी वृत्तपत्रावर मोठा परिणाम होईल, असे ते म्हणाले.

## मानसिक बंड तयार करण्याची शाहिरी वाङ्मयात ताकद

''सभोवतालच्या अनिष्ट घडामोडींमुळे समाजाची हिंमत व आत्मविश्वास कमी होत आहे. समाजाला उभे करण्यासाठी मानसिक बंडाची गरज असून, ती ताकद शाहिरी वाङ्मयात आहे,'' असे मत लोककला प्रबोधिनीचे अध्यक्ष बिंदुमाधव जोशी यांनी व्यक्त केले.



शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीतर्फे देण्यात येणारा 'युवा कला गौरव पुरस्कार' या वर्षी शाहीर चित्रा हेंद्रे यांना येथील आकाशवाणी केंद्राच्या संचालिका उषःप्रभा पागे यांच्या हस्ते देण्यात आला. प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष शाहीर हेमंत मावळे, राज्य शाहीर परिषदेचे सल्लागार अंबादास तावरे, शाहीर दादा पासलकर, अभिनेत्री मधू कांबीकर, आदी या वेळी उपस्थित होते. श्री. जोशी म्हणाले,''आज देशात जीवनमूल्यांचा ऱ्हास होत आहे. चंगळवाद, भोगवादी संस्कृती उदयास येत आहे. याविरुद्ध शाहिरांनी काव्य करावे व समाजाला हिंमत देण्यासाठी प्रयत्न करावेत.''

श्रीमती पागे म्हणाल्या ''आकाशवाणी लोककलांचे जतन निष्ठेने बऱ्याच वर्षांपासून करीत आहे. लोकांच्या गरजा, आवडीनिवडी याला महत्त्व देऊन आकाशवाणीने लोकमाध्यम म्हणून मान्यता मिळवली आहे. लोककलांचे जतन येथून पुढेही आम्ही करणार असून, आमच्याजवळील या ध्वनिमुद्रणाचा फायदा लोकांना मिळावा, असा आमचा प्रयत्न आहे.''

कांबीकर म्हणाल्या, ''स्त्रियांनी शाहिरी करणे ही साधी गोष्ट नाही, त्यांच्यातील गुणांना वाव मिळाला तर त्या या कलेला समृद्ध करून समाजाची सेवा करतील.''

## डॉ. गंगवाल यांच्या पुस्तकाचे राष्ट्रपतींच्या हस्ते प्रकाशन

नव्या दिल्लीतील विज्ञान भवनात 'जागतिक विश्वशांती सर्व जीव सन्मान परिषदे'मध्ये पुणे येथील 'सर्व जीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांच्या 'शाकाहार ही क्यों?' या पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या हस्ते झाले.

डॉ. विनोद शहा, 'ग्लोबल हार्ट फाउंडेशन'चे अध्यक्ष नारायणन आणि डॉ. गंगवाल यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. या परिषदेस मेघालयाचे राज्यपाल एम. एच. जेकब, झारखंडचे राज्यपाल न्या. रामा जॉयस, 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे श्री. रविशंकर, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री पतंगराव कदम, पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुख किरण बेदी, एमआयटीचे संस्थापक डॉ.विश्वनाथ कराड उपस्थित होते. 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांनी आभार मानले.

## भाषा-तंत्रज्ञानातील संशोधन

मुंबईतील आयआयटीच्या पुढाकारातून देशाच्या विविध भागांत भाषा-तंत्रज्ञानविषयक व्यापक संशोधनाला अलीकडच्या काही वर्षात गती आली असून राष्ट्रभाषा हिन्दीप्रमाणेच मराठी, कोकणीसारख्या प्रादेशिक भाषांनाही याचा मोठा लाभ मिळेल.

संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारातून जिनिव्हा येथे स्थापन झालेल्या 'युनिव्हर्सल नेटवर्किंग डिजिटल लँग्वेज फाउंडेशन', पॅरिसमधील 'ट्रान्सकल्चर इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट' आणि आयआयटी मुंबई या तीन संस्थांनी मिळून गोव्यात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय परिषद घेतली.

जागतिकीकरणाच्या ओघात इंग्रजीचे वर्चस्व वाढून छोट्या प्रादेशिक भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे टाळून विविध भाषा आणि संस्कृती टिकून राहाव्यात या दृष्टीने या परिषदेत आंतरराष्ट्रीय डिजिटलच्या माध्यमातून प्रादेशिक भाषा इंटरनेटवर पोहोचविण्याच्या

प्रकल्पाला गती मिळेल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

जगभरात सध्या सहा हजार ७०० भाषा वापरत आहेत. दर वर्षी यातील २५ भाषांचे अस्तित्व नष्ट होते असे युनेस्कोच्या पाहणीत आढळून आले आहे. बहुधा आशियाई, आफ्रिकन आणि अमेरिकन भाषांचा यात समावेश होतो. या पार्श्वभूमीवर इंटरनेटवर इंग्रजीचा वापर ८० टक्के असतो.

इंग्रजीचे अतिक्रमण रोखून प्रादेशिक भाषांचे संवर्धन करण्यासाठी या प्रकल्पाची मदत होईल. या प्रकल्पात सहभागी होणारी भाषा इंटरनेटच्या माध्यमातून अन्य कोणत्याही भाषिकाला वाचता येईल, असे फौंडेशनचे अध्यक्ष तार्सिसिओ जी. डगा सेंटा यांनी सांगितले.

गोव्यातील परिषदेमुळे येथे भाषा-तंत्रज्ञानविषयक संशोधनाला चालना मिळेल, याचा सर्वाधिक लाभ कोकणी भाषेला होईल. शणै गोंयबाब, डॉ. मनोहर सरदेसाई, बाकीबाब बोरकर या ज्येष्ठ लेखकांची कोकणी साहित्यसंपदा इंटरनेटवर आणण्याची योजना आहे. यासाठी 'कोकणी वर्डनेट' बनविण्याचे महत्त्वाकांक्षी काम हाती घेण्यात येत आहे.

मराठी आणि हिन्दी वर्डनेट याआधीच मुंबईच्या आयआयटी संस्थेने तयार केले आहे. याचबरोबर इंग्रजी, हिन्दी, मराठी कोकणी या भाषांना एकत्र आणणारे भाषांतराबाबतचे सॉफ्टवेअर बनविण्याचे काम मुंबईच्या आयआयटीमध्ये चालू आहे, अशी माहिती जी. व्ही. प्रभुगावकर यांनी दिली.

## वेदशास्त्रातील चार मार्गांनी जीवन सुखी : डॉ. सरदेसाई

''भारतीय वेदशास्त्रात सांगितल्याप्रमाणे ज्ञान,योग, भक्ती व कर्म या चार मार्गांचा अवलंब केल्यास जीवन सुखी आनंदी होईल,'' असे मत प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ.ह.वि.सरदेसाई यांनी व्यक्त केले.

अनिवासी भारतीयांच्या पालक संघटनेच्या (नृपो) स्थापनादिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम केलेल्या सभासदांचा सत्कार करण्यात आला. तसेच संघटनेच्या 'विल अँड आफ्टर केअर सेल'चे औपचारिक उद्घाटन या प्रसंगी करण्यात आले.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''शारीरिक प्रकृतीबरोबरच बौद्धिक, मानसिक व धार्मिक प्रकृतीही चांगली असणे आवश्यक आहे. वयोमानाप्रमाणे मानसिक व शारीरिक पीछेहाट होत असल्यामुळे एकटेपणा वाढतो. मानसिक नैराश्य निर्माण होते. त्यातून शरीराच्या तक्रारी सुरू होतात. हे टाळण्यासाठी शरीर चांगले ठेवण्याबरोबरच मन:स्वास्थ्यही सांभाळले पाहिजे. त्यासाठी धार्मिक प्रकृती जोपासावी.''

व्यायामाचे महत्त्व विशद करून डॉ. सरदेसाई म्हणाले, ''शरीरातील मेदाचे प्रमाण जास्त झाल्यास उच्च रक्तदाब, हृदयरोग यासारखे आजार उद्भवतात. संतुलित आहार व योग्य व्यायाम याद्वारे त्यावर नियंत्रण मिळवता येते व आरोग्य टिकवता येते.''

संस्थेचे अध्यक्ष माधव परांजपे यांनी प्रास्ताविक केले. संजीवनी वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## नाशिकच्या कुसुमाग्रज स्मारकास शासनातर्फे पन्नास लाखांचा निधी



कुसुमाग्रजांच्या स्मृती दीपस्तंभ ठरतील असे स्मारक उभे करण्यात राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही. लोकसहभाग वाढविण्याचाही प्रयत्न करू, असे अर्थमंत्री जयंत पाटील यांनी नाशिक येथे सांगितले.

शासनाने जाहीर केलेला पन्नास लाख रुपयांचा धनादेश, श्री. पाटील यांनी कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त म्हणून महापौरांकडे सुपूर्त केला.

ते म्हणाले,''कुसुमाग्रजांनी साहित्यात, मराठी भाषेच्या विकासासाठी केलेले कार्य मोठे आहे. मराठी भाषा पुढे नेण्यासाठी म्हणूनही राज्य सरकार आपली जबाबदारी मानते. राज्यकर्ते व साहित्यिकांतील अंतर कमी करणे आवश्यक आहे.'' कुसुमाग्रजांचे स्मारक शहराचा मानबिंदू ठरेल असे झाले पाहिजे.

## बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्र कथनाची सी.डी.बाजारात

मराठी अस्मितेचा ध्वज अटकेपार फडकवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र ज्यांच्या ओजस्वी वाणीतून मराठी माणसाच्या हृदयापर्यंत पोहोचले त्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्र कथनाच्या कॉम्पॅक्ट डिस्क (सी.डी) उपलब्ध होत आहेत.

पुस्तक प्रकाशनाच्या क्षेत्रात गेली दोन दशके कार्यरत असलेल्या पुरंदरे प्रकाशनामार्फत या सीडीची निर्मिती करण्यात आली आहे. बाबासाहेब पुरंदरे यांचे शिवचरित्र हा महाराष्ट्राचा अमूल्य ठेवा सीडीच्या माध्यमातून जोपासला जाणार आहे. शिवपूर्वकाल ते शिवराज्याभिषेक या कालखंडाची पंधरा भागात विभागणी करण्यात आली आहे. शिवपूर्वकाल, शिवजन्म, बालपण, स्वराज्याची प्राणप्रतिष्ठापना, स्वराज्यविस्तार, अफजलखान स्वारी, अफजलखान पराभव, पावनखिंड, फिरंगोजी नरसाळा, लालमहालावर छापा, सुरतेवर स्वारी, मिर्झाराजे जयसिंग, आग्ऱ्याहून सुटका, तान्हाजी व राज्याभिषेक या क्रमाने या रचना करण्यात आली आहे.

या सीडीसंचाच्या ध्वनिमुद्रणाचे काम टप्प्याटप्प्याने १९८३ पासून चालले होते. एका तासाच्या ध्वनिमुद्रणासाठी बाबासाहेबांनी आठ-आठ तास ध्वनिमुद्रण केले. हातात कागद न घेता आणि कोणत्याही प्रकारची संहिता तयार न करता उत्स्फूर्तपणे हे ध्वनिमुद्रण केले आहे.

मुळात ध्वनिफितीसाठी हे ध्वनिमुद्रण केले असले तरी बदलत्या काळाचा विचार करून त्याचे सीडी रूपांतर करणे आवश्यक सीडी हे सध्याच्या काळाचे माध्यम असून दीर्घकालीन टिकाऊपणा हे वैशिष्ट्य आहे. उत्तम दर्जाचे ध्वनिमुद्रण, आवाजातील सुस्पष्टता व सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञानाचा वापर यामुळे हा सीडीजचा संच संग्राह्य झाला आहे.

## 'काँटो के बीच खिलनेवाले कमलकीभी तारीफ कीजिए'

''जम्मू-काश्मीरमध्ये घडणाऱ्या हिंसाचाराची माहिती जाणून घेण्यासाठी सारे जग उत्सुक आहे. मात्र या राज्यातील कलावंत मंडळींच्या सांस्कृतिक चळवळीकडे राज्य सरकारसह प्रसिद्धिमाध्यमांनी डोळेझाक केली आहे. काँटो के बीच खिलनेवाले कमल की भी तारीफ करनी चाहिए,' अशी अपेक्षा जम्मू-काश्मीरच्या रंगभूमीवरील दिग्दर्शक बलवंत

ठाकूर यांनी व्यक्त केली.

मुंबईत 'संगीत नाट्य अकादमीने आयोजित केलेल्या नाट्य महोत्सवात ठाकूर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'घुमाई' या डोग्री नाटकाचा प्रयोग झाला. जम्मू-काश्मीर कला, सांस्कृतिक अकादमीचे सचिवपद भूषविणारे ठाकूर यांचा २००२ मध्ये संगीत नाट्य अकादमीने गौरव केला होता. ऑक्सफर्ड विद्यापीठाने गेल्या सप्टेंबर महिन्यात 'घुमाई' नाटकाचे वाचन करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले होते. त्यांनी अकरा नाटकांचे लेखन केले असून पन्नासहून अधिक नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. सहाशे वर्षांपूर्वीची एक लोककथा त्यांनी या नाटकाद्वारे रंगभूमीवर आणली आहे.

ते म्हणाले,''मराठी रंगभूमी समृद्ध असल्याने येथील नाट्यरसिक जाणता आहे. अशा रसिकांसमोर प्रयोग सादर करण्याचा आनंद खूप वेगळा आहे. जम्मू-काश्मीरमध्ये आम्ही सध्या डोग्री नाटक सादर करीत असलो तरी मराठी रंगभूमीचा मी विशेष चाहता आहे. विजय तेंडुलकर,महेश एलकुंचवार, सतीश आळेकर या मान्यवरांची नाटके मी आमच्याकडे सादर केली आहेत.''

हिंसाचारामुळे जम्मू-काश्मीर जळत असतानाही येथील रंगभूमी कशी काय जिवंत ठेवली, असे विचारले असता ते म्हणाले,''बॉम्बस्फोट, गोळीबार, रक्तपात यांची आम्हाला सवयच झाली आहे. नाटकांच्या तालमी करीत असताना आमच्या कानावर स्फोटांचे आवाज येतात. मात्र विपरीत परिस्थितीमध्येच कोणतीही कला विशेष फुलते, यावर आमचा विश्वास आहे. या विश्वासामुळेच आम्ही अनंत अडचणी समोर दिसत असूनही रंगभूमीच्या सेवेचे काम करीत आहोत.''

### स्त्रिया लिहीत आहेत तरी कोणासाठी? : गणोरकर

''स्त्रिया लिहीत आहेत तरी कुणासाठी? पुरुषांनी व्यापलेल्या वाङ्मयाच्या पटावर एका कोपऱ्यात बसून लिहिणाऱ्या या स्त्रिया कोणाचे लक्ष वेधून घेण्यासाठी लिहित आहेत? स्त्रियांची दुःखे, भावना, इच्छा, अपेक्षाभंग, त्याग, समर्पणादी गुण पुरुषांच्या लक्षात यावेत यासाठी तर त्या लिहित नाहीत ना ?'' असे प्रश्न कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर यांनी पाचव्या समरसता साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून उपस्थित केले.

समरसता साहित्य परिषदेतर्फे पुण्यात हे संमेलन झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते डॉ. गणोरकर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी स्त्रियांच्या लेखनाविषयी असमाधान व्यक्त करताना त्या म्हणाल्या,''लेखन ही एक सांस्कृतिक निर्मिती अहे. स्त्रियांचा स्वतःकडे व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचे ते एक साधन बनू शकते, पण विभिन्न स्तरातील स्त्रियांचे दुःख वेगवेगळे आहे याचे भान स्त्रियांच्या साहित्यातून किंवा स्त्रीवादी साहित्यातून दिसत नाही. स्त्रियांमध्ये समरसतेची जाणीव क्वचितच दिसते. स्त्रियांची बहुतेक कविता आत्मकेंद्रित आहे. सुशिक्षित स्त्री घराबाहेर पडल्यावर सामाजिक, राजकीय आंदोलनांनी अस्वस्थ झाली, पण विषमतेच्या सतावणाऱ्या प्रश्नांचे चित्रण तिच्या साहित्यात आले नाही. तिचे साहित्य पुरुषकेंद्रित राहिले.''

दुर्बलांना दडपण्यासाठी मूठभर सबलांकडून शक्तीचा प्रयोग केला जात आहे. या



परिस्थितीत,'स्त्रियांचे साहित्य' व 'समरसतेचा' घोष या दोन्ही गोष्टी असंबद्ध वाटत आहेत, असे सांगून डॉ. गणोरकर म्हणाल्या,''साहित्यनिर्मिती प्रचंड असली, तरी त्यात सत्त्व, वैचारिक धग नाही. भोवतीचे वास्तव विरूप व अस्ताव्यस्त आहे. आपला प्रचंड समाज पोकळ झालेला आहे. समाजजीवन शक्य करणारी सहिष्णुता नाहीशी होत आहे आणि सहिष्णुतेशिवाय समता व समरसता येऊ शकणार नाही. सर्वजण मानव जातीच्या कल्याणाचा प्रगतिशील विचार करू लागतील, तेव्हा खरी समरसता निर्माण होईल.''

दुसऱ्यांच्या हेतूंविषयी संशय घेऊन केवळ प्रतिक्रिया देण्यामुळे मानवसमूह आतून शतखंडित होत आहे, याकडे लक्ष वेधत त्या म्हणाल्या,''नात्यांमध्ये व व्यावसायिक क्षेत्रातदेखील समरसता आढळत नाही, तेथे संपूर्ण समाजात समरसता निर्माण होईल असा भ्रम आपण बाळगत नाही आहोत ना? आत्मसंयमन, सहिष्णुता, उदारमनस्कता, दया, क्षमा, शांती, अहिंसा ही मूल्ये सांगणारे महात्मा गांधी या परिस्थितीत आठवतात. या मूल्यांशिवाय मानवी अस्तित्व अशक्य आहे.''

### चॅप्लीनच्या घराचे होणार स्मारक

मूकपटांपासून जगभरातील चित्रपटप्रेमींच्या हृदयावर अधिराज्य गाजविणारे दिवंगत कलावंत चार्ली चॅप्लीन यांच्यास स्वित्झर्लंडमधील घराचे स्मारकात रूपांतर होत आहे.

जीनिव्हाच्या सरोवरासमोरील मनोर डी बॅन या वास्तूत त्यांनी त्यांच्या आयुष्यातील अखेरची २५ वर्षे व्यतीत केली. चॅप्लीन आपली शेवटची पत्नी डोना व अन्य आप्तांसह या वास्तूत १९५२ पासून राहू लागले. १९७५ मध्ये ब्रिटनच्या सम्राज्ञीने त्यांना सरदारकी देऊन त्यांचा बहुमान केला. वयाच्या ८८ व्या वर्षी १९७७ मध्ये ख्रिस्मसच्या दिवशी त्यांचे देहावसान झाले होते. आता त्यांच्या मृत्यूला २५ वर्षे पूर्ण होत असताना त्यांना २५ वर्षे साथ देणाऱ्या घराचे स्मारकात रूपांतर होत आहे, हा योगायोगही विलक्षणच आहे. या घरातील खोल्या चॅप्लीन ज्या पद्धतीने वापरत असत, त्याचप्रकारे राखल्या जाणार आहत. त्यातील फर्निचर, सामान, पुस्तके व पुरस्कार चॅप्लीन यांनी रचना केल्याप्रमाणेच राहाणार आहेत.

या घरासमोरच्या विस्तीर्ण उद्यानातील २०० आसनी चित्रपटगृह हे या स्मारकाचे आगळे वैशिष्ट्य ठरणार आहे. येथे चॅप्लीन यांच्या गाजलेल्या चित्रपटांचे निमित प्रदर्शन होत राहील. वयाच्या २४ व्या वर्षी म्हणजे १९१३ मध्ये चॅप्लीन हॉलीवूडच्या किस्टोन स्टुडिओतून प्रथम काम करू लागले. तेव्हाच्या मूकपटांपासून ते बोलपटांपर्यंतचे चित्रपट येथे झळकतील.

या घराची किंमत ६.८५ दशलक्ष डॉलर आहे. चार्ली चॅप्लीन म्युझियम फाउंडेशनला ते विकले जाणार आहे.

### अभ्यासकांसाठी 'सरस्वती दर्शन' उपयुक्त पुस्तक : नामजोशी

''सरस्वती देवतेचा ऋग्वेदापासूनचा धांडोळा 'सरस्वती दर्शन' या पुस्तकात घेण्यात आला आहे. सरस्वतीची विविध रूपे लेखक डॉ. सुरेश देशपांडे यांनी दाखवली आहेत. त्यामुळे हे पुस्तक अभ्यासकांना उपयुकत ठरणारे आहे,'' असे मत प्रसिद्ध प्रवचनकार डॉ. कल्याणी नामजोशी यांनी केले.

या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. नामजोशी यांच्या हस्ते झाले. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव, प्रसिद्ध इतिहासकार म. श्री.माटे आदी या वेळी उपस्थित होते. 'कॉन्टिनेन्टल' तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. 'कॉन्टिनेन्टल'चे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या 'कुंती' या कादंबरीच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही प्रा. जाधव यांच्या हस्ते झाले.

डॉ. नामजोशी म्हणाल्या, ''सरस्वती देवतेविषयी सर्व. जिज्ञासा आढळते. ही जिज्ञासा या पुस्तकाने पूर्ण केली आहे. वेदांपासून ते अर्वाचीन साहित्यातील सरस्वतीविषयी आलेले उल्लेख डॉ. देशपांडे यांनी टिपले आहेत. नदीच्या रूपाने देखील सरस्वतीची उपासना केली जाते. भारतीय संस्कृतीत एकाच देवतेची अशी विविध रूपे नवी नाहीत. या सर्वांची माहिती पुस्तकातून मिळते.''

प्रा. जाधव यांनी अनंतराव कुलकर्णी यांच्याविषयीच्या काही आठवणी सांगितल्या. श्री.माटे, जयराम देसाई, नंदकुमार देशपांडे यांची या प्रसंगी भाषणे झाली. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी आभार मानले. प्राची चिकटे यांनी सूत्रसंचालन केले.

## संकुचित हेतूने ज्योतिषाचा वापर नसावा : लामा विद्यानंद

''ज्योतिष ही संकल्पना व्यापक असून, केवळ लग्नासाठी कुंडल्या पाहण्यापुरती किंवा राजकीय व्यक्तींचे भवितव्य वर्तविण्यापुरती ती मर्यादित नाही,'' असे मत लामा स्वामी विद्यानंद यांनी व्यक्त केले.

'ब्रह्मलिखित मासिक आणि विधिलिखित भविष्य' यांनी आयोजिलेल्या मुकुंदनगर येथे भरलेल्या अखिल भारतीय ज्योतिष संमेलनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, सुरेशचंद्र पाध्ये, महाराष्ट्र ज्योतिष परिषेदेचे अध्यक्ष य. न. मग्गीरवार, चंद्रकांत शेवाळे, प्रतिभा शाहू मोडक, संयोजक आदिनाथ साळवी आदी या वेळी उपस्थित होते.

स्वामी विद्यानंद म्हणाले, 'ज्योतिष हे शास्त्र आहे, की नाही हा वाद घालण्यात अर्थ नाही. अतिप्राचीन काळापासून ज्योतिष या विषयावर शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झाला आहे. त्याचे पुरावेही आहेत. ज्योतिषाची संकल्पनाही व्यापक आहे. विश्वब्रह्मांडाच्या उगमाचा शोध घेण्यासाठी ही विषयशाखा सुरू झाली. आज जगभरात ४८७ शाखांमध्ये ज्योतिषाचा अभ्यास चालू आहे.''

पाध्ये म्हणाले, ''ज्योतिष शास्त्र आहे, की नाही या वादात पडण्याऐवजी ज्योतिष हे समाजाच्या उपयोगी पडते की नाही हे पाहणे आवश्यक आहे. या विषयाबाबत सापेक्षता असली तरी, ही विचाराची एक धारा आहे. मात्र, याबाबत बोलताना अभिनिवेश नसावा.''

श्री. साळवी यांनी प्रास्ताविक केले. त्यांच्या 'विधिलिखित सहस्रावली' या पुस्तकाचे या वेळी प्रकाशन झाले.

## तळमळीचे ग्रंथ प्रसारक - शरद जोशी

नुकतीच प्रकाशित झालेली काही पुस्तके त्यांच्या शिफारशींसह, एखादी चांगली कथा-कविता किंवा लेख यांची झेरॉक्स प्रत किंवा चांगले विनोद, सुविचार यांनी भरलेले



स्वहस्तक्षरातील कागद तुम्हाला पोस्टाने आले तर मुळीच आश्चर्य वाटून घेऊ नका. डोंबिवली निवासी शरद जोशींना तो छंदच आहे. मराठी भाषा व तिचा विकास, उत्तमोत्तम ग्रंथांचा प्रसार व कोणत्याही समाजोपयोगी कामात सक्रिय सहभाग हा जोशींचा ध्यासच आहे. गेली पन्नासहून अधिक वर्षे तो कोणतीही अपेक्षा न करता स्वत:च्या खिशाला चाट देऊन ते ही कामे करत आहेत.

शरद जोशी यांना वाचनाची मनस्वी आवड आहे. मराठी पुस्तके अधिकाधिक खपावीत, प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक मराठी पुस्तकाचे नाव सर्वदूर पसरलेल्या मराठी वाचकांच्या कानावर जावे ही त्यांची तळमळ आहे. त्यासाठी गेली कित्येक वर्षे ते महाराष्ट्रातील विविध साप्ताहिकांत, दैनिकांत नव्या पुस्तकांचे प्रकाशनवृत्त आणि पुस्तक परिचय लिहीत आहेत. वेळोवेळी विविध ग्रंथप्रसाराची पत्रके प्रसिद्ध करून ती त्यांनी आजवर शेकडो संस्थांना व वाचकांना पाठविली आहेत. शक्य होईल तेवढा परदेशस्थ मराठी माणसांनाही ते वाचनाचा व मराठी पुस्तके खरेदी करण्याचा आग्रह करतात. १९८३ मध्ये त्यांना मॉरिशमध्ये जाण्याचा योग आला होता. तिथेही ते एक ट्रकभर पुस्तके घेऊन गेले.

पुस्तके तयार होण्याच्या प्राथमिक अवस्थेपासूनच ते या प्रचाराला सुरुवात करतात. म्हणजे एखाद्या नव्या लेखकाला त्यांचं प्रसिद्ध झालेलं साहित्य वाचून उत्तेजन देणे, पुस्तक काढायला सुचवणे, त्याला प्रकाशक व प्रस्तावना मिळवून देणे इतकेच काय उद्घाटन समारंभासाठी पाहुणा मिळवून देऊन समारंभ पार पाडायलाही ते मदत करतात. नव्या किंवा वेगळ्या विषयांवरील पुस्तक किंवा त्यांना भावलेला ग्रंथ यांचा प्रचार करण्यात ते पुढाकार घेतात. अलीकडेच गाजलेलं 'एक होता कार्व्हर' किंवा अरुण फडके यांची व्याकरणसूची यांच्या त्यांनी जवळजवळ प्रत्येक शंभर प्रती विकत घेतल्या व मित्रमंडळी, आप्तेष्ट किंवा सरकारी कार्यालये यांच्यात नेऊन खपवल्या. लग्नकार्ये, वाढदिवस किंवा ततप्रसंगी ते आवर्जून 'ग्रंथ भेट'च देतात. दुसऱ्यांनीही तसंच करावं असा त्यांचा आग्रह असतो.

शरद जोशी आयुर्विमा महामंडळात नोकरीला होते. आता ते निवृत्त झाले आहेत. नोकरीच्या काळात ते अनेक मासिकांचे व साप्ताहिकांचे आजीव सभासद झाले आहेत. रोज दहाबारा पेपर ते विकत घेतात. यात काहीही वाचण्यासारखं आलं की त्याच्या झेरॉक्स प्रती काढून त्या ते संबंधितांना वाटतात. शासकीय कार्यालये, कंपन्या यांना स्वत: नेऊन देतात. तरुणांसंबंधी काही वाचण्यात चांगलं आलं व त्यांना असं वाटलं की हे तरुणांपर्यंत पोचलं पाहिजे तर त्याच्या प्रती ते कॉलेजात जाऊन मुलांना वाटतात. विनोद, कविता, सुविचार असे साहित्यही ते लोकांपर्यंत नेऊन पोचवतात.

बऱ्याच मासिकांचे ते अधिकृत ग्रंथप्रसारक आहेतच पण वाचक मेळावा आयोजित करणे, लेखक, संपादक, प्रकाशक, व वाचक यांची भेट घडवून आणणे यातही ते पुढाकार घेतात. वाचलेल्या चांगल्या साहित्याच्या प्रती सार्वजनिक ठिकाणी ते लोकांसाठी चिकटवून ठेवतात. इतक्या वर्षांच्या या छंदातील बऱ्यावाईट अनुभवांचे भांडार त्यांच्याजवळ आहे. लेखक मनोहर कडुलकरांनी त्यांचे काम काम पाहून छोटीशी देणगी त्यांना स्वयंस्फूर्तीने दिली. पत्रमैत्रीचा फार मोठा खजिना त्यांच्याकडे आहे. आजमितीला जवळजवळ पंचवीस हजार पत्रं त्यांनी वेगवेगळ्या थरातील मंडळींना लिहिली आहेत.

अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध आहे. पुण्याच्या 'जाणीव' या संस्थेचे ते संस्थापक सदस्य आहेत. मुलुंडच्या 'बांधिलकी' या संस्थेचे ते कार्यकर्ते आहेत. मुळात शरद जोशी हे उत्तम ब्रिजपटू आहेत. 'तुम्हीच ब्रिज शिका' व 'उत्तम ब्रिज कसे खेळावे?' अशी दोन पुस्तके त्यांनी ७२ साली लिहून प्रसिद्ध केली आहेत. अनेक मासिकांत व दैनिकांत त्यांनी ब्रिज व क्रिकेट या विषयावर स्फुट लेखन केले आहे. ८० ते ९५ अशी पंधरा वर्षे ते 'ब्रिज' हे मराठी मासिक चालवत होते. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी आयुर्विमा महामंडळावर त्यांनी १९६१ साली दावा लावला. तो ६४ साली त्यांनी जिंकला. त्यामुळे एल.आय.सी. ला त्यांच्या सेवाशर्तीचे एक कलम बदलावे लागले होते. हा खटला देशभर गाजला होता.

- श्रीनिवास गडकरी (तरुण भारतवरुन)

**मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रमात बालसाहित्याचा समावेश**

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने पहिल्यांदाच मराठी विषय घेऊन पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात बालसाहित्य या विषयाचा समावेश केला आहे.

यापूर्वी पदवी अभ्यासक्रमात बालसाहित्याला कधीही स्थान मिळाले नव्हते. ते मुक्त विद्यापीठाने मिळवून दिले. त्यासाठी विद्यापीठाने डबल डेमी आकाराची १२० पृष्ठांची तीन पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. यातले पहिले पुस्तक प्रा.सुजाता महाजन यांनी लिहिले असून, त्यात बालसाहित्याचे प्रयोजन, वाटचार, बालमानसशास्त्राशी संबंध वगैरे तात्त्विक चर्चा आलेली आहे. दुसरे पुस्तक स. ध. झांबरे यांनी लिहिले असून, त्यात मराठी बालकथा व बालकादंबरीतील निवडक वेच्यांचा अभ्यास आहे.

तिसरे पुस्तक प्रा. विश्वास वसेकर यांनी लिहिले आहे. त्यात दत्त, मायदेव, करंदीकरांपासून अगदी अलीकडच्या दासू वैद्यांपर्यंत पंधरा प्रातिनिधिक बालकवितांचा समावेश आहे. सई परांजपे, मतकरी आणि सूर्यकांत सराफ या तिघांची बालनाट्ये संपादून अभ्यासली आहेत.''


**बालकांच्या भविष्यासाठी वास्तवाला भिडले पाहिजे - दाभोळकर**

निरागस बालकांचे उद्याचे भविष्य घडवावयाचे असेल तर आज सुरू असलेले खुनाचे राजकारण, काळाबाजार व भ्रष्टाचाराच्या अंधाराचे भय वाटता कामा नये. आजचे समाज - वास्तव झोप उडविणारे आहे आणि चारित्र्य व मोठेपणाच्या चर्चा सभोवताली चालू आहेत. मार्ग सापडत नाही. म्हणून 'पुनश्च हरिओम' हणत भीषण वास्तवाला भिडले पाहिजे, असे विचार दत्तप्रसाद दाभोळकर यांनी सोळाव्या बालसाहित्यसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

ते म्हणाले की, अद्‌भुतता, विस्मयजनकतेवर बेतलेल्या बालसाहित्यावर आमची पिढी मोठी झाली.

चि. वि. जोशी, साने गुरुजी, ताम्हनकर यांनी बाल साहित्याला रंजनाच्या पलीकडे नेले. बाल साहित्य हे कल्पनासृष्टीत रमविते, रंजन करते व अद्भूततेची जाणीवही देते. ही वैशिष्ट्ये महत्त्वपूर्ण आहेत. आता बाल साहित्यात रोधक व सहायक या दोन गुणवैशिष्ट्यांचा समावेश झाला पाहिजे.






**पुस्तक परिचय**

## द स्ट्रीम विदिन

**अनु. मीना वैशंपायन**

## गेल्या पाच दशकातील प्रतिभावान बंगाली स्त्रीलेखिकांची आशयसंपन्न, सुंदर कथापुष्पे

भारतीय साहित्यात बंगाली भाषेचा व साहित्याचा विशेष करून दबदबा आहे. रवींद्रनाथ टागोर यांनी नव्वद वर्षांपूर्वी नोबेल पुरस्कार मिळाला, आणि त्यानंतर बंगाली लेखक कवींना आपल्या अस्मितेचे वेगळेच भान आले. रवींद्र- नाथांनंतर कोणाही भारतीय लेखककवीला हा सर्वोच्च सन्मान अजून मिळालेला नाही. त्यामुळे बंगाली साहित्यिकांमध्ये अजूनही आपणच काय ते श्रेष्ठ असा अभिनिवेश दिसतो. बंगाली साहित्याचे अनुवाद परभाषांत विपुल होतात; परंतु त्यामानाने अन्य प्रादेशिक भाषांतील चांगल्या साहित्याचे अनुवाद बंगालीत होत नाहीत. असे आढळते. याचे कारण बंगाली मानसिकता. आमचे साहित्य श्रेष्ठ आहे. मग इतर भाषांतील साहित्याची गरजच आम्हांला का वाटावी?... अर्थात हे देखील खरे की बंगालीतील अनेक लेखक गाजलेले आहेत आणि अनेक भारतीय भाषांमध्ये पोचलेले आहेत. बंकिमचंद्र, शरच्चंद्र चटोपाध्याय, सुनील गंगोपाध्याय, शंकर, बुद्धदेव बोस, आशापूर्णा देवी, महाश्वेतादेवी, सत्यजित रे, विभूतिभूषण बंदोपाध्याय वगैरे नावे चोखंदळ वाचकांच्या परिचयाची आहेत. बंगाली भाषकांमध्ये वाचनसंस्कृतीही इतर प्रांतीयांपेक्षा अधिक खोल व व्यापक रुजलेली आहे. कलकत्ता ग्रंथजत्रेच्या वेळी कोट्यवधी रुपयांची ग्रंथविक्री होत असते.

बंगालीतील खूप गाजलेल्या लेखककवींची नावे आपल्या परिचयाची असली तरी भाषांतराद्वारे आपल्यापर्यंत न पोचलेल्या कसदार बंगाली लेखकांची संख्याही काही कमी नाही 'द स्ट्रीम विदिन' या नावाने स्वाती गांगुली आणि शर्मिष्ठा दत्तगुप्ता यांनी समकालीन बंगाली कथालेखिकांच्या तेरा कथांचा संग्रह कलकत्त्याच्या 'स्त्री' प्रकाशनसंस्थेसाठी तयार केला. गेल्या ५० वर्षांत म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात लिहिल्या गेलेल्या स्त्री कथाकारांच्या कथांची ही प्रातिनिधिक वानगी अन्य भाषकांनाही उद्‌बोधक व आकर्षक वाटेल अशी आहे.

समकालीन बंगाली समाजाचे आणि स्त्री जीवनाचे विविध पैलू प्रकट करणाऱ्या या कथा मराठी वाचकांनाही जवळच्या वाटतील, या कल्पनेने प्रा. मीना वैशंपायन यांनी या कथासंग्रहाचा मराठी अनुवाद सादर केला आहे. आपल्या मनोगतात त्या म्हणतात, 'बंगाली भाषेतलं वाङ्मय आशयसंपन्नता, प्रांजळपणा यामुळे आपल्या आकर्षून घेत राहिलेलं आहे. स्त्रीचं मन जादूच्या पेटीसारखं असतं. पेटीच्या आत पेटी, त्या पेटीच्या आत आणखी एक पेटी, या आतल्या पेटीतील या अंतर्मनातील कल्लोळ जाणून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या



## स्त्रियांना लिहिण्याची प्रेरणा कुठून मिळते? त्यांचं लेखन काळाशी कशाप्रकारे संबंधित असतं?

या कथा, स्त्रीजीवन हा या कथांचा स्वाभाविक केंद्रबिंदू.'

या कथांमधील बंगाली स्त्री ही एका खांद्यावर किल्ल्यांचा भलामोठा जुडगा टाकून जेवताना पतीला वारा घालत बसणारी पारंपरिक स्त्री नसून, आजची निर्भय होऊ पाहणारी, अन्यायाचा प्रतिकार करणारी, व्यवहारी, जीवनाकांक्षी स्त्री आहे आणि आधुनिक असूनही ती हळुवार, वत्सल, सौंदर्यासक्त, सृजनशील आहे. आपल्या कुटुंबासाठी सर्वस्वाचं, आपल्या आत्मिक मानसिक शक्तीचं समर्पण करणारी ही स्त्री आहे.

या कथासंग्रहात ज्यांच्या कथांचा समावेश आहे त्यापैकी महाश्वेतादेवी आणि आशापूर्णादेवी यांची नावे ज्ञानपीठ पुरस्कारामुळे बऱ्याच मराठी वाचकांना ज्ञात आहेत. बाकीची नावे कदाचित प्रथमच समोर येत असतील. नोबेल पुरस्कार विजेते प्रा. अमर्त्य सेन यांच्या घटस्फोटित पत्नी नवनीता देवसेन यांचीही अभिज्ञान दुष्यन्त ही कथा आहे. त्याशिवाय सावित्री रॉय, पूरबी बसू, जहाँआरा, इमाम, सुलेखा संन्याल, बानी बसू, नसरीन जहाँ, अनिता अग्निहोत्री, छाबी बसू, सेलिना हुसेन, राजलक्ष्मी देवी, अशा विविध समाजातील या लेखिकांची ओळख आपल्याला होते. आशापूर्णा देवी (१९०९-९४) सावित्री रॉय (१९१८-८५), महाश्वेतादेवी (जन्म १९२६), जहाँआरा बेगम (१९२१-९४), छाबी बसू (जन्म १९२४), राजलक्ष्मी देवी (जन्म १९३९) नवनीता देवसेन (जन्म १९३८) या स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेल्या तर बाकीच्या १९४७ नंतरच्या काळात जन्मलेल्या आहेत. म्हणजे नव्वदीपासून पस्तिशीपर्यंतच्या लेखिकांच्या जीवनानुभवाचे वैविध्य या संग्रहाद्वारे वाचकांपुढे येते. यातील कथा मात्र गेल्या अर्धशतकात लिहिल्या गेलेल्या आहेत.

संपादिका स्वाती गांगुली आणि शर्मिष्ठा दासगुप्ता यांची आपल्या प्रास्ताविकात या कथांच्या संदर्भात काही मार्मिक अवलोकने नोंदवलेली आहेत.

ह्या कथा सर्वोकृष्ट म्हणून निवडलेल्या नाहीत. अशा प्रकारे क्रमांक देणे वा दर्जा ठरवणे हा हेतू निवडीमागे नाही. उत्कृष्ट व प्रातिनिधिक कुणाच्या दृष्टीनं?

पुरुषप्रधान वाङ्मयीन समीक्षेचे निकष लावून स्त्रियांच्या लेखनाचा दर्जा ठरवावा हेही आम्हांला मान्य नाही.

व्यक्तीची लिंगाधिष्ठित ओळख, सामाजीक श्रेणी, राजकीय संबंध, सांस्कृतिक अग्रक्रम, इत्यादी निकषही ध्यानी घ्यायचे का हा प्रश्न पडतो.

टोकदार शैली, कथानकाची घट्ट वीण, कथानकातील नाट्यमयता हे चांगल्या लघुकथेचे घटक. पण निवड करताना हे घटक निर्णायक ठरत नाहीत. आमची निवड स्त्रीवादी दृष्टीतून केलेली आहे. प्रत्येक लेखिकेची स्वतंत्र प्रतिभा विचारात घेतली.

'स्त्री शरीरात असणारी, त्या शरीरात बंदिस्त असलेली कविहृदयाची आग, तिचं धगधगतेपण स्त्रीशिवाय अन्य कोण जाणू शकेल? हा व्हर्जिनिया वूल्फ या लेखिकेचा विचार आम्हास योग्य वाटतो.

अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी स्त्रियांनी एक रूपक म्हणून लेखनाचा उपयोग





## युद्धं, दंगली, बेकारी, या साऱ्यातून स्त्रियांनी घेतलेला आत्मशोध

करून घेतला आहे. आपल्या सुप्त इच्छाआकांक्षांना वाट करून देण्याचे माध्यम म्हणून स्त्रिया लेखनाकडे बघतात; पुरुषप्रधान वर्चस्वाचा प्रतिकार करण्याचे, त्याला तुच्छ ठरविण्याचे साधन म्हणून ही स्त्रिया लेखनाचा उपयोग करतात असे आम्हाला जाणवते.

अशा आत्माविष्काराचे उदाहरण म्हणून सावित्री रॉय यांच्या अंत:प्रवाह या कथेचा निर्देश करायला हवा. स्त्री लेखिकेचे सार्वजनिक वास्तव आणि खाजगी वास्तव यांतील ताण या कथेत उत्तम प्रकारे प्रकट झाला आहे. अगणित गरजा असणाऱ्या कुटुंबातील गृहिणी शकुंतला लेखन करते; तिच्याकडे कथा मागण्यासाठी आलेल्या संपादक देवव्रतला तिचे घरातले जे स्थान दिसते ते धक्का देणारे वाटते. लेखिका म्हणून घरात तिचे अस्तित्व कोणाच्याही ध्यानीमनी नसते. लिहिण्यासाठी चांगले कागदही तिला मिळत नाहीत. अशा स्थितीत ती आपल्या आत्माविष्काराचा चैतन्याचा झरा कसा जिवंत ठेवू शकेल असा प्रश्न संपादकाला पडतो.

स्त्रियांच्या परस्परनातेसंबंधाबद्दल जेव्हा लेखिका लिहितात, तेव्हा त्यातही वेगळेपणा जाणवतो. मुली, आया, बहिणी, मैत्रिणी, सहकारी अशा भिन्नविभिन्न नात्यांचे चित्रण दाखवणाऱ्या 'संघर्ष, दुय्यम, अंमलदार आणि सोबतिणी अशा तीन कथा या संग्रहात आहत. फाळणीच्या वेळी स्त्रियांवर अनेक अत्याचार झाले निर्वासित होऊन अपरिचित गावाशहरात नव्याने जीवनाची शून्यातून सुरुवात करावी लागली. नोकऱ्या करून कुटुंबाचे पोषण करणे त्यांना भाग पडले. परंतु त्यांच्या या नव्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांची घरातली कामे वा ज्येष्ठांचा दृष्टीकोन यात मात्र फरक पडला नाही. संघर्ष मधील अमिता आपला कामगार चळवळीचा कार्यकर्ता नवरा तुरुंगात गेल्यावर शिक्षिकेची नोकरी करून आत्मविश्वासाने जगू लागते, आपण नियतीचा बळी नसून नियतीला वाकवू शकतो असे दाखवते, तेव्हा तिच्यावर आरंभी टीका करणारी जुनाट विचारांची तिची वहिनी, तिच्या नजरेतून जगाकडे व वास्तवाकडे बघू लागते आणि आपल्या स्वार्थी, भ्याड पतीविरुद्ध संघर्षाला सिद्ध होते असे सुलेखा संन्याल यांनी 'संघर्ष' मध्ये दाखवले आहे.

सावित्री रॉय आणि सुलेखा संन्याल यांच्या कथा विस्मृतीत गेलेल्या होत्या. त्यांचा शोध घेण्यासाठी खूप परिश्रम पडले. त्यांच्या कुटुंबातही त्या कथा उपलब्ध नव्हत्या.

या संग्रहातील पाच कथा दारिद्र्याने पिचलेल्या स्त्रीच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. महाश्वेतादेवी (मीठ), अनिता अग्निहोत्री (आक्रंदन), या दोघींच्या कथा अगदी तळागाळातील आदिवासी समाजाच्या आहेत. मीठ हा जीवनमृत्यूचा संघर्ष होऊ शकतो हे शहरी लोकांना कसे कळणार असे 'मीठ' मधील म्हातारा आदिवासी म्हणतो, तेव्हा त्या विधानातील विदारक सत्य मनावर चर्रदिशी चरा उमटवते.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्त झाला. त्याचा तेथील जनमानसावर काय परिणाम झाला याचे एक दर्शन जहाँआरा इमाम यांच्या अस्त्र कथेत घडते. एका बलात्कारित स्त्रीच्या मनावरील आघाताची ही कथा, मुक्तिपूर्व बांगला देशातील पाकिस्तान सैनिकांच्या



## बंगालच्या फाळणीच्या काळातही कोणता संघर्ष, कोणतं चैतन्य त्यांना जीवंत ठेवतं?

कौर्याचेही भीषण रूप प्रकट करते.

सेलिना हुसेन (मोतीजानच्या मुली) नसरीन जहाँ (परपुरुष) यांच्या कथाही स्त्रीने केलेल्या प्रतिकाराच्या आणि साहसाच्या कथा आहेत. आपल्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या नवऱ्याची अरेरावी सहन करणारी मोतीजान, आपल्याला आवडणाऱ्या पुरुषाला जवळ करून नवऱ्याची साफ उपेक्षा करण्यापर्यंत मजल मारते. तिची सासू गुलनूर तिला ठणकावते, ''यापुढे या घरात तुला एक घास मिळणार नाही. मी माझ्या मुलाचं पुन्हा लग्न करून देईन. माझ्या घराला वारस हवा आहे.''

मोतीजान त्यावर खिल्ली उडवणारे हास्य करीत म्हणते, 'तुमच्या घराण्याला वारस? मुलगा? हाँ, मी तुमच्या मुलावर विसंबून राहिले असते तर या दोन मुलीही मला मिळाल्या नसत्या. मुलगा तर दूरच!'

गावातील सर्वांत करारी स्त्री म्हणून तोवर रुबाबात राहणारी गुलनूर आ वासून एवढेच म्हणू शकते, 'काय? काय म्हणालीस तू?'

नवनीता देवसेन यांची अभिज्ञान दुष्यन्त ही कथा स्त्रीवादी दृष्टिकोनातून लिहिलेली आहे. उपहासात्मक पण नर्म विनोदी शैलीत 'दुष्यन्त शकुंतला'ची कहाणी नवनीता देवसेन सांगतात. 'गेली दहा वर्षे चंद्रावती एकटीच राहात होती. राजा दुष्यन्त वारंवार विवाह करीत असे. राज्याला वारस हवा म्हणून दरवेळी नवीन शय्यासोबत शोधून राहण्याच्या नादात तो आपली मन:शांती गमावून बसतो. गरोदर शकुंतला राजधानीत येते तेव्हा राजनर्तिका लोलापांगी तिला रस्त्यात बघून आश्रयाला बोलावते. सर्व जाणून घेते. पुढे वेषांतर करून आलल्या दुष्यंताची नागरजन चोर समजून चांगली पिटाई करतात. 'हे पृथ्वीमाते मला पोटात घे' अशी सीतेप्रमाणे विनवणी करण्याची पाळी त्याजवर येते. त्याच्या राजचक्रवर्तीपदाच्या जानव्याला बांधलेली राजमुद्रांकित अंगठी लोलापांगीच्या आईच्या हाती येते आणि ती अंगठी शकुंतलेला देऊन तिची कण्वऋषींच्या आश्रमात पाठवणी केली जाते. दुष्यंताला ती अंगठी घेण्यासाठी मग शकुंतलेकडे जावे लागते आणि शकुंतलेची मनधरणी करावी लागते. 'चल चल लौकर. तुझ्या मुलाला घे. ती राजमुद्रा घे आणि पटकन रथात चढून बस... बाकी काही घेण्याचे कारण नाही.' तेवढ्यात विदूषक म्हणतो, 'तो राजपुत्र ती अंगठी गिळत नाही ना तेवढे बघ. त्याचं पोट कापून ती अंगठी परत मिळवता येणार नाही. आणि राजमुद्रा नसेल तर राजाचा कारभार ठप्प होईल...'

मन्नू ही मुलगी गुणन या चेटक्याशी मैत्री करून त्याची मुक्तता करते याची कहाणी राजलक्ष्मी देवींच्या कथेत आली आहे.

...अशा स्त्रीजीवनाच्या वेगवेगळ्या रूपांकडे लक्ष वेधणाऱ्या या बंगाली कथांमधील काही नायिका तरी वाचकांच्या मनात ठाव घेतील.

**पृष्ठे : १६० किंमत : १३० रु. सभासदांना : ९८ रु. पोस्टेज : २० रु.**






## असे बना अन् बनवा विद्यार्थी

**शं. व्यं काश्यपे**

## आपण आयुष्याच्या शेवटपर्यंत विद्यार्थीच रहायला हवे

'असे बना आणि बनवा विद्यार्थी' हे नाशिक ट्रेनिंग कॉलेजचे माजी अध्यापक शं. व्यं काश्यप यांचे पुस्तक म्हणजे विद्यार्थी-शिक्षक या नात्याचा एक हृद्य असा आलेखच आहे.

अपर्ण पत्रिकेत श्री. काश्यप यांनी म्हटले आहे, ''ज्या आदर्श शिक्षकांनी स्वत:च्या आचरणाने मला विद्या-विद्यार्थी समाजनिष्ठ शिक्षक बनविले, ज्या विद्यार्थ्यांची विविध परीक्षांमध्ये व व्यवसायामध्ये उज्ज्वल यश मिळवून माझे शिक्षकत्व धन्य केले, ज्या पालकांनी माझ्याशी संवाद साधून स्वत: आदर्श शिक्षक बनून आपल्या विद्यार्थ्यांना खरे विद्यार्थी बनविले, ज्या विद्यार्थी शिक्षकांनी मला सेवानिवृत्तीनंतरही लेखनास परावृत्त करून माझे विद्यार्थी-शिक्षकत्व विस्तारीत केले, त्या सर्वांनी हे पुस्तक सप्रेम समर्पण.''

या अर्पण पत्रिकेवरूनही 'विद्या-विद्यार्थी-समाजनिष्ठ' अशा सफल अध्यापकाच्या कर्तृत्वाची व सार्थकतेची कल्पना येते. त्यामुळे अशा जाणकार व तळमळीच्या अनुभवी व्यक्तीचे संचित खुले करणारे पुस्तक म्हणून 'असे बना आणि बनवा विद्यार्थी' हे पुस्तक प्रेरणादायक असणारच, याबाबत शंकाच उरत नाही.

शाळाकॉलेजात जाऊन जो ज्ञानग्रहण करतो त्यालाच विद्यार्थी असे आपण म्हणतो, पण ही कल्पना फार अपुरी व भ्रममूलक आहे. मनुष्य हा गर्भावस्थेत असल्यापासून शेवटचा श्वास घेईपर्यंत ज्ञानग्रहण करीतच असतो. शाळा कॉलेजातील औपचारिक पुस्तकी विद्येबरोबरच आचारविचार उच्चार आहार, व्यवहार शिकवणारी अनौपचारिक विद्याही महत्त्वाची असते, असे लेखक काश्यप आरंभीच स्पष्ट करता.

शाळाकॉलेजातील आजचे शिक्षण हे फारच परीक्षार्थी, पुस्तकी बनले आहे. हे शिक्षण माहिती देते पण शहाणपण देत नाही, त्यामुळे खरे ज्ञान वा विद्या प्राप्त होणे दुष्कर ठरते. या विद्या सा विमुक्तये- मुक्ती देते ती विद्या; अंतर्दृष्टी देते ती विद्या ही संकल्पना महत्त्वाची आहे. शिक्षकांना जर ही जाणीव असेल तर विद्यार्थी ही केवळ परीक्षार्थी न बनता सद्‌विद्येची आराधना करतील आणि ज्ञानविज्ञाननिष्ठ, समाजनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ, चारित्र्यसंपन्न बनू शकतील. अशा आदर्श विद्यार्थी शिक्षकांसाठी एक अनुभवप्रवण असे

## विद्यार्थीदशा ही गर्भावस्थेपासून मृत्यूपर्यंत अखंडपणे चालणारी क्रिया व अवस्था आहे

मॅन्युअल म्हणून हे पुस्तक मोलाचे आहे.

विद्यार्थ्यांची बाल्यावस्था, कुमारावस्था, पौगंडावस्था, कनिष्ठ व उच्च महाविद्यालयतील विद्यार्थी, व्यावसायिक विद्यार्थी, इतर शिक्षण घेणारे विद्यार्थी, निष्ठावान विद्यार्थी, युवा गृहस्थाश्रमी विद्यार्थी, वृद्ध विद्यार्थी, असे विद्यार्थ्यांचे गट पाडून त्या त्या विशिष्ट वर्गाच्या गरजा, मानसिकता, अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्ये, त्याबाबतची पथ्ये यांचे विवेचन काश्यप यांनी केले आहे.

शालेय विद्यार्थी कसा असावा याची काही लक्षणे या पुस्तकात देण्यात आली आहेत.

१. ज्ञानग्रहणास सदा उत्सुक असणे. वळणदार अक्षर, टापटिपीने लेखन करणे.
२. त्या ज्ञानावर स्वतंत्र प्रज्ञेने चिंतन-मनन-शब्दांकन
३. वर्गात होणाऱ्या पाठाचा आधीच घरी अभ्यास-पूर्वतयारी करणे.
४. वर्गात होणाऱ्या पाठाचे आकलन परिपूर्ण होण्यासाठी शंकाप्रश्न विचारून स्पष्टीकरण करून घेणे.
५. शिकवलेल्या पाठाची उजळणी घरी करणे.
६. गृहपाठ, अनुषंगिक वाचन, स्वत:चे मूल्यमापन व विषयांचे अन्य पैलू जाणणे.
७. उत्तरातील चुका व अपुरेपणा दूर करणे.
८. परीक्षेची तयारी परीक्षा आल्यावर करण्यापेक्षा वर्षभर नियमित अभ्यास करणे.
९. वेळेचे नियोजन करून विविध छंद, वाचन, कलासाधना, वस्तुसंग्रह इत्यादी
१०. शारीरिक स्वास्थ्य, आहारविहार पथ्ये, व्यायाम, खेळांची आवड, वेळेचे नियोजन
११. मानसिक स्वास्थ्य, दया, प्रेम, सहकार्य, सेवा, मानवता, सत् प्रवृत्ती, संयम.
१२. आत्मिक उन्नती, परमेश्वरावर श्रद्धा, सत्कर्म, सद्विचार, सद्भावना, पर्यावरण सेवा, प्राणीमात्रांची सेवा इ.

माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन, व्यावसायिक शिक्षणाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरही या सर्व गोष्टींची गरज असते. त्याशिवाय स्वयंअध्ययन व व्यक्तिमत्त्व विकास याकडेही लक्ष द्यावे लागते. त्या त्या वयानुसार शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक बदल घडत असतात. सामाजिक पर्यावरणाचाही प्रभाव पडत असतो. अवतीभवतीच्या राजकीय, आर्थिक, व्यावसायिक वातावरणामुळे आपल्या आयुष्यक्रमाच्या उभारणीची दिशा ठरत असते. या पुस्तकात त्याबद्दलचे वेगवेगळे पैलू मांडण्यात आले आहेत. ज्ञाननिष्ठा, ध्येय-तत्त्वनिष्ठा, धार्मिक आध्यात्मिक निष्ठा, यांची सर्व वयात आयुष्यभर गरज असते. निष्ठाविरहीत शिष्य हा खरा विद्यार्थी बनूच शकत नाही. किंवा तो आयुष्यात यशस्वी वा सुखी होऊ शकत नाही, असे लेखकाचे नि:संदिग्ध सांगणे आहे. विद्यार्थ्यांचे वर्तन कुठे कसे असावे याबाबतीतही अनेक पथ्ये सांभाळणे आवश्यक असते. दुष्प्रवृत्तींचेही वेळीच



## विद्येचं नुसतं ज्ञान उपयोगी नाही. जी कृतीत पूर्णत्वानं उतरते ती खरी विद्या.

उन्नयन केले गेले तर अनेक अडचणींतून मार्ग निघू शकतो. भयप्रवृत्ती, कामप्रवृत्ती, क्रोधप्रवृत्ती, लोभ-मोह-मद-मत्सर प्रवृत्ती यांचे उन्नयन केले गेले तर आयुष्याला सकारात्मक दिशा मिळते. प्रगती जलद होते.

या पुस्तकाचे लेखक काश्यप यांना आजचे राजकीय, सामाजिक वातावरण खटकत राहते. आजच्या सत्ताधीशांचे, अधिकाऱ्यांचे आणि तथाकथित नेत्यांचे भ्रष्ट आचरण खटकत राहते. कदाचित विद्यार्थी वयात योग्य ते संस्कार त्यांच्यावर झाले नसणार असे त्यांना वाटते. सत्ताधीश, अधिकारी आणि नेते यांनाही शिक्षण देण्याची गरज त्यांना भासते. सत्ताधीशांनी सद्वर्तनी, प्रामाणिक निरपेक्ष लोकसेवक बनायला हवे, सद्विद्यासंपन्न राष्ट्रनेते व संस्थाचालक बनायला हवे अशी त्यांना तळमळ आहे. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न व जाणीव जागृती होणे इष्ट आहे असे काश्यप मानतात. त्यांची ही अपेक्षा रास्त आहे. परंतु आपल्या आजच्या समाजजीवनाला जी अवकळा आलेली आहे ती पाहता हे सारे प्रत्यक्षात येणे कसे जमेल अशी शंकाही डोकावत राहते. सुरुवात शालेय विद्यार्थी अवस्थेतच व्हायला हवी. तरच पुढे चांगले विद्यावंत जबाबदार नागरिक घडतील. त्यातूनच प्रामाणिक, नीटस, सेवाभावी नेते-अधिकारी लाभतील.

इंग्रजी माध्यमांच्या शाळा व इंग्रजी माध्यमाचा पहिलीपासून वापर याबद्दलही काश्यप यांना असमाधान आहे. इंग्रजी चांगले यायला हवे हे त्यांना मान्य आहे; पण इंग्रजी भाषेचेच नव्हे तर सर्व विषयांचे ज्ञान इंग्रजीतूनच मिळायला हवे हा पालकांचा हट्ट अनर्थकारक आहे असे ते मानतात. ज्ञानग्रहण हे मातृभाषेतूनच झटकन व चांगल्या प्रकारे होऊ शकते. इंग्रजीच्या प्राथमिक शालेय स्तरावरील शिक्षणाने मुलांचे मराठी-कच्चे राहून त्यांची अवस्था त्रिशंकूसारखी होईल. धड इंग्रजी येत नाही, आणि धड मराठीही जमत नाही. ही अवस्था मुलांना मानसिक दृष्ट्याही खच्ची करणारी ठरेल. इंग्रजीसाठी खर्चही खूप होतो. पालकांनी याबाबत विचारपूर्वक भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.

वैयक्तिक आणि सामूहिक जीवनातील चिंता, दु:खे, अडचणी यातून पूर्णपणे मुक्त होऊन जीवन सुखी, समृद्ध, समाजहितैषी, आत्मसंतुष्ट बनण्याचे विचार-उच्चार-आचार-कला व व्यवहार यांचे प्रभावशाली रसायन म्हणजे विद्या. अशी व्यापक संकल्पना पायाभूत धरून काश्यप यांनी आयुष्यभर चालणाऱ्या विद्यार्जनाची महती विशद केली आहे. त्यामुळे या पुस्तकाने विद्यार्थी व शिक्षक या दोहोंनाही नवे श्रेय गवसेल.

**पृष्ठे : १४० किंमत : १०० रु. सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**

---

**लवकरच प्रकाशित होत आहे....**

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांना बहुमोल मार्गदर्शन करणारे नवीन पुस्तक
**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व - लेखिका डॉ. रमा मराठे**

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलेच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले. वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

राजकारण

## इंदिरा गांधी, आणीबाणी व भारतीय लोकशाही




बांगला देशाची निर्मिती, सिक्कीमचे विलीनीकरण, आणीबाणी इ. १९७० च्या खळबळजनक घटनांचा आतापर्यंत अज्ञात असलेल्या माहितीसह सर्वंकश परामर्श घेणारे महत्त्वपूर्ण पुस्तक


मूळ लेखक : पी. एन. धर
अनुवाद : अशोक जैन
किंमत : २०० रु.

रोहन प्रकाशन, पुणे

चरित्र

## कस्तुरबा : शलाका तेजाची

महात्मा गांधींचे नातू अरुण गांधी यांनी संशोधनानंतर लिहिलेले कस्तुरबा गांधी यांचे भावस्पर्शी समग्र चरित्र





लेखक : अरुण गांधी
अनुवाद : अशोक जैन
किंमत : २००रु.

रोहन प्रकाशन, पुणे

राजकारण

## भ्रष्टाचार : भारताचा अंतस्थ शत्रू




भ्रष्टाचाराच्या विविध पैलूंचा मागोवा, त्यांचे संभाव्य भयावह परिणाम आणि मुख्य म्हणजे त्याच्या उच्चाटनासाठी व्यापक अभ्यासपूर्ण योजना

मूळ लेखक : डॉ. सी. पी. श्रीवास्तव
अनुवाद : डॉ. वसंत पटवर्धन
किंमत : १५०रु.

रोहन प्रकाशन, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## अभ्यास - कौशल्य

शिक्षण

श्रवण कौशल्य, वाचन कौशल्य, लेखन कौशल्य, स्मरणशक्ती, व्यक्तिमत्त्व विकास, परीक्षातंत्र इ. घटक कसे विकसित करावे, पालकांची भूमिका काय असावी? यांसाठी पद्धतशीर व सोपे मार्गदर्शन

लेखिका : डॉ. नन्दिनी दिवाण

किंमत : ५०रु.

रोहन प्रकाशन, पुणे




## आम्हाला भेटलेले डॉ. श्रीराम लागू

व्यक्तिचित्र



मराठी रंगभूमीवरील 'नटसम्राटाचा' जब्बार पटेल, विजया मेहता, गो. पु. देशपांडे, निळू फुले, प्रभाकर पणशीकर यांसारख्या ४० मातब्बरांनी घेतलेला 'कॅलिडोस्कोपिक' शोध

संपादन : पुष्पा भावे

किंमत : १५० रु.

रोहन प्रकाशन, पुणे

## इंदिरा गांधी

चरित्र

पुपुल जयकर या बालपणीच्या जिवलग मैत्रिणीने टिपलेली इंदिरा गांधींच्या मनाची आंदोलनं अनुवादित केली आहेत श्री. अशोक जैन यांनी.

लेखिका : पुपुल जयकर
अनुवाद : अशोक जैन

किंमत : २००रु.

राजहंस प्रकाशन, पुणे







# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## महानायक

कादंबरी




नेताजींचा उग्र गंभीर तरीही भावमधुर जीवनपट उलगडणारी महाकादंबरी.

लेखक : विश्वास पाटील

किंमत : ६०० रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

## पानिपत


कादंबरी

मराठी मनाला अस्वस्थ करून सोडणारे पानिपत कितीही वेळा वाचले तरी समाधान होत नाही.

लेखक : विश्वास पाटील


किंमत : २००रु.

राजहंस प्रकाशन, पुणे




## अग्निपंख

आत्मकथा




भारताचे राष्ट्रपतीपद भूषविणाऱ्या, सामान्य कुटुंबातील बुद्धिमान शास्त्रज्ञाची आत्मकथा

मूळ लेखक : ए पी जे अब्दुल कलाम
सहायक : अरुण तिवारी
अनुवाद : माधुरी शानबाग


किंमत : १४०रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## झाडाझडती

कादंबरी




गाव आणि देव पाठीवर बांधून चालणाऱ्या हजारो धरणग्रस्तांची मन सुन्न करणारी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी.


लेखक : विश्वास पाटील

किंमत : २००रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

## माझी मुलुखगिरी

ललित लेख




निसर्गाचे व भटकंतीचे अमर्याद वेड असलेल्या मिलिंद गुणाजींच्या जगावेगळ्या भटकंतीची सचित्र कहाणी


लेखक : मिलिंद गुणाजी

किंमत : १५० रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

## आंधळ्याच्या गायी

कथासंग्रह




मेघना पेठे या धडाडीच्या लेखिकेच्या पाच कथांचा हा दुसरा कथासंग्रह. या कथा आहेत की आपल्या आसपासचे वास्तव असा प्रश्न वाचकाला पडतो.

लेखिका : मेघना पेठे

किंमत : १२५रु.

राजहंस प्रकाशन, पुणे



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## एक होता कार्व्हर

कादंबरी




प्रत्येक सुजाण नागरिकाने वाचायलाच हवे असे हे पुस्तक गेली एकवीस वर्षे अनेक विक्रम प्रस्थापित करीत आहे.


लेखिका : वीणा गवाणकर

किंमत : १५० रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

## ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी

ललित लेख




जगण्यातील असोशी जगणाऱ्या, अनेक विषयांना गवसणी घालणाऱ्या रसील्या गप्पांचे शब्दचित्र.


लेखिका : प्रतिभा रानडे

किंमत : १५०रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

## मुग्धमधुर

ललित लेख



विविध वयात स्त्रीला सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अनुभवांना, अनुभूतींना आणि शारीरिक बदलांना समोर ठेवून केलेला युक्त संवाद

लेखिका : डॉ. वैजयंती खानविलकर

किंमत : २००रु.


राजहंस प्रकाशन, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

**आरोग्यविषयक**

## माझा साक्षात्कारी हृदयरोग

हृदयविकारावरील कितीही कथने, कहाण्या, मार्गदर्शनपर पुस्तके वाचली असतील तरी डॉ. अभय बंग यांच्या स्वानुभवांचे कथन प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असे साक्षात्कारी पुस्तक.





लेखक : अभय बंग

किंमत : १२५रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

**लेखसंग्रह**

## बोर्डरूम




व्यवस्थापन हा यशाचा मूलमंत्र आहे. जागतिक कीर्तीच्या अनेक रथी महारथी उद्योगपतींच्या व्यवस्थापन कौशल्याचा रंजक व चटकदार भाषेत घेतलेला आढावा.

लेखक : अच्युत गोडबोले

किंमत : १५० रु.


राजहंस प्रकाशन, पुणे

**कादंबरी**

## सत्तावन्न ते सत्तेचाळीस

स्वातंत्र्यलढ्याची संस्मरणीय कहाणी

१८५७ ते १९४७ या कालखंडातील भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाची ओळख.




लेखक : वि. स. वाळिंबे

किंमत : ७००रु.


राजहंस प्रकाशन, पुणे



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

**कथासंग्रह**

## हंस अकेला




रसिक जाणकारांना तसेच समीक्षकांना आव्हान अर्थगर्भ लेखन या कथासंग्रहात वाचायला मिळते.

लेखिका : मेघना पेठे

किंमत : १२५ रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

**ललित लेख**

## भटकंती

भटकंतीमधून आनंद लुटायचा असतो तसेच आनंद वाटायचाही असतो. पायाला भिंगरी लावलेले मिलिंद गुणाजी अनवट वाटांनी महाराष्ट्रातील किल्ले व दुर्ग पालथे घालतात तो हा अनुभव.





लेखक : मिलिंद गुणाजी

किंमत : ९०रु.

राजहंस प्रकाशन, पुणे

**चरित्र**

## अमृतपुत्र विवेकानंद




गोष्टी आणि आठवणीतून साकारणारे स्वामी विवेकानंदांचे प्रेरक व्यक्तिमत्त्व - प्रत्येक विद्यार्थ्याने, पालकाने वाचलेच पाहिजे असे पुस्तक

लेखक : दत्ता श्री टोळ

किंमत : २०रु.

चंद्रकला प्रकाशन, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## डॉ. अब्दुल कलाम


चरित्र

जिद्द, कष्ट, बुद्धिमत्ता आणि परमेश्वरावरील अढळ श्रद्धा यांच्या बळावर भारताच्या सर्वोच्च पदापर्यंतचा डॉ. अब्दुल कलाम यांचा प्रेरक प्रवास

लेखक : डॉ. रविकान्त पागनीस


किंमत : २५रु.

चंद्रकला प्रकाशन, पुणे




## आणखी एक पलायन

कादंबरी




एका सामान्य कसरतपटूचे आयुष्य दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कसे भरकटले आणि अनेक अन्याय, अत्याचार सोसत पुन्हा घराच्या किनाऱ्याला कसे लागले याची रोमहर्षक कथा- मुळातून वाचावी अशी....

लेखक : डॉ. रविकान्त पागनीस

किंमत : १८०रु.

चंद्रकला प्रकाशन, पुणे

## रियासतकार


चरित्र

इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात डोंगराएवढे काम करणाऱ्या रियासतकार सरदेसाईंच्या 'बहुमोल संशोधनकार्याचा इतिहास' सांगणारे चरित्र

लेखक : श. श्री. पुराणिक

किंमत : ३५०रु.

चंद्रकला प्रकाशन, पुणे







# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

## डेझर्टर

कादंबरी




अनेक संकटांना झुकांडी देणाऱ्या एका जर्मन सैनिकाची चित्तथरारक साहसकथा

लेखक : विजय देवधर

किंमत : २२०रु.

चंद्रकला प्रकाशन, पुणे

## द अदर साईड ऑफ सायलेन्स


राजकीय

फाळणीग्रस्त कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून लिहिलेला फाळणीचा चालता बोलता ज्वलंत इतिहास

मूळ लेखिका : उर्वशी बुटालिया
अनुवाद : नारायण आवटी

किंमत : २५०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे




## बिझिनेस लेजंडस्

व्यक्तिचित्र




भारताच्या चार प्रमुख उद्योगमहर्षींच्या अफाट कर्तृत्वाचा, वैचारिकतेचा, आगळ्यावेगळ्या जीवनशैलीचा चैतन्यमय आविष्कार घडवणारी जबरदस्त कलाकृती

मूळ लेखिका : गीता पिरामल
अनुवाद : अशोक जैन

किंमत : ३००रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

कादंबरी

## देवदास



शरदबाबूंच्या लेखणीतून साकारलेली एक अजरामर कहाणी

मूळ लेखक : शरच्चंद्र चट्टोपाध्याय
अनुवाद : मृणालिनी गडकरी

किंमत : ९०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे


## द ब्रेडविनर

कादंबरी

उद्‌ध्वस्त कुटुंबाला जगवण्यासाठी काबूलच्या रस्त्यावर उतरणाऱ्या व जिगर पणाला लावून लढणाऱ्या बहाद्दर परवानाची कहाणी.

मूळ लेखक : डेबोरा एलीस
अनुवाद : अपर्णा वेलणकर

किंमत : १००रु.




मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

आत्मकथन

## चाकाची खुर्ची




स्वतः अपंग असून अपंगांमधील क्षमता फुलवणाऱ्या नसीमा हुरजूक यांचं काळजाला भिडणारं आत्मकथन

लेखिका : नसीमा हुरजूक

किंमत : १८०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

मार्गदर्शनपर

## मनावर विजय



जीवनातील आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी मनाला नियंत्रित, प्रशिक्षित कसं करावं ? याचं शास्त्रशुद्ध मार्गदर्शन.

मूळ लेखक : एकनाथ इश्वरन
अनुवाद : वैशाली जोशी

किंमत : १२५ रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे


## क्षितिजस्पर्श

कथा

माणूस, त्याचं जगणं, त्याचं वृत्तीवैविध्य, त्याची भावभिन्नता याचं इंद्रधनुष्यी दर्शन घडवणाऱ्या खांडेकरांच्या अस्सल रुपककथा.

लेखक : वि. स. खांडेकर
संपा. : सुनीलकुमार लवटे


किंमत : ८०रु.




मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

काव्य

## त्रिवेणी




गुलज़ारांचे बावनकशी त्रिवेणीकाव्य, त्याची नजाकत याचे शान्ताबाईंनी मराठीत उतरवलेले अपूर्व शब्दशिल्प.

मूळ लेखक : गुलजार
अनुवाद : शान्ता ज. शेळके

किंमत : ६०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

मार्गदर्शनपर

## व्हॉट वेंट रॉंग?




आयुष्य वैराण करणाऱ्या वेदनेच्या, चुकांच्या सत्य कहाण्या आणि त्याबाबतचे डॉ. किरण बेदींचे अमोल विचारमंथन.

**मूळ लेखिका : डॉ. किरण बेदी**
**अनुवाद : लीना सोहोनी**

**किंमत : १५० रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

## द स्ट्रीम विदिन


कथासंग्रह

गेल्या पाच दशकातील प्रतिभावान बंगाली लेखिकांची आशयसंपन्न सुंदर कथापुष्पे

**अनुवाद : मीना वैशंपायन**

**किंमत : १३०रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



आत्मकथन

## तीन दगडाची चूल




सामाजिक, सांस्कृतिक चळवळीत झोकून दिलेल्या गोंधळी जातीतील एका स्त्रीच्या दाहक अनुभवांची जळजळीत आत्मकहाणी

**लेखिका : विमल मोरे**

**किंमत : १५०रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



# पुस्तके मिळण्याची ठिकाणे

**नामवंतांनी सुचवलेली पुस्तके आपण खालील दुकानांमधून मिळवू शकता. किंवा सदर प्रकाशन संस्थेकडेही मागणी करू शकता. यापुढील दोन अंकातून अशा निवडक पुस्तकांची माहिती आम्ही देणार आहोत. हे सर्व अंक संग्रही ठेवा व निवडक पुस्तकांची अवश्य मागणी नोंदवा.**

## पुणे

**रसिक साहित्य,** अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ००२ फोन नं. ४४५११२९
**श्री लेखन वाचन भांडार,** १००४, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२. फोन नं. ४४७४४७९
**पाटील इंटरप्रायझेस,** ४९७, गजानन चैतन्य, पत्र्या मारुतीमंदिराजवळ, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०. फोन नं. ४४८७६२९
**शुभम साहित्य,** ६६६, नारायण पेठ, महाराष्ट्र होजिअरीजवळ, अप्पा बळवंत चौक पुणे ४११ ००२. फोन नं. ४४७४३२२

## मुंबई

**आयडियल पुस्तक त्रिवेणी,** छबीलदास रोड, दादर मुंबई २८. फोन नं. २४३०४२५४
**मॅजेस्टिक एजन्सीज,** विष्णु निवास, टिळकपुलाजवळ, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई २८. फोन नं. २४३०५९१४
**जवाहर बुक डेपो,** १९/बी, श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पू) मुंबई ५ फोन नं. २६१४८७३५

## नासिक

**राहुल बुक सेंटर,** नेहरू गार्डन, शॉपिंग सेंटर, नाशिक ४२२००१. फोन नं. ५९९६०
**ज्योती स्टोअर्स,** जीवनछाया, मुरकुटे कॉलनी, गंगापूर रोड नाशिक फोन नं. ५०४०२६

## कोल्हापूर

**मेहता बुक सेलर्स,** ३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर फोन नं. ५२२३०४

## नागपूर

**साहित्य प्रसार केंद्र,** नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर १२. फोन नं. ५२३७०२
**नागपूर पॉप्यूलर बुक स्टॉल,** पटवर्धन हायस्कूल समोर, सीताबर्डी, नागपूर १२. फोन नं. ५२४२७८

## नांदेड

**अभय पुस्तक भांडार,**भोरे कॉम्प्लेक्स,महावीर चौक,नांदेड ४३१ ६०१.फोन नं. ४०२६५

## औरंगाबाद

**विद्या बुक्स,** औरंगपुरा, औरंगाबाद ४३१००१.फोन नं. ३३७३७१

## लातूर

**भारतीय पुस्तकालय,**मेन रोड,लातूर ४१२ ५१२.फोन नं. ४८३८४
**गजानन बुक स्टॉल,** वडवळ नागनाथ,ता. चाकुर, लातूर फोन नं.४८३८४

## सांगली

**स्टुडण्टस बुक डेपो,**सराफबाझारसांगली ४१६ ४१६.फोन नं. ३७४२५०
**जी.आर.ताम्हणकर बुकसेलर्स,**सराफनाका,सांगली ४१६४१६.फोन नं. ३७३६०५
**रत्नाकर बुक स्टॉल,**हायस्कूल रोड,पोस्ट बॉक्स नं,१३,मिरज, सांगली ४१६४१० फोन नं. २२२५६४

## सोलापूर

**सरस्वती बुक डेपो,**नवी पेठ,सोलापूर ४१३००१.फोन नं. ६२६६३०
**कुंदूर बंधू पुस्तक भांडार,**६३, नवी पेठ,सोलापूर ४१३ ००७ फोन नं. ६२६१५६

## अमरावती

**पॉप्यूलर बुक सेंटर,**झुनझुनवाला धर्मशाळाकॉटन मार्केट,अमरावती ४४४६०१ फोन नं. ५७३०८१


## अकोला

**मिहीर उद्योग केंद्र,**'केशव अर्चना'गांधी चौक,अकोला ४४४००१.फोन नं. ४४२१३८

## प्रकाशने

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन नं. ४४७६९२४
**राजहंस प्रकाशन,** १०२५, सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन नं. ४४७३४५९
**रोहन प्रकाशन,**३९६-ब, नारायण पेठ,पत्र्या मारूती चौक, पुणे ३०,फोन नं.४४८०६८६
**चंद्रकला प्रकाशन,**१३८,कसबा पेठ पुणे-११, फोन नं. ४४५५५७४






स. न. वि. वि.

आपल्या मेहता मराठी ग्रंथ जगतच्या दिवाळी अंकाचे मी सविस्तर वाचन केले. यंदाच्या दिवाळीत मी जवळजवळ २५ दिवाळी अंकांचे वाचन आत्ता पर्यंत केले आहे. या सर्वांपेक्षा वेगळा असा आपला दिवाळी अंक मला वाटला.
मला भावलेली वैशिष्ट्ये अशी : श्री. आनंद यादव यांचे त्यांना आलेल्या पु. ल. देशपांड्यांच्या पत्रावरचे भाष्य, श्री. द. ता. भेसले यांनी करून दिलेला बापूसाहेब झपके यांचा परिचय. फारशी प्रकाशात नसलेल्या झपके यांच्यासारख्यांचं व्यक्तीमत्व किती वेगळं व वैशिष्य्यपूर्ण असू शकतं याची माहिती या लेखावरून समजते. श्रीमती ललिता पवार व श्री. यशवंत दत्त यांच्याबद्दलची बरीचशी अपरिचित परंतू वाचनीय अशी माहिती. संबंधित लेखकांनी या कलावंतांची फक्त चांगलीच वाजू मांडली असं नव्हे तर त्यांच्यातले दोषही कौशल्यपूर्ण भाषेत दाखवून दिले आहेत. यशस्वी परदेशी लेखक तसेच भारतीय लेखकांच्या लिखाणाचा थोडक्यात घेतलेला परामर्षही वाचनीय आहे.
एकूण काय तर कायम संग्रही ठेवावा असा आपला अंक आहे.

**ॲड. मधुकर देशपांडे, पुणे.**

स. न. वि. वि.

मेहता मराठी ग्रंथ जगतचा दिवाळी अंक वाचला. अनोख्या विषयावरील सजलेला हा दिवाळी अंक खरोखरच वाचनीय झाला आहे.
नाते सौहार्दाचे, साहित्याचे या सदरातील डॉ. आनंद यादव यांचा लेख म्हणजे नवोदित साहित्यिक, लेखक आदींना मार्गदर्शक ठरावा असा आहे. कांचन घाणेकर, चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. प्रभुणे, यांच्या लेखांसह सुमेध वडावाला आदींचे लेख खरोखरच वाचनीय आहेत. सरस्वतीचे संस्कार करणारे अनंत अंतरकर यांचे वरील लेख, इंग्रजी बेस्टसेलर्समधील बेस्ट, लेखक प्रांतोप्रांतीचे, वेगळ्या वाटेवरील नव्हे वाटांशी बातचीत वाचताना एकूण हा अंक इतर दिवाळी अंकांच्या तुलनेने आगळा वेगळा असा झाला आहे. सर्वच लेख सुंदर वाचनीय आहेत.

**नंदकुमार रोपळेकर, मुंबई.**

संमेलने **बालसाहित्य -**

# समाजाला सुखशांती मिळवून देणारे प्रभावी शांतीअस्त्र

हे आज असं का घडतंय? अतिरेकी हे कशामुळे निर्माण झाले? या अतिरेक्यांच्या कानावर जर त्यांच्या लहानपणी चार चांगल्या गोष्टी पडल्या असत्या तर ते अतिरेकी न बनता अतिविवेकी बनले असते, असं मला वाटतं. पण या अतिरेक्यांचे बाप अतिरेकी असावेत. ते बापलेक तरी असे का वागले? अशा या दुष्टचक्राच्या भोवऱ्यातून अशीच परंपरा मग त्यांच्याकडे होती. त्यामुळे हे घडले. यापेक्षा काय वेगळं निष्पन्न होणार? असं निराशावादी न होता, हे चित्र आपणच बदलू शकतो हे लक्षात घ्या. यासाठी आपल्याजवळ असणारं साधन हे झपाट्यानं बदलणाऱ्या काळात प्रभावी ठरेल, अशा पद्धतीने सुधारून ते मुलांच्या हातात दिले तर भावी पिढी तरी चांगल्या वळणावर येईल. हे साधन म्हणजे बालांसाठी लिहिलेली पुस्तके. ज्ञानार्जनाचे, रंजनाचे संस्कार व व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचे हे एक प्रभावी साधन आहे.

थोरांना सुधारण्यापेक्षा पोरांना सुधारणे अधिक सुलभ आहे हे जगद्मान्य सत्य आहे. या संदर्भाने आजच्या समाजात बिघडलेल्या परिस्थितीमुळे बालसाहित्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेलं आहे. लहान मुलांच्यावर ८ वर्षांपर्यंत होणाऱ्या संस्काराची परिणती हेच त्याचे भविष्यातले व्यक्तिमत्त्व असते. काही अपवाद वगळता हे व्यक्तिमत्त्व अपरिवर्तनीय असते. जगातील सर्व मानसशास्त्रज्ञांनी हे मान्य केलेले आहे. यासाठी मुलांची बाल्यावस्थेची जोपासना ही अत्यंत महत्त्वाची आहे. या अनुभूतीला पूरक असे पालक आणि वातावरण लाभलेले भाग्यवान फार थोडे. बहुतेकांच्या वाट्याला सद्यः परिस्थितीत हे अल्पांशानेही मिळणे महाकठीण आहे. या सर्व परिस्थितीत ही उणीव भरून काढण्याची क्षमता फक्त बालसाहित्यात आहे. अर्थातच साहित्य हे साधन तितके प्रभावी करून त्याचा प्रचार प्रसार केल्यावरच हे घडणार आहे. अण्वस्त्र हे विध्वंसाचे प्रभावी साधन आहे तर बालसाहित्य हे समाजामध्ये सुखसमाधान मिळवून देणारे शांती अस्त्र आहे. या संदर्भात धर्म व जातिभेद यांमुळे निर्माण होणारा तणाव दूर करण्याची ताकद त्या दृष्टीने निर्माण केलेल्या बालसाहित्यात आहे. बालसाहित्याच्या या शक्तिस्थानामुळे ते माझे एक श्रद्धस्थानच होय. या दृष्टिकोनातूनच नवे बालसाहित्य निर्माण होणे गरजेचे आहे. यापूर्वीच्या बालसाहित्यात अनेक बलस्थाने आहेत. त्यांची पुनर्मांडणी करण्याची आवश्यकता आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासात येणारा एक अडथळा म्हणजे ताणतणाव. साधारणपणे मुलांचे ब्लडप्रेशर तपासण्यात येत नाही. परंतु काही कारणपरत्वे केलेल्या तपासणीमध्ये हे ब्लडप्रेशर वाढले आहे, असे दिसून आले आहे. याचा परिणाम त्यांच्या पालकाचे ब्लडप्रेशर वाढविण्यातही झालेला आहे. ताणतणाव निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत आणि ती दूर करणे सोपे नाही. त्यापेक्षा आलेल्या ताणतणावांना सामोरे जाण्याची ताकद मुलांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. हेही काम करण्याची क्षमता बालसाहित्यामध्ये आहे. हे ताणतणाव कमी करणारी



विनोदी पुस्तके बालसाहित्यात फारच थोडी आहेत. अशी विनोदी पुस्तके लिहिण्याची क्षमता असणारे लेखक देखील मोजकेच आहेत. काळाची गरज लक्षात घेऊन आपली लेखणी विनोदकारांनी बालस्वास्थ्यासाठी चालवावी असे त्यांना माझ्या कळकळीचे आवाहन आहे.

आजची मुले मागच्या पिढीच्या तुलनेने खरोखरच हुशार आहेत. परंतु मानसिकदृष्ट्या ती कमकुवत आहेत. त्यामुळे त्यांची बुद्धिमत्ता फलदायी ठरत नाही. तुम्ही कितीही बुद्धिमान असला आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत असला तर यशाऐवजी अपयशच तुमच्या गळ्यात माळ घालणार. ज्या ज्या वेळी तुमच्या मनात भीती, चिंता, काळजी, राग, द्वेष असतो, त्या त्यावेळी मनावर आलेल्या ताणामुळे तुमची कार्यक्षमता नष्ट होते. कार्यक्षमता नष्ट होणे म्हणजे जे काम शंभर वेळा यशस्वी केले आहे ते काम करतानाही तुम्ही नंतर चूक करता. त्यामुळे 'एवढा घोडा झालास तरी तुला साधी अक्कल कशी नाही? 'यापेक्षा मोठ्या दर्जाचे आशीर्वाद मुलाला घ्यावे लागतात. यातून होणाऱ्या अपमानामुळे तो नैराश्याच्या दुष्ट चक्रात अडकतो आणि अपयशाच्या भोवऱ्यात गटांगळ्या खातो. हे सगळं बदलण्याची ताकद मानसिक बदलाच्या तंत्रात आहे; पण हे थेट शिकविल्यास हे त्या प्रमाणात उमजत नाही. त्यामुळे ते रुजत नाही आणि आचरणातही येत नाही. थेट शिकविलेलं कुणालाच आवडत नाही. हेच तंत्र गोष्टीरूपाने सांगितलं तर सहजतेने मुलांच्या पचनी पडतं व आचरणातही येतं. याचं उत्तम उदाहरण म्हणजे पंचतंत्रातील, इसापनीतीतील कथा हे होय.

काळाची गरज जाणून हेतूपूर्वक य विषयावर मुलांसाठी लेखन करण्याचे आवाहन मी सबल लेखकांना करतो. बालसाहित्याचे इतके महत्त्व असूनही ते बऱ्यापैकी दुर्लक्षित आहे. लहान वयातच वाचनाची गोडी निर्माण झाली तर यातूनच भावी कानसेन व भीमसेन म्हणजेच भावी वाचक व लेखक निर्माण होणार आहेत. प्रौढसाहित्यात सकस बदल होण्यासाठी बालसाहित्यदेखील ताकदीने जोपासले गेले पाहिजे. बालसाहित्याकडे उपेक्षेने पाहण्यापेक्षा मोठ्या अपेक्षेने लक्ष देण्याची तयारी समाजाने दाखवायला हवी.

बालसाहित्याच्या उपेक्षेचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे बालसाहित्याबद्दलचे गैरसमज. खुद्द शिक्षणामधूनच या गैरसमजांची सुरुवात होते. 'आमचा मुलगा अभ्यासापेक्षा उठसूट गोष्टींची पुस्तके वाचतो.' अशी पालक तक्रार करतात, तेव्हा मला कपाळावर हात मारून घ्यावासा वाटतो. मराठी माध्यमाची मुले सर्व विषय मराठीतूनच अभ्यासत असतात. जी इतर विषयांची ज्ञानभाषा आहे त्या मायभाषेत तो पारंगत असण्याची आवश्यकता आहे. या ज्ञानभाषेत म्हणजे मराठीत विद्यार्थी पारंगत असेल तर तो अन्य विषयही मोठ्या प्रमाणात स्वतंत्रपणे शिकू शकतो. परंतु प्रत्यक्षात या ज्ञानभाषेचे ज्ञान हे पाठ्य पुस्तकातील प्रश्न स्मरणशक्तीच्या जोरावर सोडवून गुण मिळविण्याशी निगडीत झाले आहे. या 'मार्क्सवादा' ने ३५% ध्येय सहजी प्राप्त झाल्यामुळे वाचन संस्कृती ५% वर येऊन बसली आहे. झपाट्याने बदलणाऱ्या युगात वाचनाची सवय ही केवळ पदवी मिळविण्यासाठी मर्यादित नसून संपूर्ण जीवनातच सफल होण्यास उपयुक्त ठरणार आहे. भावी आयुष्यातील यशाचे आरक्षण वाचन संस्कृतीच्या प्रगतीतून होणार आहे. यासाठी मराठी या ज्ञानभाषेच्या शिक्षणपद्धतीत बदल करणे गरजेचे आहे.

केवळ वाचनाची गोडी निर्माण झाली तर शिक्षणातील बरेच प्रश्न सुटणार आहेत. पण घडविणार कसे? याबाबत एक प्रयोग मी आपल्यापुढे मांडत आहे.

लहान मुलांना वाचायला येण्यापूर्वी चित्रातून बरेच शब्द ज्ञान व छोटी वाक्ये कळू

शकतात. या वयात त्यांना बोलता येत नाही म्हणून त्यांना काय कळतंय ते आपल्याला कळत नाही. चित्रावरून आशय कळण्याची क्षमता ही शब्दरूप आवाजाशी निगडीत करून वाढविता येते. यासाठी केवळ चित्र असणाऱ्या पुस्तकातून मुलांशी सतत संवाद साधला गेला पहिजे. चित्रकथातून ही गोडी निर्माण होते आणि हळूहळू ती वाढीस लागते. जेव्हा पालकांना वेळ नसतो त्यावेळी स्वतःला रिझविण्यासाठी मुलेच पुस्तकं घेऊन चित्रे पहात, पाने उलटत, त्यांतील गोष्ट स्वतःच स्वतःस सांगतात. अशावेळी पालकांनी आपणच सांगितलेली गोष्ट मुलांनी सांगावी असा आग्रह धरू नये. कारण तो सांगत असलेल्या वेगळ्या गोष्टीत सृजनशीलतेचा जन्म होत असतो. ती जोपासण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे. या अनुभूतीतून पुस्तकाची ओळख होते आणि वाचनाची गोडी लागते. दूरदर्शनचे दर्शन होण्याआधी पुस्तकदर्शनाची अनुभूती वारंवार मिळाल्यास ही अनुभूती टी.व्ही. ला आपोआपच दुय्यम स्थान देते. तुमच्या मुलांनी कसे वागावे याचे उपदेश देण्यापेक्षा त्यांना सतत तसे वागण्याची दिसू देत. तुम्ही संध्याकाळी सतत टी.व्ही पुढे बसून मैदानावर खेळायला जा सांगितल्यास तो जाण्याची शक्यता कमी. मुले अनुकरणप्रिय असतात. त्याचा फायदा करून घ्या. घरातले सर्वजण आपल्या आवडीनुसार वाचत असल्याचे दृश्य वारंवार मुलांना दिसले तर तीही आपोआप वाचायला लागतात.

'वाचेल तो वाचेल' हे आपलं ब्रीद असंल पाहिजे. हे वाक्य केवळ परीक्षार्थी वाचनाशी निगडीत नसून त्याचा सफल जीवनाशी संबंध आहे. बालवयात ज्याला वाचनाची गोडी लागेल तो आयुष्यात सतत वाचत राहिल्याने त्याच्या यशाचा मार्ग सुकर होईल. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे झपाट्याने बदलणाऱ्या काळात विद्यार्थी पदवी घेऊन वास्तव जगात प्रवेश करेल, त्यावेळी त्याचे पदवीज्ञान कालबाह्य झालेले असेल. अद्ययावत ज्ञानासाठी जो वाचेल तो टिकेल. माझ्या मते तर औषधावर जशी Expiry Date असते तशी पदवीवरही देणे गरजेचे आहे. मी एक गणिताचा मास्तर. चिन्हांच्या सांकेतिक भाषेत खेळणारा. त्यामुळे शब्दांचा कमीत कमी वापर करणारा. पुस्तके वाचण्याच्या जोडीनेच संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या संपर्कात राहून, तज्ज्ञांची भाषणे ऐकून, विविध व्यक्तींशी बोलून, ऐकून आणि अनुभूतीतून मी माझी वाटचाल केली. मुलांसाठी काहीही लिहिण्यापूर्वी मी मनाने बालसहित्यिक होतो. याचे कारण अतिशय बिकट परिस्थितीत शाळेची स्थापना करून ती वाढविताना, मी सतत मुलांच्या संपर्कात होतो. अनेक वर्षे बालविश्वातच मी रमलो होतो.

या काळात मिळालेल्या अनुभूतीविषयी मी मित्र मंडळींशी बोलत असे.

अमरेंद्र गाडगीळ, भा.रा.भागवत, सुधाकर प्रभू यांच्या आग्रहामुळे मी लिहिता झालो. अशा अनुभूतींची मनात खूप गर्दी झाल्यावर त्याचं ओझं न पेलल्यामुळे ते शब्दस्वरूपात खूप उशिरानं बाहेर आलं. ते पोरांना आणि थोरांना आवडल्यामुळे माझा उत्साह वाढला.

**बालसाहित्याचे प्रयोजन : मनोरंजनातून शिक्षण**

मला लिहिण्यापेक्षा बोलायल जास्त आवडत असल्यामुळे मनात साठलेले अनुभूतींचे, अनुभवाचे ओझे मी कथाकथनातून हलके केले. त्यावेळी द.मा.मिरासदार, शंकर पाटील व व्यंकटेश माडगुळकर या त्रयींचा आदर्श आमच्यासमोर होता. गणित आणि विज्ञान हे विषय मुळामध्ये अवघड नाहीत. परंतु हे विषय अवघड आहेत, या तथाकथित भीतीमुळे मुलांनी त्यांचा धसका घेतला होता. कोणतीही गोष्ट करावी किंवा अभ्यासावी असे वाटते तेव्हा तिची गोडी लागावी लागते. ती निर्माण करण्यासाठी विज्ञान कथाकथनाचा कार्यक्रम



करण्याचे ठरविले. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमेटिक असोसिएशनचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. भालबा केळकर,'विज्ञानयुग' मासिकाचे संपादक गजानन क्षीरसागर, विज्ञान साहित्यकार निरंजन घाटे आणि मी असे चौघे मिळून शाळाशाळांतून मुलांसाठी विज्ञान कथाकथन करीत असू. त्यात मी मात्र गणित काल्पनिका सांगत असे व इतर तिघे विज्ञानकथा सांगत. या सर्वांच्यात माझी फजिती होत असे. आजवर गणित काल्पनिका कोणी लिहिल्याचे माझ्या माहितीत नव्हते. त्यामुळे मला या कथा लिहाव्या लागल्या. गणित हा विषय अमूर्त असल्यामुळे हे लिहिणे अवघड गेले. त्यात शालेय पातळीवरील मर्यादित गणिती ज्ञानावर कथा लिहिणे ही आणखी एक अडचण होती. त्यामुळे अशा कथा मोठ्या प्रमाणावर लिहून होणं अवघड बनले. परंतु यातून मुलांना आनंद होतो म्हणून मी ते आव्हान म्हणून स्वीकारले आणि यशस्वी झालो. यातून मला एक प्रकारचे मानसिक समाधान लाभले. यापूर्वी मी मुलांसाठी एक डझनभर पुस्तके लिहिली होती. ती साधारणपणे ५०लाख म्हणजे सुमारे अर्धाकोटी मुले वाचत होती. लाखांनी वाचणारे हे वाचक प्रत्येक पानागणिक मला लाखोली वाहत होते. याचे कारण ही सर्व पुस्तके गणिताची पाठ्यपुस्तके होती. हा एक मला शापच होता. आपले लेखन कुणाला आवडत नाही आणि पर्यायाने आपण देखील मुलांना आवडत नाही, याची एक खंत होती. आपण कुणालातरी आवडतो, हवेहवेसे वाटतो या सुखद कल्पनेपासून मी वंचित झालो होतो. गणित काल्पनिका लिहिल्यामुळे काही प्रमाणात मला मुलांना त्यांचे हरवलेले बालपण परत मिळवून दिल्याचे समाधान मिळाले. आजच्या शिक्षणातून सर्जनशीलतेला वाव मिळत नाही. विज्ञानकथा किंवा गणितकथा लिहिण्याऐवजी विज्ञान काल्पनिका आणि गणित काल्पनिका यातून रंजनही होते व सर्जनशीलताही जोपासली जाते. याबरोबरच या विषयाची गोडीही लागते. प्रतिभावंत लेखकांनी अशाप्रकारचे लेखन करून मुलांमधील शिकण्याची उर्मी वाढविण्यास हातभार लावावा अशी अपेक्षा आहे.

बालसाहित्याचा एकांगी विचार करून चालणार नाही कारण म्हणजे स्वरूप मुळात बहुअंगी आहे. त्यामुळे यासंबंधी बोलणे हे कधीही न संपणारे आहे.

बालसाहित्याचे प्रयोजन हेच मुळी मुलांना मनोरंजनातून शिक्षण देणे हे होय. गणितासारखा उगीचच अवघड वाटणारा विषय बहुसंख्य मुलांचा आनंद हिरावून घेतो.

वास्तविक पाहता गणिताची निर्मितीच मुळी माणसाच्या गरजेतून झालेली आहे. त्यामुळे गणित हा सहजस्फूर्तीने येणारा विषय आहे. जीवनामध्ये गणिताशी पदोपदी संवाद साधावा लागतो. पण दुर्दैवाने त्यांची रंजक बाजू मात्र समोर आली नाही. त्यामुळे गणित हा विषय किचकट आणि रटाळ वाटू लागला. पण हाच विषय विनोदकथा, एकांकिका, कादंबरीचे स्वरूप धारण करून सामोरा आला तर विद्यार्थी त्याचे मनापासून स्वागत करतात. मला मिळालेला बहुमान हा अशा प्रकारच्या साहित्यलेखनाचा बहुमान आहे. त्यामुळे मला सर्वात जास्त आनंद झालेला आहे.

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आणि बालसाहित्याची जीवनोपयोगी जडणघडण करण्यासाठी आपण ही कृतिपाठ कराल अशी खात्री आहे.

बालसाहित्यमेव जयते।

बालसाहित्याचं चांगभलं!

(सातारा येथे २१-२२ डिसेंबर रोजी झालेल्या अ.भा.बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून)

# पुरस्कार

## डॉ. करंदीकर यांना संतसाहित्य पुरस्कार

परंपरा टिकवणे आणि ती समृद्ध करणे यासाठी व्यक्तिगत तसेच संस्थात्मक पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे असून, डॉ. वि. रा. करंदीकर यांनी आपल्या कार्यातून परंपरा टिकवण्याचे मोलाचे कार्य केले आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत चं. प. भिशीकर यांनी व्यक्त केले.

श्री संतदर्शन मंडळाच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. रा. करंदीकर यांना 'संत साहित्य' पुरस्कार तर 'गानवर्धन'चे संस्थापक अध्यक्ष कृ. गो. धर्माधिकारी यांना 'शास्त्रीय संगीत संवर्धन संघटक पुरस्कार' भिशीकर यांच्या हस्ते आज देण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. प्रत्येकी दोन हजार दोन रुपये, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. रावसाहेब सूर्यवंशी, शरच्चंद्र पाटणकर, अँड कांतिलाल संचेती, रवींद्र दुर्वे व मंडळाचे अध्यक्ष श्रीराम साठे उपस्थित होते.

भिशीकर म्हणाले की, कोणतेही कार्य तडीस नेण्यासाठी संपूर्ण आयुष्य वाहावे लागते. अशा कार्यासाठी अंगी गुणवत्ता व चिकाटी असावी लागते. सध्या आपली परंपरा, संस्कृती याविषयी अनास्था असून ही स्थिती बदलण्यासाठी समाजात स्वत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. करंदीकर व धर्माधिकारी यांनी त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले आहेत. डॉ. करंदीकर म्हणाले की,'माझ्या जीवनावर स्वामी विवेकानंद व रा. स्व. संघ यांचा प्रभाव असून त्यांच्या प्रेरणेतूनच माझे लेखन मी केले.'

## गणगोताच्या ऋणात राहणे पसंत करेन : सुलोचना

''आपल्या भूमिकांबद्दल कौतुक करणारे रसिक हे माझे गणगोतच आहे. त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करीन,'' असे ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांनी सांगितले. 'राजमाता जिजाऊसाहेब मानवंदना समितीतर्फे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते सुलोचना यांना 'राजमाता जिजाऊसाहेब पुरस्कार' देण्यात आला. ७५ हजार रुपये व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. दिग्दर्शक राम गबाले, मधुकर पाठक, अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर, चंद्रकांत गोखले, अभिनेत्री बेबी शकुंतला यांनी सुलोचना यांच्या गौरवपर भाषणे केली. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी मानपत्राचे वाचन केले.

सुलोचना म्हणाल्या,''साडेतीनशे वर्षांपूर्वी जिजाऊसाहेबांनी छोट्या शिवबाचा हात धरून ज्या भूमीत सोन्याचा नांगर फिरवला, त्याच पुण्यभूमीत त्या तेजस्वी मातेच्या नावाने पुरस्कार मिळत असल्याचा आनंद होत आहे. माझे गुरू भालजी पेंढारकर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेली जिजाऊंची भूमिका ही मला आवडणाऱ्या भूमिकांपैकी एक आहे.''

'साक्षात सरस्वतीकन्या' असा सुलोचना यांचा उल्लेख करून पुरंदरे म्हणाले,''सरस्वतीनेच



कलेच्या क्षेत्रात पाठवलेले हे रत्न आहे. त्यांचे सात्विक हास्य कायमचे लक्षात राहणारे आहे. चित्रपटसृष्टीचा इतिहास लिहिताना सुलोचनाबाईंची दखल घ्यावी लागेल.''

''मोठ्या बहिणीसारखे प्रेम वाटावे असे महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचे व्यक्तिमत्त्व,'' असा गबाले यांनी सुलोचनाबाईंचा उल्लेख केला. सुलोचनाबाईंनी कधी अभिनय केला नाही, त्या प्रत्येक भूमिका जगल्या. कोणत्याही भूमिकेत त्या सहज मिसळून जात, असेही त्यांनी सांगितले. भालजी पेंढारकर यांनी बाईंना दिलेले 'सुलोचना' हे नाव सार्थ असल्याचेही बेबी शकुंतला यांनी सांगितले. त्या सहकलाकाराला सतत प्रोत्साहनात्मक प्रतिसाद देत, याचा उल्लेख श्री. गोखले यांनी केला.

सरस्वती आणि लक्ष्मी या दोन्हींचे रूप सुलोचनाबाईंच्या ठिकाणी एकवटल्याचे कोल्हटकर यांनी सांगितले. श्री. पाठक म्हणाले,''तुकारामांची विठ्ठलावर जशी भक्ती होती, तशीच सुलोचनाबाईंची भालजींवर भक्ती आहे. तीच त्यांची शक्ती आहे. सूक्ष्म निरीक्षणशक्तीमुळे त्यांच्या भूमिका वेगळ्या व जिवंत झाल्या. समितीचे अध्यक्ष रवींद्र गाटे यांनी स्वागत केले. चारूदत्त सरपोतदार यांनी आभार मानले.

## डॉ. जब्बार पटेल यांना पुण्यभूषण पुरस्कार

सांस्कृतिक परंपरेविषयी ऋण व्यक्त करतानाच ती मोडणाऱ्यांचे कौतुक करण्याचा गुण पुणेकरांमध्ये आहे आणि त्यामुळेच पुण्यभूषण पुरस्कार मिळत असल्याचा विशेष आनंद वाटत आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी मनोगत व्यक्त केले.

१४ डिसेंबर रोजी त्रिदल संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. पटेल यांना अभिनयसम्राट दिलीपकुमार यांच्या हस्ते पुण्यभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, महापौर दीप्ती चौधरी, यापूर्वी पुण्यभूषण देऊन गौरवण्यात आलेले चंदू बोर्डे हेही व्यासपीठावर होते.

पंढरपुरातला जन्म आणि सोलापुरातले शालेय शिक्षण घेताना श्रीराम पुजारींसारखा शिक्षक लाभला, अशी कृतज्ञता व्यक्त करून डॉ. पटेल म्हणाले की, वैद्यकीय शिक्षणासाठी पुण्यात येण्याची संधी मिळाली. त्यामुळे डॉ. श्रीराम लागू, भालबा केळकर यांच्यासारख्यांचे मार्गदर्शन मिळू शकले. सोलापूरला पुजारी सरांच्या घरीच राहत असल्याने कुमार गंधर्व, भीमसेन जोशी अशांना जवळून बघता आले. तेंडूलकर यांच्यासारखा नाटककार लाभला आणि चंदावरकर, मुळगुंद यांच्यासह अनेक सहकारी, मित्र पुण्यात मिळाले. लहान वयातच दिलीपकुमार यांचा अभिनय बघायला मिळाला. त्यामुळे पुरस्कार स्वीकारताना या सर्वांविषयी ऋण व्यक्त करायला हवे. परंपरेचे ऋण व्यक्त करतानाच सांस्कृतिक क्षेत्रात बंडखोरी करणाऱ्या सृजनशीलतेला पुण्यातच दाद व पाठिंबाही मिळाला. त्यामुळे पुण्यभूषण मिळाल्याचा विशेष आनंद होत आहे, अशी भावनाही पटेल यांनी व्यक्त केली पटेल यांनी तयार केलेला डॉ. आंबेडकर हा भारतात तयार झालेला सर्वश्रेष्ठ चित्रपट आहे, अशा शब्दांत दिलीपकुमार यांनी पटेल यांचे कौतुक केले. जब्बार हा मेहनती, सहजासहजी हार न मानणारा, अभ्यासू आणि जीव ओतून काम करणारा रंगकर्मी असा गौरव तेंडूलकर यांनी केला. महापौर दीप्ती चौधरी यांनी स्वागत तर देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश

पायगुडे यांनी आभार मानले.

'देवदास' मधील हळुवार व भावुक स्वर, गंगा-जमनातील रांगडेपणा आणि मुघल-ए-आजममधील शहजादा सलीमचा शाही आवाज या सर्वांची साक्ष केवळ आवाजातील चढउतार व बदलांद्वारे घडवित दिलीपकुमार यांनी अभिनयसम्राट असल्याचे दाखवून दिले. डॉ. जब्बार पटेल यांनी केलेल्या हातवाऱ्यांची साभिनय नक्कल करत व त्यांचे बोलणे मराठी येत नसल्याने समजले नाही, असे सांगतानाही दिलीपकुमार यांनी दाद मिळवली. तुम्ही लोक हसत होता, तेव्हा मी हसत होतो, टाळ्याही वाजवत होतो. नंतर मात्र टाळ्या वाजवणे थांबवले आणि तुमचे टाळ्या वाजवणेच 'एंजॉय' केले, असे सांगून त्यांनी दाद मिळवली. मराठी भाषेला असलेला प्रवाहीपणा आपल्याला आवडतो, असे सांगून, 'मला पण थोडाबहुत बोलता येतं' असे मराठीत बोलून दिलीपकुमार यांनी रसिकांची मने जिंकली.

## इंद्रजित भालेराव यांना शेतकरी साहित्य पुरस्कार

मराठीतील नामवंत कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांना २००२ सालचा शेतकरी साहित्य पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. प्रा. भास्कर चंदनशिव, प्रा. शेषराव मोहिते, प्रा. सदानंद देशमुख, नारायण सुमंत हे या अगोदरच्या या पुरस्काराचे मानकरी आहेत. शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानचा हा पुरस्कार एक हजार रुपयांचा आहे.

इंद्रजित भालेराव हे परभणीचे रहिवासी असून मराठीचे प्राध्यापक आहेत. पीकपाणी या १९८९ साली प्रकाशित झालेल्या पहिल्याच कविता संग्रहाने त्यांना मोठी मान्यता मिळवून दिली. दूर राहिला गाव, आम्ही काबाडाचे धनी, कुळंबीणीची कहाणी, पेरा या नंतरच्या कवितासंग्रहांचेही चांगले स्वागत झाले. कविता वाचनाच्या आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीमुळेही त्यांना लोकप्रियता मिळाली आहे. गाई घरा आल्या, लळा, भिंगुळवाणा हा ललित गद्यांची पुस्तके प्रसिद्ध असून संत जनाबाई, बहिणाबाई चौधरी आणि ताराबाई शिंदे यांच्यावरही त्यांनी लिहिले आहे. बी. रघुनाथ यांच्या समग्र वाङ्मयाचे संपादन त्यांनी केले असून संपादन आणि ललित गद्यालेखनाचेही राज्यपुरस्कार मिळविले आहेत.

## जागतिक लघुकथा स्पर्धेत डॉ. एडल यांना पारितोषिक

जागतिक पातळीवर घेण्यात येणाऱ्या 'कॉमनवेल्थ शॉर्ट स्टोरी कॉम्पिटिशन' मध्ये विशेष उल्लेखनीय विजेते (हायली कमेंडेड विनर्स) या विभागात पुणे येथील डॉ. एन. सी. एडल यांच्या रिसिडिंग वॉटर्स' या कथेला पारितोषिक मिळाले.

कॉमनवेल्थ तर्फे १९९६ पासून ही स्पर्धा घेण्यात येत आहे. या वर्षीचे पहिले पारितोषिक मायकेल रेकॉर्ड या जमैकन लेखकाला मिळाले आहे. प्रत्येक खंडातील एक सर्वसाधारण विजेता याप्रमाणे पाच प्रादेशिक पुरस्कार आणि २० विशेष उल्लेखनीय पुरस्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. एडल रुबी हॉलमध्ये 'कन्सलटिंग फिजिशियन' म्हणून काम करीत असून



एम.बी.बी.एस. आणि एम.डी. या दोन्ही परीक्षांमध्ये त्यांनी सुवर्णपदक पटकावले होते. यापूर्वी बी.बी.सीने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय लघुकथा स्पर्धेत त्यांना सर्वोत्कृष्ट कथेसाठीचे पारितोषिक मिळाले होते. नुकत्याच झालेल्या 'साप्ताहिक सकाळ'च्या कथास्पर्धेतही ते बक्षीस विजेत ठरले होते. या वर्षीचा कॉमनवेल्थ पुरस्कार त्यांच्या व्यक्तिरिक्त आणखी तीन आशियाई लेखकांना मिळाला आहे.

## महेश एलकुंचवार, गुलजार यांना 'साहित्य अकादमी' चा पुरस्कार

देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या 'साहित्य अकादमी' पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली असून मराठीतील प्रथितयश नाटककार महेश एलकुंचवार, उर्दूतील ज्येष्ठ कवी गीतकार गुलजार, नामवंत तामीळ लेखक सिरपी बालसुब्रमण्यन् यांच्यासह २२ साहित्यिकांचा समावेश आहे.

ताम्रपट आणि ४० हजार रोख रुपये असे स्वरूप असलेला हा पुरस्कार १७ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक विजेत्यांना प्रदान केला जाईल.

कार्यकारी मंडळाने १७ अनुवादकांचीही पुरस्कारासाठी निवड केली असून त्यांना प्रत्येकी १५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक दिले जाईल. गुलजार यांच्या 'धुआँ' या उर्दू लघुकथा संग्रहाची तर एलकुंचवार यांच्या 'युगान्त' नाटकाची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. कोंकणी साहित्यकृतीसाठी हेमा नाईक, इंग्रजीत अमित चौधरी, हिंदीत राजेश जोशी यांनाही पुरस्कार जाहीर झाला आहे. अनुवादकांमध्ये मराठीतील पत्रकार इब्राहिम अफगाण, गुजरातीत शकुंतला मेहता, इंग्रजीत नीथा कुमार, कोंकणीत गोकुळदास प्रभू यांना पुरस्कारांसाठी निवडण्यात आले आहे.

## सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुकाबला कसा करणार ?

राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या भारताच्या राष्ट्रवादापुढे सांस्कृतिक राष्ट्रवादाचे आव्हान उभे ठाकले आहे. त्याचा मुकाबला लेखक आणि विचारवंत कसा करणार आहेत, असा प्रश्न नामवंत अर्थतज्ज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी दमाणी पुरस्कार वितरण सोहळ्यात उपस्थित केला.

भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार डॉ. अनिल अवचट यांना 'छंदाविषयी' ललितसंग्रहासाठी, डॉ. कुमार सप्तर्षी यांना 'येरवडा विद्यापीठातील दिवस' आत्मकथनासाठी व सुरेखा शहा यांना 'जोहड' चरित्र कादंबरीसाठी डॉ. मुणगेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सुभाष भेंडे होते. व्यासपीठावर खासदार सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ उद्योगपती प्रेमरतन दमाणी, नवरतन दमाणी, प्रसिद्ध वात्रटीकाकार रामदास फुटाणे उपस्थित होते. हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्याला सोलापूरकरांनी मोठा प्रतिसाद दिला. रोख पंधरा हजार रुपये, शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. मुणगेकर म्हणाले, ''भारताच्या राष्ट्रवादाचे नेमके स्वरूप काय राहणार आहे,

हा प्रश्न सध्याच्या सामाजिक प्रक्रियेसमोर आहे. या राष्ट्रवादाला आव्हान देणारा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आविष्कार तयार होत आहे. भारताच्या राष्ट्रवादावरच काय निर्माण करायचे, हे अवलंबून आहे. धर्माच्या अनुषंगाने राष्ट्रवादाची व्याख्या तयार होऊ लागली आहे. त्यामुळे राष्ट्रवादाची जागा धर्मावर आधारित राष्ट्रवाद घेईल, तेव्हा भारताचे तुकडे झाल्याशिवाय राहणार नाहीत.''

सातत्याने लेखन करण्याची आवश्यकता आहे, याकडे लक्ष वेधून डॉ. भेंडे म्हणाले, ''दलित साहित्यामुळे चांगला प्रवाह मराठी साहित्यात आला. मात्र, दलित लेखकांनी भरीव लिहिले नाही. आत्मकथन लिहिल्यानंतर ते मूक झाले. उदयोन्मुख लेखक एखादे पुस्तक, दहा, बारा कथेच्या पुढे लिहीत नाहीत. त्याउलट बुजुर्ग साहित्यिक सातत्याने लिहीत राहिले.''

**महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार**

दोन लाख रुपयांचा महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत ग. प्र. प्रधान यांना जाहीर झाला आहे.

जया दडकर (वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट) रवींद्र शोभणे (उत्तरायण), शफाअतखान (राहिले फार दूर माझे), निरंजन उजगरे (हिरोशिमाच्या कविता), मधुकर मेहेंदळे (प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती) यांना प्रत्येकी २५ हजारांचा पुरस्कारही देण्यात येणार आहे. केशव मेश्राम व दत्ता भगत या दोघांनीही दलित साहित्याबद्दल पुरस्कारासाठी निवड झाली आहे.


पुढील संस्थांनाही महाराष्ट्र फाउंडेशनने मदतीचा हात पुढे केला आहे. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय (एक लाख), स्त्री अभ्यास केंद्र (अडीच लाख), प्रतिमान, पुणे (एक लाख) सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट (दीड लाख), हरिश्चंद्र थोरात (२५ हजार), मीनल जगताप (एक लाख)

१९९४ पासून महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे वर्षाला सुमारे दहा लाखांचे असे पुरस्कार डॉ. सुनील देशमुख यांच्या एक कोटी रुपयांच्या देणगीतून येत आहेत.

**तुका म्हणे साहित्य पुरस्कार जाहीर**

महाराष्ट्र अनुवाद परिषद आणि तुका म्हणे या कवी आणि कवितेला वाहिलेल्या लघु अनियतकालिकाचे वतीने दिले जाणारे 'तुका म्हणे साहित्य पुरस्कार' नुकतेच जाहीर झाले आहेत. कवितासंग्रहासाठी मधुकोष -राम कदम, ग्रीष्मपर्व -सुरेस पाचकवडे, स्वप्न उद्याचे घेऊन ये - प्रसाद कुलकर्णी, समीक्षा ग्रंथासाठी सर्वात्मभावी तुकाराम - प्रा. अनिल गवळी,चारोळी संग्रहासाठी फक्त तुझा - मुक्तेश्वर कुलकर्णी, बोलीभाषेतील कवितासंग्रहासाठी हिरवा पदर - हिरामण लांजे, इंग्रजी भाषेतील कवितासंग्रहासाठी द डेज - नारायण लांजुरकर, मराठी भाषेतून अन्य भारतीय भाषेत अनुवाद असलेल्या कवितासंग्रहासाठी चौपाट (गुजराती) - डॉ. प्रदीप पंड्या, प्रा. वनिता ठाकूर, प्रिय पंजाब - विनायक वाघमारे यांना घोषित झाले आहेत. पुरस्काराचे स्वरूप प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम असे आहे.





# फुले आणि काटे

## ई-मेल : पुल्लिंगी, स्त्रीलिंगी की नपुंसकलिंगी ?

काही दिवसांपूर्वी जपानमधील प्रसिद्ध भाषातज्ज्ञ डॉ. हारुहिती किंदाइची यांचे 'निहोंत्रोनो तो कुझिच' (जपानी भाषेची वैशिष्ट्ये) हे पुस्तक वाचत असताना त्यांनी सदर पुस्तकात नमूद केलेला एक किस्सा काहीसा चमत्कारिक वाटल्याने आजही माझ्या लक्षात आहे. तो किस्सा बसा. फार वषापूर्वी जपानमधील एक स्फुटलेखक श्री. शिदरी वातानाबे पॅरिसमध्ये वास्तव्य करीत असताना एक सहा आसनी रिक्षासारखं वाहन बाजारात आलं. या वाहनाचं 'ऑटो'असं नामकरण झालं. परतु नामकरणानंतर महत्त्वाचा प्रश्न पुढं येऊन ठाकला. या नावाचं 'लिंग' काय, या मुद्द्यावर पॅरिसमधील वर्तमानपत्रांत वादविवाद रंगू लागला. जपानी भाषेत लिंगभेद नसल्यामुळे श्री. वातानाबे यांना हा वादविवाद अधिकच विचित्र वाटला असेल, यात शंका नाही. या वादावर पडदा पडण्यापूर्वीच वातानाबे यांची स्वीडनला बदली झाली. त्यानंतर साधारण ३ वर्षे स्वीडनमध्ये वास्तव्य करून वातानाबे पुन्हा पॅरिसला गेले. हॉटेलमध्ये पेपर चाळत असताना त्यांना 'ऑटो' च्या लिंगभेदासंदर्भात अजूनही वादविवाद चालू असल्याचं निदर्शनास आलं व त्यांना धक्का बसला.

मराठी भाषेतही नामांमध्ये पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग, असा भेद आहे; परंतु फ्रेंच भाषेसारखा वादविवाद कधी ऐकिवात नाही व भविष्यात कधी होईल, असं वाटलं नाही. परंतु काही दिवसांपूर्वी कोबेमध्ये 'सकाळ' इंटरनेटवर (२८ डिसेंबर २००१) वाचत असताना एका नामाचा लिंगप्रयोग खटकला. ती बातमी अशी होती : डॉ. अब्दुल कलाम यांनी विद्यार्थ्यांशी काल संवाद साधला होता. त्यांना काही प्रश्न विचारायचे असल्यास या पत्त्यावर ई-मेल करावे, असे आव्हान त्यांनी केले आहे. वार्ताहराने 'ई-मेल' हे नाम नपुंसकलिंग म्हणून वापरलं होतं. कुतुहलाखातर मी इतर मराठी भाषकांचं मत आजमवायचं ठरवलं व त्यांना हे इंग्रजी वाक्य मराठीत भाषांतरित करायला सांगितलं. जपानमधील नागेया विद्यापीठात अभ्यास करीत असलेल्या पुणेरी मराठी भाषक मित्रानं, मी त्याला ई-मेल केला' असं पुल्लिंगात्मक भाषांतर केलं, तर माझ्यासह काही पुणेरी मित्रांनी 'मी त्याला ई-मेल केली' असं स्त्रीलिंगात्मक भाषांतर केलं. सारांश 'ई-मेल केली' या नव्यानं अस्तित्वात आलेल्या नामाच्या लिंगभेदाबाबत तथाकथित 'प्रमाणभाषा' बोलणाऱ्या पुणेरी मराठी भाषकांचं मत 'पुल्लिग' 'स्त्रीलिंग' व 'नपुसकलिंग' अशा तीन गटात विभागलं गेलं आहे.

इंग्रजी भाषेतून मराठी भाषेत आलेल्या इतर काही नामांबाबत आजही एकमत नसल्याचं जाणवलं. उदा. माझा मुंबईचा मित्र 'ब्रेड' हे नाम स्त्रीलिंगी (ती ब्रेड) म्हणून वापरतो, तर

मी पुल्लिंगी (तो ब्रेड) म्हणू वापरतो. पुण्याचं मराठी 'प्रमाण' मानूनही हा प्रश्न सुटणार नाही. 'मफलर' हे नाम कसबा पेठेत राहणारा मी स्त्रीलिंग (ती मफलर) म्हणून वापरतो. तर सदाशिव पेठेत राहणारा माझा मित्र सदर नामाचा पुल्लिंगी (तो मफलर) प्रयोग करतो. दोघंही पुणेरी, भरीस भर पेठेतले. कोणाचं म्हणणं प्रमाण मानणार? भाषाशास्त्राच्या दृष्टीकोनातून 'प्रमाण' व 'अप्रमाण' भाषा हा भेदभाव फारसा महत्त्वाचा नाही. मुख्य प्रश्न हा आहे, की नव्यानं जन्माला आलेल्या नामाचं लिंग कसं ठरवायचं?

काही दिवसांपूर्वी फ्रेंच भाषकांचा वादविवाद चमत्कारिक वाटला होता; पण आता तशीच परिस्थिती मराठी भाषकांवर येऊन ठेपली आहे.

'ई-मेल केला/केली/केलं' यातला कोणता प्रयोग योग्य व कोणता अयोग्य, असं या प्रश्नांचं स्वरूप नाही. कारण तसा प्रयोग करणारे सर्व जण हाडाचे मराठी भाषक आहेत. मातृभाषा बोलताना माणूस चूक करणं हा नियम नसून अपवाद आहे.

परमेश्वरानं कोणताही भेदभाव न करता आपणा सर्वांना दिलेली समाईक देणगी म्हणजे भाषा होय. गणित, शास्त्र, इतिहास इ. विषयांबाबत या मुलाला त्या मुलापेक्षा गणित चांगलं येतं, हे शक्य आहे; परंतु भाषेबाबत या मुलाला त्या मुलापेक्षा कर्तरी प्रयोग चांगला जमतो, असं होणं अशक्य आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की जेव्हा एखादी नवीन संकल्पना अस्तित्वात येते, तेव्हा मातृभाषकांना ती संकल्पना दर्शविणारं नाम पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, अथवा नपुंसकलिंगी का वाटतं ? यासारख्या प्रश्नांचा मागोवा घेऊन भाषारूपी खिडकीतून मानवी मनात डोकावून पाहून मानवी मनाचं रहस्य उलगडून दाखविणं हे भाषाशास्त्रज्ञाचं कार्य आहे.

माझ्यातील भाषाशास्त्राज्ञ जागा झाला व व मी या प्रश्नावर विचार करू लागलो. मला जे काही सुचलें ते मांडण्याकरिता केलेला हा लेखप्रपंच.

'वर्गीकरण' ही सर्वच शास्त्रांमधील मूलभूत संकल्पना आहे. भाषाशास्त्रात श्ब्दांचं वर्गीकरण (नाम, क्रियापद, विशेषण इ.) हा एक विषय आहे. मराठी, हिंदी, फ्रेंच, जर्मन, इ. इंडो-युरोपियन वंशाच्या बहुतेक भाषांमध्ये नामांचं लिंगभेदाच्या निकषावर वर्गीकरण केलं जातं. पूर्व भारतातल्या बंगाली, उडिया, व इंग्रजी याला अपवाद आहेत. कन्नड, तमीळ, तेलगू, मल्याळम् या द्रविडी भाषा, तसेच ब्रह्मदेशी, थाई, व्हिएतनामी, चिनी, कोरियन, जपानी, इ. आग्नेय व पूर्वी आशियाई भाषांमध्ये लिंगभेदाच्या निकषांवर नामांचं वर्गीकरण होत नाही. या भाषांमध्ये नैसर्गिक लिंगभेद उदा. पुरुष-स्त्री, गाय-बैल, आहे; पण व्याकरणात्मक लिंगभेद (उदा. चहा-पुल्लिंग, कॉफी-स्त्रीलिंग, दूध - नपुसकलिंग) नाही. त्यामुळे दाक्षिणात्य लोक जेव्हा मराठी, हिंदी इ. आर्यभाषा बोलण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा साहजिकच लिंगभेदाच्या चुका करतात. आर्यभाषक लोक त्यावर हसतात; पण त्यावर न हसता त्यांच्या धाडसाचं कौतुक करावयास हवं.

मिशिगन विद्यापीठातील हिंदी, मराठी, संस्कृत व इतर भारतीय भाषांचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. पीटर हुक हे अस्खलित मराठी बोलतात, मी त्यांना मराठी भाषेत कठीणता हा आहे, असं विचारताच, त्यांनी 'लिंगभेद' असं उत्तर दिलं. चहा, कॉफी, व दूध ही तिन्ही पेयेच आहेत; परंतु प्रत्येकाचं लिंग वेगळं आहे. भूतकाळात त्या लिंगाप्रमाणे क्रियापदही बदलतं. उदा. चहा प्यायला/कॉफी प्यायली/दूध प्यायलं. अमराठी भाषकाला मराठी व्याकरणाचा



हा भाग पाठ करावा किंवा प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवावा लागतो. ज्या भाषांमध्ये लिंगभेद नाही, अशा भाषांपैकी बहुतांशी भाषांत नामांचं वर्गीकरण आकार, उपयोग, इ. निकषांवर केलं जातं. अशा भाषांमध्ये ब्रम्हदेशी, थाई, व्हिएतनामी, कोरियन, चिनी, जपानी, इ. भाषांचा समावेश होतो. (इंग्रजी या नियमाला अपवाद आहे.)

जपानी भाषेत सपाट वस्तू मोजताना माई हा प्रत्यय लावतात. उदा. स्टँप, कागद मोजताना इचीमाई, नी-माई (१माई, २ माई) अशी मोजणी करतात, तर दंडगोलाकृती वस्तू (छत्री, काठी इ.) मोजताना 'होत' असा प्रत्यय वापरतात. (इप्पोत, नीहोत-इ.) लहान पशू मोजताना 'हिकी', मोठे पशू (प्राणी) मोजताना 'ताडे' पक्षी मोजताना 'वा' व माणसं मोजताना 'नीन' असे विविध गणनात्मक प्रत्यय वापरले जातात. बंगाली भाषेतही गणनात्मक प्रत्यय वापरले जातात. उदा. मासे मोजताना मराठीत एक मासा, दोन मासे, असे मोजू पण बंगालीत एक 'टा' माश असं मोजावं लागतं. मासा जर जिवंत असेल तर 'एक-टा माश' म्हणतात, जर मेलेला असेल तर 'एक-खानमाश' म्हणतात.

संस्कृतपासून जन्माला आलेल्या व बहिणीसमान असलेल्या मराठी हिंदीतही लिंगभेदावर एकमत नाही. मराठीत पोलिस हे नाम नपुंसकलिंगी आहे (पोलिस आले), तर हिंदीत स्त्रीलिंगी (पुलीस आयी). बहुतांशी पोलिस पुरुष असूनही हिंदीत पोलिस (पुलीस) हे नाम स्त्रीलिंगी आहे.

दाढी ही फक्त पुरुषांना असूनही स्त्रीलिंगी आहे. फ्रेंच भाषेत सूर्य पुल्लिंगी व चंद्र स्त्रीलिंगी तर शेजारील जर्मन भाषेत त्याच्या उलट सूर्य स्त्रीलिंगी व चंद्र पुल्लिंगी आहे.

तात्पर्य - भाषेत केलेलं वर्गीकरणं हे नेहमीचं शास्त्राशी अथवा तर्काशी मिळतंजुळतं असेलच, असं नाही.

भाषेतील बराचसा भाग हा 'सांकेतिक' अथवा अनियमित असला तरी बराचसा भाग हा 'तर्कशुद्ध' व 'नियमित' आहे. या तर्कशुद्ध व नियमित भागाला आपण 'व्याकरण' असं म्हणतो. चार पायांचं, भुंकणारं इमानी जनावर याला मराठीत 'कुत्रं', हिंदीत 'कुत्ता', इंग्रजीत 'डॉग' जपानीत 'इन्' म्हणणं हा भाषेचा सांकेतिक भाग आहे. त्याला कोणताही नियम नाही, तसेच 'कुत्रं' हे नपुंसकलिंग नाम आहे, हाही मराठी व्याकरणाचा सांकेतिक भाग आहे; परंतु एकदा त्याचं लिंग, ठरलं, की त्यावरून ठरणारं क्रियापदाचं रूप (उदा. कुत्रं भुकलं/चावलं/पडलं) हे नियमित असून व्याकरणाचा भाग आहे. भाषा ही सांकेतिक व तर्कशुद्ध भागाचं सुरेल मिश्रण आहे.

आता मी मूळ मुद्द्यावर परत येतो. वर चर्चिल्याप्रमाणे 'ई-मेल' या नवनिर्मित नामाच्या लिंगाबद्दल मराठी भाषकांमध्ये मतभेद आहेत. काहींना हे नाम पुल्लिंगी वाटत, तर काहींना स्त्रीलिंगी व आणखी काहींना नपुसकलिंगी. या वर्गीकरणाचा निकष काय असावा? या वर्गीकरणापाठीमागे लपलेली मूलभूत संकल्पना काय असावी?

'साधर्म्य' नावाची संकल्पना वर्गीकरण प्रक्रियेतील एक प्रमुख घटक आहे, असं मानलं जातं. उदा. संस्कृत सुभाषितात म्हटल्याप्रमाणे -समानशीले' व्यसनेषु सख्यम् ' समविचारी लोक एकत्र येऊन एक गट करतात. तद्वत साधर्म्य असलेल्या गोष्टी एकाच गटात गणल्या जातात.

ई-मेल ही संकल्पना जेव्हा अस्तित्वात आली, तेव्हा मराठी भाषकांनी नकळत या

संकल्पनेचं अस्तित्वात असलेल्या इतर गोष्टींशी साम्य शोधण्याचा प्रयत्न केला. काहींना ई-मेल फॅक्सशी मिळतीजुळती वाटली असेल, तर काहींना ती तारेशी मिळतीजुळती वाटली असेल तर आणखी काहींना ती पत्राशी मिळतीजुळती वाटली असावी. फॅक्सप्रमाणे मेल ही क्षणार्धात संदेशवहन करते व त्याची प्रतही आपल्याकडे राहते. ई-मेल तारेसारखीच क्षणार्धात संदेशवहन करते. दोन्हीही इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या मिळत्याजुळत्या संकल्पना आहेत. ई-मेल ही पत्रासारखी दूरवर असलेल्या आप्तेष्टांना खुशाली कळवते. मराठीत फॅक्स पुल्लिंगी, तार स्त्रीलिंगी तर पत्र नपुसकलिंगी आहे. ई-मेलचं यापैकी कशाशी तरी साधर्म्य साधून कदाचित मराठी भाषक त्याचं लिंग ठरवित असतील. मुळात फॅक्स व तारेच लिंग कसं ठरलं, असं विचारलं, तर त्याचं उत्तर माझ्याकडे नाही. कदाचित त्यावेळीही असाच वादविवाद झाला असेल व त्यानंतर लिंगभेदावर पडदा पडला असेल. वर्गीकरणाचा हा प्रश्न फक्त फ्रेंच मराठी लोकांनाच भेडसावणारा नाही. लिंगभेद नसलेल्या जपानी भाषेतही सोनी कंपनीने बनवलेल्या रोबोरूपी कुत्र्याला कसं मोजावं, हा वाद आहे. काही त्याला जिवंत कुत्र्यासारखं समजून 'हिपी' या गणनात्मक प्रत्ययाने मोजतात, तर काही त्याला यंत्र समजून 'हाई' या गणनात्मक प्रत्ययाने मोजतात, तर आणखी काही त्याला खेळण्याच्या गटातील प्राणी समजून 'ताई' या गणनात्मक प्रत्ययाने मोजतात. तात्पर्य - भाषा जरी बदलली तरी वर्गीकरण हा काही न बदलणारा व सर्व मनुष्यप्राण्यांना भेडसावणारा प्रश्न आहे.

ई-मेलच्या लिंगभेदावर कधी दिवसांतच पडदा पडेल, यात काही शंका नाही; परंतु किमान २००२ सालच्या ऑक्टोबर महिन्याअखेरपर्यंत तरी या नामाच्या लिंगभेदाबद्दल वाद होता, अशी नोंद करून ठेवावी, असं मला वाटलं. म्हणून केलेला हा लेखप्रपंच. पुढच्या पिढीतील मराठी भाषकांना हा भाषेतील काळ 'ऐतिहासिक भाषाशास्त्र' या विषयाखाली वाचावयास मिळाला, तर या लेखाचं उद्दिष्ट साध्य झालं, असं मी मानीन.

ई मेलच्या लिंगभेदापाठीमागील रहस्याचा शोध घेताना वर्गीकरण हा मानवी मनाचा एक महत्वाचा पैलू दिसून येतो. मानवाचा (अथवा मानवी मनाचा) विविध दृष्टिकोनातून शोध घेणारी शास्त्रं - मानवशास्त्रं (Humanities) ही अत्यंत महत्त्वाची आहेत. सर्व शास्त्रांचा प्रारंभ मानवापासून होतो व त्यांची व्याख्या ही मानवाशी निगडित असते. इकॉनॉमिक्समध्ये 'Man is a bundle of desires' तर समाजशास्त्रात 'Man is a social animal' अशी व्याख्या करतात. माणसाच्या आकांक्षा या विविध क्षेत्रांना जन्म देतात. अशी महत्त्वाची शास्त्रं आज भारतात दुर्लक्षित आहेत व त्यांच्याकडे 'कमी लेखून' पाहिलं जातं, हा दुर्दैवाचा भाग आहे. जगातील सर्वात पुरातन व आजही भाषाशास्त्रज्ञांना विस्मयात टाकणारे अष्टाध्यायी पाणिनीचे व्याकरण, कौटिल्याचं अर्थशास्त्र, वैदिक काळातील नाट्यशास्त्र, रसशास्त्र इ. मानवशास्त्रांची थोर परंपरा आपल्याला लाभली आहे. या थोर परंपरेचं जतन करणं व ती चालू ठेवणं, हे आपलं आद्यकर्तव्य आहे. मानवीशास्त्रांकडे पाहावयाचा दृष्टिकोन बदलेल, असा माझा आशावाद आहे; परंतु हा आशावाद प्रत्यक्षात अवतरेल अथवा नाही, या प्रश्नाचं उत्तर फक्त काळच देऊ शकेल.

डॉ. प्रशांत परदेशी (सकाळच्या सौजन्याने)



# मेहता पब्लिशिंग हाऊसची २००२ सालातील नवीन पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| **अनुवादित : कादंबरी** | | |
| ३००१ द फायनल ओडिसी : आर्थर क्लार्क | अनु. : प्रमोद जोगळेकर | १६०/- |
| द लॉस्ट वर्ल्ड : मायकेल क्रायटन | अनु. : प्रमोद जोगळेकर | २२०/- |
| कन्टेजन : रॉबिन कुक | अनु. : प्रमोद जोगळेकर | २४०/- |
| डिफिकल्ट डॉटर्स : मंजू कपूर | अनु. : रेणू गावस्कर | २००/- |
| द पेलिकन ब्रीफ : जॉन ग्रिशम | अनु. : रवींद्र गुर्जर | २८०/- |
| द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज : अरुंधती रॉय | अनु. : अपर्णा वेलणकर | ३००/- |
| द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. : अपर्णा वेलणकर | १००/- |
| महाश्वेता : सुधा मूर्ती | अनु. : उमा कुलकर्णी | १२०/- |
| देवदास : शरच्चंद चट्टोपाध्याय | अनु. : मृणालिनी गडकरी | ९०/- |
| **अनुवादित : कथासंग्रह** | | |
| टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट : जेफ्री आर्चर | अनु. : लीना सोहोनी | ८०/- |
| पूजाघर : प्रतिभा रॉय | अनु. : डॉ. वासुदेव/राधा जोगळेकर | ८०/- |
| द स्ट्रीम विदिन | अनु. : मीना वैशंपायन | १३०/- |
| इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् : झुंपा लाहिरी | अनु. : भारती पांडे | १७०/- |
| **अनुवादित : व्यक्तीचित्रे** | | |
| टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका : फिलिस् बर्नबाम | अनु. : सुधा नरवणे | १८०/- |
| बिझिनेस लेजंड्स : गीता पिरामल | अनु. : अशोक जैन | ३००/- |
| वीरप्पन : सुनाद रघुराम | अनु. : प्रमोद जोगळेकर | २२०/- |
| **अनुवादित : काव्य** | | |
| त्रिवेणी : गुलजार | अनु. : शान्ता शेळके | ६०/- |
| **अनुवादित : वैचारिक** | | |
| व्हॉट वेंट रॉंग ?: किरण बेदी | अनु. लीना सोहोनी | १५०/- |
| विद्रोही : ओशो | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| **कादंबरी** | | |
| मुक्तिशोध यात्रा | डॉ. राजेंद्र प्रभुणे | १७०/- |
| **कथासंग्रह** | | |
| स्वप्न आणि सत्य | वि. स. खांडेकर | ७०/- |

| | | |
|---|---|---|
| विकसन | वि. स. खांडेकर | १००/- |
| क्षितिजस्पर्श | वि. स. खांडेकर | ८०/- |
| शेवटची लढाई | आनंद यादव | ९०/- |
| शुक्रचांदणी | माधवी देसाई | १००/- |
| बंजाऱ्याचे घर | यशोधर भोसले | १५०/- |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी **(कुमारवाङ्‌मय)** | माधव मोर्डेकर | ३०/- |

**ललित गद्य**

| | | |
|---|---|---|
| सुवर्णमुद्रा | शान्ता शेळके | ८०/- |
| रेशीमरेघा **(लावण्या)** | शान्ता शेळके | ७०/- |
| मालनगाथा : भाग २ | इंदिरा संत | २००/- |
| चेहऱ्यामागचे चेहरे **(व्यक्तिचित्रे)** | महादेव मोरे | १५० |

**मार्गदर्शनपर**

| | | |
|---|---|---|
| असे बना आणि बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १००/- |
| निरामय यशासाठी ध्यान | शुभदा गोगटे | ७०/- |
| आपण : आपले ताणतणाव-एक चिंतन | अंजनी नरवणे | १००/- |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५/- |
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६०/- |

**राजकीय**

| | | |
|---|---|---|
| एकवचनी | संजय राऊत | ३५०/- |

**आरोग्य**

| | | |
|---|---|---|
| आरोग्यदायक फळे आणि पदार्थ | मंगला बर्वे | १००/- |
| चाळीशीनंतरची वाटचाल | डॉ. सुभाष दांडेकर | १००/- |

**विज्ञान विषयक**

| | | |
|---|---|---|
| संभव असंभव | प्रमोद जोगळेकर | ८०/- |
| वाचनातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | १००/- |

**संदर्भ ग्रंथ**

| | | |
|---|---|---|
| श्रीसमर्थ रामदासांचे मनाचे श्लोक | विनीता ठाकूर | २००/- |

**शिक्षण**

| | | |
|---|---|---|
| व्यवसाय मार्गदर्शक | गंगाधर महाम्बरे | १९०/- |
| शिक्षक प्रशिक्षण और हिंदी अध्यापन | आनंद वास्कर / पुष्पा वास्कर | १४०/- |
| सेट-नेट परीक्षा पेपर-३ | चंद्रकांत गायकवाड | १५०/- |
| ABSORPTION SPECTROSCOPY OF ORGANIC MOLECULES | PARIKH V.M | 500/- |




◆ **जानेवारी २००३**

◆ **वर्ष तिसरे**

◆ **अंक पहिला**


# मेहता मराठी ग्रंथजगत


- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १५ रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस


*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **नानी पालखीवाला : लेखः** अनिल मेहता | ६ |
| **साहित्यवार्ता** | ९ |
| **पुस्तक परिचय** | |
| द स्ट्रीम विदिन : अनु. मीना वैशंपायन | २७ |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी : शं. व्यं. काश्यपे | ३१ |
| **वाचनालयांना आवाहन** | ३४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ४९ |
| **विशेष लेख : संमेलने** | ५० |
| **पुरस्कार** | ५४ |
| **फुले आणि काटे** | ५९ |



- मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***
- संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२

**Email - mehpubl@vsnl.com**


**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*